
# हाकारा

७:३ (१९८६)




वर्ष आठवे। अंक तिसरा

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मार्गदर्शक : प्रा. गं. बा. सरदार

## कार्यकारी मंडळ

अध्यक्ष : जनार्दन वळवी
उपाध्यक्ष : शरद कुलकर्णी
चिटणीस : रा. के. मुटाटकर
सहचिटणीस : लक्ष्मण कुलकर्णी
खजिनदार : बाबुल पठाण
सभासद : विजय भानू
गोविंद गारे
सुधीर जोग
छायाताई सुरतवंती
सुरेखा दळवी
एकनाथ बावनकर


---


## यांच्या सहकार्याबद्दल परिषद आभारी आहे !

* महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
* शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार.
* भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र.
* आदिवासी विकास संचालनालय, महाराष्ट्र शासन.
* वनविकास महामंडळ, महाराष्ट्र.
* कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता।

# हाकारा



महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

## अनुक्रमणिका


१. संपादकीय २

२. वेठबिगारी पद्धत म्हणजे काय ? ३
**रा. वि. भुस्कुटे**

३. सुडका-मडका घे, सुटून पड ! ६
**गोदूताई परुळेकर**

४. लग्नगडी : वेठबिगारीचा एक प्रकार ८
**वसंत देशपांडे**

५. असाही वेठबिगार १३
**विजय साठे**

६. वेठबिगार थांबलेल्या वाटा... कोंडलेले आभाळ १५
**जयप्रकाश दगडे**

७. व्यथा कोळसा मजुरांची १८
**रमाकांत पाटील**

८. आपण कधीच विजयी होणार नाही ? २२
**सतीश कामत**

९. वेठबिगार नमुना प्रश्न २९

१०. मुक्त वेठबिगारासंबंधी माहितीची नमुना प्रश्नावली ३१

११. कायदा आणि समाजपरिवर्तन ३३
**शरद कुलकर्णी**

१२. साठे-धगमवार चौकशी समितीचा अहवाल ३५

१३. मुलाखत : स्वामी अग्निवेश ४०

१४. संस्था परिचय ४३

१५. वृत्तसंकलन ४६



वर्ष सातवे : अंक तिसरा
जुलै-सप्टेंबर १९८६
परिषद / हाकारा संयुक्त
आजीव २०० रुपये
वार्षिक २० रुपये
सुटा अंक किंमत : ५ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
आनंदपार्क ६४/३, औंध
पुणे ४११ ००७.

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर
**कार्यकारी संपादक**
सुषमा सोनक
**संपादन सहाय्य**
रमाकांत पाटील

**प्रकाशक :**
रा. के. मुटाटकर, सचिव,
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे,
यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे,
यांच्यासाठी
कल्पना मुद्रणालय
४६१/४, सदाशिव पेठ,
टिळक रोड,
पुणे ४११ ०३०.
येथे छापून प्रसिद्ध केले.

संपादकीय

# वेठबिगारमुक्तिची दिशा

मानवाच्या श्रमातून भांडवलाची निर्मिती होते. भांडवलाचा वापर करून मानवी श्रम विकत घेतले जातात. जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी माणसाच्या श्रमाची कमीत कमी किंमत मोजणे व त्या अनुषंगाने माणसाची पिळवणूक करणे हा सामंतशाही व भांडवलशाही पद्धतीचा पाया आहे. माणसाला गुलाम म्हणून विकत घेणे व विकणे हे पुरातन काळापासून प्रचलित आहे. हरिश्चंद्र व तारामतीच्या गुलामगिरीचा, पिळवणूकीसंबधीचा उल्लेख पुराणात केलेला आहे. जहागिरदारी व जमीनदारी पद्धतीत वेठबिगारीस महत्त्व होते. बलुतेदारीतही अस्पृश्यांकडून जी कामे करवून घेतली जात त्याचा योग्य मोबदला मिळत नसे.

रशियन नेते क्रुस्चेव्ह यांनी ताजमहाल व कुतुबमिनार पाहिल्यावर कितीतरी श्रमिकांची पिळवणूक झाली असेल असे उद्‌गार काढले असे म्हणतात. अलिकडे दिल्लीत भरलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी अशीच श्रमिकांची पिळवणूक झाली असे आरोप केले जातात.

भारत स्वतंत्र होऊन ४० वर्षे लोटली. समाजवादी समाजरचना, मानवतावादी गांधीवादी, महाराष्ट्रातील संतपरंपरा इत्यादी घोषणा देऊनही आदिवासी भागात प्रामुख्याने बांधील मजूर म्हणजेच गुलामगिरीची प्रथा अजूनही चालू आहे. शासनाने बांधिल मजुरांच्या मुक्तीसाठी कायदे केले पण कायद्याचे पालन करवून घेण्याची इच्छाशक्ती किंवा क्षमता दाखविली नाही. उलट नोकरशाहीच्या नेहमीच्या खाक्याप्रमाणे आमच्याकडे हा प्रश्न नाही अशी घोषणा महाराष्ट्र सरकारने तत्परतेने केली. या बांधिल गडी प्रकरणात स्वयंसेवी संघटनांनी पुढाकार घेतला आणि त्यांच्या प्रयत्नांना सर्वोच्च न्यायालयाने चांगली साथ दिली. न्यायालयाने क्रीडाक्षेत्रातील पंचाची भूमिका न घेता त्याबद्दल स्वत:च्या अधिकारकक्षेत आयोग नेमून तपशील मागविला ही वाखाणण्यायोग्य बाब आहे. हरयाणाच्या बंधुआ मुक्ती मोर्चाचे स्वामी अग्निवेश यांची मुलाखत या अंकात देत आहोत.

महाराष्ट्रात मुंबईच्या जवळ असल्यामुळे ठाणे जिल्ह्यात आदिवासींची जबरदस्त पिळवणूक होते. त्याला सामना दिला श्रीमती गोदावरी परुळेकरांच्या चळवळीने. आचार्य भिसे गुरुजींनी शाळा काढल्या, त्यांच्या शिष्यांनी जंगल कामगार सोसायट्यांची स्थापना केली. तरी बांधिलकी कायम राहिली. ठाण्यातील श्रमजीवी संघटनेचे विवेक पंडित यांनी सर्वोच्च न्यायालयात हा प्रश्न नेल्यावरून, सर्वोच्च न्यायालयाने चौकशी करण्यासाठी पुण्याच्या विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्यरंजन साठे व डॉ. वसुधा धगमवार यांची समिती नेमली. पालघर मनोर भागातील भूमिसेनेने लग्नगडी म्हणजेच बांधिल गड्यांना मुक्त केले आणि पुन्हा ह्या बेड्यांत अडकून पडू नये यासाठी नवीन प्रकारची विवाहपद्धती रूजविण्याचा प्रयत्न केला तो सर्वश्रुतच आहे.

अशा पद्धतीने, एका बाजूला चळवळ, न्यायालयीन निवाडा आणि दुसऱ्या बाजूस रचनात्मक कार्य असे गांधीवादी तंत्र समाजसेवी संघटनांनी अवलंबिल्यामुळे या गुलामगिरीच्या प्रश्नाला वाचा फुटली आहे. हाकाराचा प्रस्तुत अंक त्याच दिशेने टाकलेले एक पाऊल आहे.

□

# वेठबिगारी पद्धत म्हणजे काय ?

— रा. वि. भुस्कुटे

वेठबिगार व वेठबिगार पद्धतीबद्दल खूपच गैरसमज आहेत. वेठबिगार म्हणजे एखाद्या अंधाऱ्या कोठडीत कडी-कुलुपांत वर्षानुवर्षे साखळीने बांधून ठेवलेला, उपाशी ठेवून कामापुरता मोकळा सोडला जाणारा कोणीतरी बंदिस्त गुलाम असतो, असे काहींना वाटते. तर भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक विशेषत: महार, मांग, वारली, कातोडी वगैरे गरीब बिचाऱ्यांना पोटची मुले समजून त्यांचे अडी अडचणीचे वेळी ( उपासमार, आजार, लग्न, दिवस घालणे वगैरे ) दिलेली मदत अंशत: फेडण्यासाठी त्या गरीबांनी स्वखुषीने उपकारकर्त्याकडे केलेल्या कामाला वेठबिगारी ठरविण्याचा उपद्व्याप केला जातो, असे काहींना वाटते. या दोन्ही टोकाच्या भूमिका आहेत. वेठबिगार पद्धत नष्ट करण्याकरता केंद्रीय सरकारने १९७६ मध्ये केलेल्या कायद्यातील व्याख्या उपयोगी पडते. महाराष्ट्रात विशेषत: ठाणे जिल्ह्यात या दोन-तीन वर्षात उघडकीस आलेल्या वेठबिगारीच्या संदर्भात या व्याख्येच्या आधारे ही पद्धत नेमकी समजून घेणे जास्त सोपे आहे.

## उचल रोख किंवा वस्तुरूपात घेतलेली असते

वेठबिगार पद्धतीमध्ये कर्जदाराने (गडी ) किंवा त्याच्या वाडवडिलांनी सावकाराकडून ( माल ) उचल घेतलेली असते. सर्वसाधारणपणे लग्नासाठी प्रत्यक्ष उचल घेण्याचा व्यवहार गड्याचे वडील, भाऊ, मामा, काका, आई किंवा जवळचा आप्त हे करतात. परंतु उचल देताना ती त्या गड्याच्या नावे दिलेली आहे आणि त्याची फेड त्यानेच करावयाची आहे, याबद्दल कोणाला शंका नसते. ही उचल रोख रकमेच्या स्वरूपात किंवा वस्तुरूपाने किंवा अंशत: रोख रक्कम व अंशत: वस्तुरूपाने असते. लग्नासाठी जेव्हा गड्याला कर्ज दिले जाते तेव्हा मालक काही वेळा लग्नाचा बास्ता ( लुगडी, चोळ्यांचे खण, मानाच्या शाली, म्हणजे टॉवेल, बाशिंग, शर्ट, पायजमा वगैरे. ) बांधून देतो. तांदूळ अथवा भात देतो, दारू पुरवितो, तर काही मालक रक्कम रु. ५००/– ते रु. १२००/– एक रकमी किंवा हप्त्याने देतात. तर काही वेळा बास्ता बांधून, भात देऊन, वर खर्चासाठी काही रक्कम रोख देतात. ही घेतलेली उचल आणि त्यावरील व्याजाची रक्कम फेडण्यासाठी वेठबिगार पद्धतीमध्ये सक्तीने काम करून घेतले जाते. बहुधा मरेपर्यंत काम करूनही घेतलेले कर्ज फिटत नाही. कधी कधी ही कामाची सक्ती अंशत: देखील असते. वर्षातले काही महिने किंवा पिकाचा विशिष्ट हंगाम, किंवा महिन्यांतील काही दिवस किंवा दिवसातील काही तास काम करण्याची सक्ती असते. बाकीच्या वेळी इतरत्र काम करण्यास मोकळीक असते.

## मालक व गडी यामध्ये लिखित, तोंडी किंवा गृहीत करार असतो

मिळालेल्या उचलीची सव्याज पुरती फेड होईपर्यंत गड्याला वेठीला धरण्याचा अधिकार मालकाला प्राप्त होतो. तेव्हा वेठबिगारी करून फेडण्याच्या शर्तीवर मालकाने गड्याला रोख किंवा वस्तुरूपाने दिलेली उचल हे वेठकर्ज म्हणूनही संबोधण्यात येते. या पद्धतीत मालक व गडी यांच्यात करार झालेला असतो. हा करार लेखी किंवा तोंडीही असू शकतो. हा करार बंधमजुरीबद्दल किंवा तत्संबंधीच्या प्रचलित सामाजिक रूढीनुसार गृहीतही असतो. बहुतेक वेळा लेखीच काय पण तोंडीही करार नसतो पण पिढ्यान् पिढ्या चालू असलेली रूढी व परंपरा यामुळे सर्वसामान्यपणे मानलेल्या कर्तव्यबंधनाने गडी मालकाशी बांधलेला असतो. हा गृहीत करार असतो व तो जास्त घातक ठरतो. त्यामुळे सामाजिक आणि मानसिक गुलामगिरी निर्माण होते. जाचाला कंटाळून एखादा गडी पळून गेला तर त्याला स्वत: अपराध्यासारखे वाटू लागते. शिवाय त्याचा समाज त्याला आसरा न देता त्याची निर्भर्त्सना करून त्याला पकडून देऊन पुन्हा वेठबिगारीत ढकलण्यात सक्रिय साहाय्य करतो. विशिष्ट विभागातील प्रचलित सामाजिक रूढीनुसार, बंधनामुळे तसेच विशिष्ट जातीत किंवा जमातीत जन्म घेतला म्हणून देखील हा करार गृहीत धरण्यात येतो. ठाणे जिल्ह्यात अलिकडे जी शेकडो वेठबिगारीची प्रकरणे स्वयंसेवी संघटनांनी उघडकीस आणली ती बहुतेक सर्व प्रकरणे अशा प्रचलित लग्नगडी ठेवण्याच्या सामाजिक रूढीनुसार गृहीत कराराखाली मोडणारी होती. अपवादात्मक एक-दोन प्रकरणांत लेखी करार केल्याचे आढळून आले.

## वेठबिगारी करण्याचा कालावधी निश्चित नसतो

या लेखी, तोंडी किंवा गृहीत कराराप्रमाणे मालकाच्या मर्जीप्रमाणे आकारलेल्या व्याजासह कर्जफेड पुरी होईपर्यंत वेठबिगारी करावी लागते. हा कालावधी किती वर्षांचा हे लेखी अगर तोंडी कराराने केव्हा केव्हा निश्चित केलेले असते बहुतेक प्रकरणांत विशेषतः ज्या ठिकाणी सामाजिक रूढी-मुळे करार हा गृहीत धरलेला असतो त्यात वेठबिगारीचा कालावधी किती वर्षांचा हे सर्वस्वी मालकाच्या मर्जीवर असते. ठाणे जिल्ह्यात जे लग्नगडी वेठबिगारीतून मुक्त झाले, त्यांना कर्जापोटी किती वर्षे मालकाकडे काम केले आहे याबद्दल काही सांगता आले नाही. मालक जेव्हा कर्ज फिटले असे सांगेल तेव्हा हे मोकळे होणार, हा प्रत्येकाचा दृढ समज होता. लग्नापोटी घेतलेल्या कर्जापोटी म्हातारा होऊन हातपाय थकेपर्यंत मालकाकडे वेठबिगारी केलेली कित्येक उदाहरणे आढळून आली. एवढेच नाही तर प्रथम आजोबा, नंतर बाप व त्यानंतर मुलगा अशा तीन-तीन पिढ्या एकाच मालकाकडे लग्नगडी म्हणून वेठबिगारी करीत असल्याचे आढळून आले. बाप व मुलाची दोघांची एकाचवेळी वेठबिगारीतून सुटका झाल्याची घटनाही घडली आहे.

## वेठबिगारीच्या कालावधीतील मोबदला नाममात्र असतो

वेठबिगारीच्या कालावधीमध्ये वेठबिगाराला मोबदला न घेता किंवा अत्यल्प ( नाममात्र ) मोबदला घेऊन काम करावे लागते. देण्यात येणारा हा नाममात्र मोबदला त्या भागात निर्धारित केलेल्या किमान वेतनापेक्षा फारच कमी असतो. तसेच ज्या भागात किमान वेतन ठरविलेले नसेल तेथे इतर मजुरांना सामान्यतः त्या भागात देण्यात येणाऱ्या मजुरीपेक्षा वेठबिगाराला तगून राहण्यासाठी दिलेला मोबदला ( रोखीतला किंवा वस्तुरूपातील ) फार कमी असतो. उदा० ठाणे जिल्ह्यातील वेठबिगारांना तगून राहाण्यासाठी सामान्यपणे अडसरी म्हणून ३२ पायली जाडा भात दरमहा देण्याची पद्धत आहे. या भाताचे खेडेगावातील मूल्य साधारणतः रु ३२ /– ते रु. ४८ /– पर्यंत होईल. वसई तालुक्यात प्रचलित किमान वेतन दर सात तासाला ७ रु. आहे. वेठबिगाराने दररोज केलेल्या कमीत कमी १०—१२ तास कामाचा विचार केला नाही तरी देखील या किमान वेतनाच्या दराने दरमहा रु. २१० /– मिळायला पाहिजेत. तेव्हा लग्नगड्याला अडसरी म्हणून दिला जाणारा मोबदला अगदीच नाममात्र आहे.

## गड्याने वेठबिगारी करून कर्जफेड केली नाही तर जामीनदाराला वेठबिगारी करावी लागते.

करार म्हटला की मग साक्षीदार, जामीनदार हे ओघा-नेच आले. १९७६ मध्ये वेठबिगार पद्धती ( उच्चाटन ) कायदा झाला त्यामुळे वेठबिगारीचे व्यवहार गुपचूप, लपून छपून व्हायला लागले. मात्र या गुपचूप वेठबिगारीच्या कराराच्या आधारे पोलिस स्टेशनची किंवा कोर्टाची मदत घेऊन वेठबिगारांवर सक्ती करणे कायदेशीररीत्या अशक्य झाले. त्यामुळे वेठबिगार कराराचे साक्षीदार, जामीनदार असले आणि ते शोधून काढणे कठीण असले तरी शक्य असते. या वेठबिगारीच्या व्यवहाराला सामान्यात साक्षीदार व जामीनदार या लग्नगड्याचेच वडील, भाऊ, काका, मामा, आई किंवा आप्त असतात. लेखी करारात जामीनदारांची नावे नमूद केलेली असतात. तसेच तोंडी व गृहित करारात देखील जामीनदार ठरविलेले असतात. जामीनदाराशिवाय जसे बँकेतून कर्ज मिळत नाही तसेच लग्न-गड्यालाही वेठीचे कर्ज मिळत नाही. शिवाय लग्नगड्याची बायको, त्याची वारस मुले कर्जफेडीला जबाबदार असतात. लग्नगडी आजारी पडला किंवा मेला तर त्याच्या भावाला, बायको किंवा मुलाला त्याच्या बदली वेठबिगारी करून कर्जफेड करावी लागते. म्हणजेच ते देखील या वेठकर्जाला गृहीत जामीनदार असतात. तेव्हा गड्याने वेठबिगारी करून कर्जफेड केली नाही तर जामीनदाराने गड्याच्या वतीने वेठबिगारी कर्जफेड केली पाहिजे. या कराराचाही समावेश वेठबिगार पद्धतीमध्ये होतो.

थोडक्यात वेठबिगार पद्धतीमध्ये जी **उचल** (वेठकर्ज) मालक गड्याला देतो ती त्याने **सक्तीने मजूरी करून** ( वेठबिगारी ) सव्याज कर्जफेड करावी या शर्तीवर लिखित तोंडी अगर गृहीत **करार** करून दिलेली असते. त्याच-प्रमाणे वेठबिगारीच्या कालावधीमध्ये, जो बहुधा अनिश्चित असतो, एकतर गड्यास मजुरी दिली जात नाही आणि गड्याने तगून राहावे म्हणून दिलीच तर ती नाममात्र असते. तेव्हा वेठबिगार पद्धतीमध्ये **सक्तीचे श्रम** करून फेड करण्याच्या बोलीवर दिलेली **उचल** ( वेठकर्ज ), त्यासाठी केलेला लेखी, तोंडी किंवा गृहीत **करार** आणि वेठबिगारीच्या काळात तगून राहाण्यासाठी दिला जाणार **नाममात्र मोबदला** या चार बाबी निर्णायक ठरतात.

## चातुर्वर्ण्याचा प्रभाव वेठबिगारीस प्रोत्साहन देतो

भारतामध्ये हिंदू समाजाचे प्राबल्य आहे. हिंदुधर्म हा चातुवर्ण्यावर अधिष्ठित आहे. चातुर्वर्णीयांपैकी शूद्र वर्णीय

तसेच वर्णव्यवस्थेत समाविष्ट नसलेले दलित, आदिवासी, भटक्या आणि विमुक्त जमातींची कोट्यावधी जनता शतकानुशतके गुलामगिरीचे जीवन कंठीत आली आहे. हिंदु धर्मीयांनी पूज्य मानलेले धर्मग्रंथ वेद, रामायण, महाभारत, मनुस्मृती इत्यादींमधून या गुलामगिरीचे उघडपणे समर्थन तर केले आहेच परंतु त्यास पवित्र ( ! ) धार्मिक अधिष्ठानही प्राप्त करून दिलेले आहे. शूद्रवर्णीय तसेच चातुवर्ण्याबाहेरील दलित, आदिवासी वगैरेंची सहस्रावधी वर्षे सामाजिक आणि आर्थिक पिळवणूक करून ब्राह्मणांनी आणि क्षत्रियांनी स्वतःची भरभराट करून घेतली. शूद्रवर्णीयांनी गावकुसात राहायचे तर स्वतंत्र बाजूला रहावे, तर हीन कर्मे करणाऱ्या लोकांनी गावकुसाबाहेर राहावे ( मनुस्मृती १०/५० ) शूद्रवर्णीयांपैकी किंवा चार वर्णांत नसलेल्या बहिष्कृतांपैकी कोणतीही व्यक्ती कितीही विद्वान, कर्तृत्ववान, व्यवहारचतुर असो त्या व्यक्तीला सामाजिक प्रतिष्ठा कदापीही मिळणार नाही. त्यातूनही जर कोणी संपत्ती, जमीन जमा केली तर शूद्राचे द्रव्य ब्राह्मणाने बिनघोर लुटावे. " ( मनुस्मृती ८/४१७ ) हा मनूचा कायदा शतकानुशतके अमलात होता. विसाव्या शतकात आजही या कायद्याचा ग्रामीण भागात प्रभाव आहे. आजही दलितांच्या, आदिवासींच्या जमिनी बळकावल्या जातात, त्यांना ढोरांसारखे वागवण्यात येते. त्यांची घरे जाळली जातात. त्यांच्या बायका, मुलींची अब्रू लुटली जाते. सवर्णांच्या या अत्याचारांमध्ये पोलिसांच्या नोकरशाहीची सक्रिय साथ मिळते.

## वेठबिगारी हा सरंजामशाहीचा मूलाधार

ब्रिटिश अमदानीत गुलामगिरी कायद्याने नष्ट करण्यात आली. या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी केल्याने गुलामांची खरेदी-विक्री बंद झाली. परंतु गुलामसदृश वेठबिगार पद्धतीचे अस्तित्व कायम राहिले. ब्रिटिश अंमदानीत भारतीय दंडसंहितेमध्ये वेठबिगारीला बंदी होती व शिक्षेचीही तरतूद होती. सरंजामी व्यवस्थेचे अस्तित्व व भरभराट वेठबिगारांच्या अनन्वित पिळवणुकीमध्ये आहे. वेठबिगारी हा सरंजामशाहीचा मूलाधार आहे. हा सरंजामदार वर्ग ( संस्थानिक, जहागिरदार, इनामदार, जमिनदार) परकीय सत्तेचा सामाजिक आधार असल्याने वेठबिगारी पद्धत नष्ट करण्याच्या फंदात पडून त्यांना दुखवण्यात परकीय सत्तेला यत्किंचितही स्वारस्य नव्हते. तेव्हा स्वातंत्र्य मिळेपर्यंत वेठबिगारी नष्ट व्हावी असा प्रयत्न परकीय सत्तेने कधी केला नाही.

## घटनेने दिलेले अधिकार व वाढती कोंडी

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटना समितीने घटना तयार केली. या घटनेप्रमाणे लोकशाही समाजवादी प्रजासत्ताक प्रस्थापित झाले. भारतीय घटनेप्रमाणे सर्व भारतीयांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला तसेच संचार, व्यवसाय, भाषण, संघटना स्वातंत्र्य वगैरे मूलभूत हक्क देण्यात आले. परंतु भारतीय समाजावरील चातुवर्ण्य पद्धतीचा, वैचारिक पगडा कायम राहिल्याने, तसेच ग्रामीण जीवनावरील सरंजामी-व्यवस्थेचा संस्कृतीचा प्रभाव कमी न झाल्याने वेठबिगार पद्धती कायमच राहिली भांडवलशाहीच्या अप्रत्याहत प्रगतीमुळे ग्रामीण भागात काही प्रमाणात सरंजामदार मागे हटले तरी ग्रामीण भागातील उगवत्या धनिक शेतकऱ्यांनी त्यांची जागा घेतली. वाढणाऱ्या विषमतेमुळे जमीनीची मालकी थोड्यांच्या हाती एकवटू लागली. त्यामुळे नव्याने निर्माण झालेल्या अत्यल्प भूधारकांना, भूमिहीनांना लाखोंच्या संख्येने या नवधनिकांनी वेठबिगारीत खेचून घेतले. स्वातंत्र्य मिळाल्यावर विशेषतः हरित-क्रांती झाल्यावर वेठबिगारी मोठ्या प्रमाणावर वाढली ही वस्तुस्थिती आहे. १९७६ मध्ये आणीबाणीत वेठबिगार पद्धत निर्मूलनाचा कायदा झाला. त्याला आता अकरा वर्षे झाली. कायदा अंमलात येत नाही ही तक्रार कायम आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ३९ वर्षे झाली तरी लाखोजण वेठबिगारीचे जीवन जगत आहेत याचे सोयरसुतक प्रशासनाला, सत्ताधारी पक्षाला, विरोधी पक्षांना आणि सुजाण नागरीकांना नाही हे कटू सत्य आहे.

## वेठबिगार पद्धती नष्ट करण्यासाठी ...

वेठबिगार पद्धती नष्ट करण्यासाठी अविरत लढा द्यावा लागणार आहे. वेठबिगारीविरुद्धचा हा लढा कायदा न पाळणाऱ्या काही थोड्या क्रूर गुन्हेगार मालकांविरुद्ध निव्वळ नाही. हा लढा ग्रामीण भागातील सरंजामी अवशेषांविरुद्ध, धनदांडग्या शेतकऱ्यांविरुद्ध, आहे. त्यांना साथ देणाऱ्या सत्ताधारी आणि विरोधी पक्षाविरुद्ध आहे. वेठबिगार-मालकांचे हितरक्षण करण्यास कटिबद्ध असलेल्या प्रशासनाविरुद्ध, चातुर्वण्याचा अजूनही पुरस्कार करणाऱ्या जातीय, धार्मिक पक्ष, संस्था, मठ आणि व्यक्तींविरुद्ध हा लढा आहे. कालबाह्य नासक्या व विषारी रूढी व प्रथांविरुद्ध हा लढा आहे. समाज बदलण्याचा हा लढा आहे.

□

# "सुडका-मडका घे, सुटून पड !"

आदिवासी विभागात काम करावयास जाणाऱ्यांची संख्या तुटपुंजी आहे. या स्थितीत चाळीस वर्षांपूर्वी गोदूताईंनी ठाणे जिल्ह्यातील वारली विभागात कामास सुरुवात केली. कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्या म्हणून त्या तेथे गेल्या तेव्हा वारल्यांचे जीवन पाहून त्या कळवळल्या. पण यामुळे त्यांनी वारल्यांना निःसत्व राहण्याची दिली नाही. त्यांनी प्रतिकाराची भावना त्यांच्यात जागृत केली. वारल्यातला माणूस गोदावरीबाईंनी जागृत करण्याचे फार मोठे काम केले. आणि वारल्यांनी त्यांना गोदाराणी केले.

मी या भागात गेले तेव्हा 'लग्नाच्या गड्यां'ची पद्धत प्रचलित होती. खरे पाहता हे कर्जगडी. पण या गड्यांचे कर्ज लग्नासाठी काढलेले असे, त्यापायीच त्यांना गडी म्हणून खपावे लागे, म्हणून त्यांना लग्नगडी म्हणण्याचा प्रघात आहे. ही पद्धत फार पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. या भागातील लग्नगड्यांची पद्धत ही अंगावर शहारे आणणारी पद्धत आहे. हे लग्नाचे गडी म्हणजे वस्तुतः मालकाचे गुलामच होते. फरक एकच : गुलामाचे मालक ज्याप्रमाणे सर्रास गुलामांचा व्यापार, खरेदीविक्री करीत ती प्रथा इथे नव्हती. काही आदिवासींनी "माझ्या शेठने दुसऱ्या शेटकडून पैसे घेऊन मला त्याच्याकडे लग्नगडी म्हणून पाठविले." असे मला सांगितले आहे— परंतु अशी उदाहरणे तुरळक होती.

## लग्न करायचे म्हणजे संकटपरंपरा उभी

आदिवासींना लग्न करायचे तर त्यांच्या रीती रिवाजानुसार कमीतकमी शंभर-दोनशे रुपयांचा खर्च येत असे. लग्न करायचे म्हटले की पहिला प्रश्न येई : हे पैसे आणावयाचे कोठून ? सारीच कामे मोफत करीत असल्यामुळे त्यांच्याजवळ वेळेला चार पैसे मिळण्याची मुष्कील होती. तर हे एवढे पैसे आणणार कोठून ? विवाह ही नैसर्गिक व सामाजिकदृष्ट्या आवश्यक धटना आहे. अविवाहित माणसाला त्यांच्या जमातीत कमी लेखण्यात येते. म्हणून लग्न तर करायलाच पाहिजे. पण लग्न करायचे म्हटले की आदिवासींच्या पुढे संकटपरंपरा उभी राहात असे, कारण पैशाची पंचाईत पडे. आदिवासींना लग्नासाठी लागणारी रक्कम जमीनदारांकडून व किंवा सावकारांकडून कर्जाऊ घ्यावी लागत असे. ही रक्कम देताना ते करार करून घेत. या करारान्वये ऋणकोला व त्याच्या बायकोला धनकोच्या घरी तो सांगेल ते काम कर्ज फिटेपर्यंत करायला लागे. जमीनदारांचा व सावकारांचा हिशोब असा असे की कितीहि वर्षे किंबहुना जन्मभर काम केले तरी कर्ज फिटत नसे. प्रॉमिसरी नोट करून ते कर्ज सक्तीने त्याच्या वारसावर लादण्यात येत असे. अशा रीतीने कुटुंबेच्या कुटुंबे गुलामीत खितपत पडत.

## सावकार-जमीनदार सांगतील तो हिशेब

या कर्जाच्या पोटी व्याजही भरमसाठ आकारण्यात येई. दर शंभर रुपये कर्जाऊ देतांना रुपायाला एक आण्याप्रमाणे व्याज आकारलेले मला माहीत आहे. म्हणजे दरसाल दर शेकडा पंचाहत्तर रुपये नुसते व्याजाचे होत. वारली अडाणी व निरक्षर, जमीनदार-सावकार सांगतील तो हिशोब. पण एवढे करूनही विवाहित जोडप्याने सतत काम केले तर काही वर्षांत कर्ज का फिटू नये असे शहरवासियांना वाटते. नवराबायको रात्रंदिवस जमीनदाराकडे कामासाठी राबले तर त्या दोघांना मिळून जो पगार मिळे त्यातून काही वर्षांत कर्ज फिटावयास हरकत नाही. या प्रश्नाचे उत्तर अगदीच सोपे आहे. या लग्नगड्यांना पगार

शून्य असे. वर्षाच्या कामासाठी पुरुषाला लगोटी-कुडते, फार तर डोक्याला बांधायला पागोटे आणि स्त्रीला लुगडे (जे कधी पुरे नऊ वार नसायचे), व चोळी एवढे देण्यात येत असे. त्याशिवाय काही घनको बिडीसाठी तंबाखू (तंबाख) देत. पगार म्हणून काहीही देण्यात येत नसे. त्यामुळे कर्जाऊ घेतलेले पैसे परत करणे कधीच शक्य होत नसे. गरजेच्या वेळी पैसे दिले हेच जमीनदाराचे उपकार मानून, पळसाच्या पानावर दिलेला तांदळाचा भात. मिठाचा खडा, आणि कधीमधी वरण दिले तर वरण खाऊन ते रात्रंदिवस कष्ट उपशीत. अशा अवस्थेत कर्ज फिटणे अशक्यप्राय असल्यामुळे लग्नगड्यांना जन्मभर गुलामाचे जीवन जगावे लागत असे. पिढ्यान्‌पिढ्या जमीनदाराच्या घरी कष्ट उपशीत काढावे लागत. लग्न झाल्याबरोबर जोडप्याला मालकाच्या घरी जावे लागत असे. तो सांगेल ते काम करावयाचे असा दंडक होता.

## ही कादंबरी नाही वस्तुस्थिती आहे

काहीजण लग्नाचा गडी व त्याची बायको यांना एका ठिकाणी ठेवीत तर काही त्यातल्या पुरुषाला शहरामधल्या मोठ्या वाड्यांतून ठेवीत व बाईला शेतावर आवारात कामाला ठेवीत. बाईला शेतावर आवारात तिच्या नवऱ्यापासून दूर कामाला ठेवली म्हणजे जमीनदार-सावकारांना त्या बाईचा बिनधोक निःसंकोचपणे उपभोग घेता येत असे. सावकार त्या बाईला आपली मालमत्ताच समजून अधिकार गाजवीत. जमीनदार अशी त्यांची ताटातूट करू लागले की त्यांना रडू येई. या हकीकती ऐकल्यानंतर मला 'मूर्तिमंत गुलामगिरी' या कादंबरीतील प्रसंगाचे स्मरण झाले. स्वतःलाच आठवण करून द्यावी लागली' ही कादंबरी नाही, वस्तुस्थिती आहे. ती बदलण्याचे तुला प्रयत्न करावयाचे आहेत. तशी प्रतिज्ञा तुम्ही पतिपत्नींनी केली आहे.

विवाहित जोडप्याला अनेक तऱ्हेची कामे करावी लागत पहाटे उठून रात्री मालक झोपी गेल्यानंतर झोपायचे, दिवसभर घर झाडणे, आंगण झाडणे, शिंपणे, भांडी घासणे, धुणी धुणे, लागेल तेवढे विहिरीचे पाणी उपसणे, स्वयंपाकाची तयारी करणे, काही ठिकाणी स्वयंपाक करणे, गुरांचा गोठा साफ करणे, धारा काढणे, दळणकांडण करणे, उष्टीखरकटी करणे, दिवाबत्ती करणे, टांगा असला तर तो साफ करणे, घोड्याला दाणापाणी व खरारा करणे, मालकाचे अंग दाबणे, मालक सांगेल तेव्हा सांगेल त्या जिनसांचे बोजे दहा-दहा मैल नेणे, मालकाचे घोड्याबरोबर मैलन्‌मैल पळणे, मालक ज्या टांग्यात बसे व टांगा चालवी त्या टांग्यामागे पळत जाणे, मालकाने सांगितले म्हणजे शौचकूप साफ करणे, — अशी एक ना दोन, हजार कामे फुकट करून हे लग्नाचे गडी मालकाचे जीवन फुलवीत होते.

## बाई, मारून कुटून परत आणतात

मी लग्नगड्यांना विचारी, "काय रे, तुमच्या बायकांची अब्रू लुटली तरी तुम्ही सारं कसं सहन करता? पळून का जात नाही?" ते म्हणत, "बाई, पळून कुठं जाणार? मारूनकुटून परत आणतात." त्यांचे म्हणणे एका अर्थी खरे होते. त्यांचे जग अगदी मर्यादित होते. त्यांच्याजवळ दिडकी नसायची. पळून दुसऱ्याकडे गेला व त्याला पळून आला असल्याची बातमी लागली तर तो मुसक्या बांधून त्याला पहिल्या मालकाकडे पाठवीत असे. जवळपासच्या एखाद्या गावी गेला तर मालक आपला मुकादम, भय्ये, पठाण पाठवून त्याचा तपास करून त्याला शोधून काढी. मग ते मुकादम त्याला मारहाण करून, ओढीतताणीत नेऊन मालकाच्या स्वाधीन करीत. शिवाय मालक कोंडून मारहाण करीत ती वेगळीच. नुसत्या लग्नाच्या गड्यालाच मारीत असे नव्हे, तर "तुझा मुलगा का पळाला. माझे पैसे टाक." असे म्हणून आईबाप; भाऊ यांनाही मारहाण करीत. मारणाऱ्यांविरुद्ध तक्रार कोणाकडे करणार? कोर्टात न्याय मिळण्याची आशा नसे.


## आम्ही त्या नरकातून सुटलो

हे लग्नाचे गडी त्या जमिनदारी वैभवात कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे काम करीत. हे अगदी निर्बुद्ध वाटत, त्यांना खालल्या मानेने इकडून तिकडे वावरताना पाहिले की हे मुके, बहिरे, आंधळे तर नाहीत ना असे वाटे! लाल बावट्याचा आधार मिळाल्याबरोबर जमीनदार-सावकारांच्या जुलुमाना ठोसा मारून शेकडो आदिवासी या किळसवाण्या जीवनाला रामराम ठोकून मुक्त झाले.

लग्नगड्यांच्या अनुभवाने समजले होते की, एकएकट्याने सुटण्याचा प्रयत्न केला तर तो यशस्वी होत नाही. लग्नगडी सोडविण्याची मोहीम आदिवासींनी स्वतः आखली व पार पाडली. त्याचे श्रेय किसान सभेला नाही. लाल बावट्याची चळवळ ते आपल्या मुक्तीची चळवळ समजत होते. लग्नगड्यांची मुक्तता त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी लग्नगड्यांच्या मुक्ततेची योजना आखली व पार पाडली. त्यांनी हजारोंच्या मोठ्या सभा घेतल्या

[ पान २४ पाहा

# लग्नगडी : वेठबिगारीचा एक प्रकार



वसंत देशपांडे

आणीबाणीच्या काळात एक महत्त्वाचा कायदा जारी करण्यात आला आणि वेठबिगारी संपुष्टात आणली गेली. वेठबिगारी प्रामुख्याने आदिवासी विभागात अस्तित्वात होती. कायदा अंमलात येऊन दहा वर्षांचा काळ लोटला तरी आजही काही प्रमाणात ही पद्धत टिकून राहिल्याचे दिसते. बिगर आदिवासी विभागातही ही पद्धत चालू असल्याचे कार्यकर्ते सांगतात. विशेषत: गेल्या तीस-पन्नास वर्षांच्या काळात जिथे धरणे बांधली गेली आणि मोठ्या शेतकऱ्यांचे उखळ पांढरे झाले, तिथे कायद्यास न जुमानता गरीब मजुरांना काही शेतकरी जखडून ठेवतात अशी तक्रार ग्रामीण भागातील कार्यकर्ते करताना आढळतात. केवळ कायदा करून ही अमानुष पद्धत नष्ट होणार नाही. ग्रामीण भागातील भूमिहीन मजुरांमधे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संरक्षण आणि प्रोत्साहन देणे, मजूर-वर्गासाठी मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करणे आणि शासनाधिकाऱ्यांना कायद्याची चोख अंमल-बजावणी करण्यास भाग पाडणे, या गोष्टींची गरज आहे. या लेखात ठाणे जिल्ह्यातील मनोर विभागात आढळून आलेल्या एका विशिष्ट प्रकारच्या वेठबिगारीसंबंधी माहिती दिली आहे.

ठाणे जिल्ह्याच्या पालघर तालुक्यातील मनोर विभागातील रहिवासी हे प्रामुख्याने आदिवासी आहेत. लहान खेडी आणि पाडे यांनी हा निसर्गरम्य प्रदेश व्यापलेला आहे. तेथील आदिवासी लहान लहान तुकड्यांतून आपली शेती करतात. वर्षातून एकच पीक आणि ते भाताचे. ओलिताखाली जमीन नाही म्हटले तरी चालेल. त्यामुळे पावसावरचे भाताचे पीक घेतले की शेतीचे काम संपले. मशागत जुन्या पारंपारिक पद्धतीने होते. नवीन संकरित बियाणे, रासायनिक खते इत्यादींचा प्रवेश या भागात फारसा झालेला नाही. त्यामुळे जेमतेम उत्पादन. इतर व्यवसायांचा अभाव यामुळे बहुसंख्य शेतकरी अतिशय दरिद्री आहेत. त्यातच आदिवासी हा बुजरा, निरक्षर आणि न्यूनगंडाने पछाडलेला. बाहेरच्या लोकांनी येऊन त्यांच्या जमिनी लुबाडल्या. मामुली खावटी कर्ज देऊन त्यांना वेठीस धरले अनेक वर्षांच्या या अनुभवामुळे येथील आदिवासी बाहेरच्या व्यक्तींबद्दल, शासनातील कर्मचाऱ्यांबद्दल साशंक असतो. बाहेरचे लोक आपली पिळवणूक करण्यासाठीच येतात अशी खूणगाठ त्याच्या मनात आहे.

जे बिगर आदिवासी या भागात स्थायिक झाले, त्यांनीच ही वेठबिगारी अस्तित्वात आणली याबद्दल वाद नाही. खावटीसाठी, लग्नासाठी किंवा अन्य कारणांसाठी, प्रामुख्याने धान्याचे रूपात, मामुली कर्ज द्यावयाचे आणि त्या बदल्यात कर्जदारास स्वतःचे घरी आणि शेतावर कामासाठी ठेवून घ्यावयाचे किंवा कर्जदाराची जमीन कर्ज फिटेपर्यंत स्वतःकडे कसण्यासाठी घ्यावयाची या प्रथेतून ही पद्धत अस्तित्वात आली. कर्ज आणि त्यावरील व्याज फेडण्यास कर्जदारास कधीच संधी मिळत नाही याची खबरदारी घेतली जाते. सावकराकडे दिवसरात्र कष्ट उपसावे लागत असल्यामुळे इतरत्र काम करून पैसे मिळवण्यास वेळ मिळत नाही. आणि समजा असा वेळ मिळाला तरी काम

मिळत नाही. त्यामुळे एकदा कर्ज घेतले की कायमचेच सावकाराकडे गुलाम म्हणून राबणे अपरिहार्य होते.

या भागातील वेठबिगारात प्रमुख प्रकार लग्न-गड्यांचा आहे. आपली लहान मुले मोठ्या शेतकऱ्यांकडे कामावर ठेवून घेण्याची गरीब आदिवासी खटपट करतात. ही मुले 'गोवारी' म्हणून कामास लागतात. मालकाच्या घरी पडेल ते काम त्यांना करावे लागते. पण मुख्य काम गुरे राखणे हे असते म्हणून त्यांना बहुधा 'गोवारी' म्हणण्याची प्रथा पडली असावी. या कामाच्या मोबदल्यात त्यास फक्त दोन वेळचे जेवण —भात आणि काही कालवण—एवढेच मिळते. रोख काही मिळत नाही. मालक चांगला असला तर वर्षातून एखादा कपडा मिळू शकतो. आपल्या मुलाच्या पोषणाची जबाबदारी कमी होते एवढाच काय तो आदिवासी मजूरास दिलासा. मुलगा कामाला बरा आहे, स्वभावाने गरीब आहे असे दिसून आले की मालकच मुलाच्या लग्नासाठी पुढाकार घेतो. आणि लग्न लावून देतो. लग्नाचा खर्च कर्ज म्हणून मानला जातो. लग्नासाठी ४–५ मण भात, काही कपडे, वाजंत्री, घोडा इत्यादी खर्च मालक स्वतःच करतो. रोख रक्कम फारशी नसते. बहुतेक ठिकाणी रोख रक्कम दिली जातच नाही. दिलेल्या मालाचा हिशेब मालकच करतो. किती रक्कमेचा माल आणला हे गड्यास ठाऊक नसते. मालक म्हणेल ती किंमत ठरून ती रक्कम कर्ज म्हणून गडी स्वीकारतो. ही रक्कम फिटेपर्यंत, नवराबायको दोघांनाही मालकाकडे बांधील मजूर म्हणून काम करावे लागते. लग्नासाठी घेतलेल्या कर्जापोटी बांधीलकी स्वीकारली जाते म्हणून यांना लग्नगडी म्हणतात. किती वर्षे काम करावे लागेल हेही मालकच ठरवतो. पूर्वी हा काळ अनिश्चित असे म्हणून लग्नगडी म्हणजे तहहयात गुलाम मानला जात असे. त्याची बायकोही बांधली जाते. या जोडप्याला इतरत्र काम करण्याची सक्त मनाई असते. इतर कोणी कामही देऊ शकत नाही. कारण गावामधे मालका-मालकांत आणि इतर मोठ्या शेतकऱ्यांत एक प्रकारचा अलिखित करार असतो की एकमेकांचे बांधील मजूर कामावर घ्यायचे नाहीत. या व्यवस्थेमुळे इच्छा असली तरी लग्नगडी इतरत्र कामास जाऊ शकत नाही. कामावर जायचं बंद केले तर मालक गड्यास धरून जबरदस्तीने कामावर नेऊ शकतो. गावातील कोणीही त्यास अटकाव करू शकत नाही. पळून जायचे ठरविले तर दूरच्या गावी पळून जावयास हवे. आसपासच्या गावी गेल्यास तिथेही आपला माणूस पाठवून मालक गड्यास धरून कामावर घेऊन जाऊ शकतो. पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या गड्यास मारझोड करण्याचे स्वातंत्र्य मालकास असते.

लग्नगड्यांना कामाची मजुरी म्हणून सर्वसाधारणपणे नवराबायकोस प्रत्येकी रोज एक अधोली भात (म्हणजे सुमारे ४०० ते ६०० ग्रॅम) दिला जातो. नवऱ्याला महिन्याकाठी २० अधोलीच भात मिळतो. कारण १० अधोली भात कर्जापोटी कापले जाते, बायकोला मात्र महिन्याचे ३० अधोली भात मिळतो. रोख मजुरी काहीही मिळत नाही. मालकाची मर्जी असेल तर वर्षाकाठी एक घोंगडी, एखादा कपडा आणि अगदी क्वचित बिडीकाडीसाठी एखादा रुपया मिळतो. काम सपाटून असते. दिवसाकाठी १२ तास काम पडतेच. परंतु लावणीच्या वेळेस १८ तास देखील काम पडते. एकही दिवस सुटी मिळत नाही. आजारपण असो अगर सणवार असो. सुटी घेतली तर मजुरी मिळत नाही. मालक घरी येऊन दोघांनाही दमदाटी करून कामावर नेतो. पूर्वी म्हणजे ३–४ वर्षांपूर्वी कामावर न आल्यास मारहाण करून खेचून नेण्याची पद्धत सर्रास होती. हल्ली मारहाण होत नाही, परंतु शिवीगाळ होतेच. एखादा गडी खपला, पळून गेला किंवा निकामी झाला तर त्याच्या बदली घरातील कोणातरी इसमास जावेच लागते. आजच्या घटकेसही ही प्रथा चालू असल्याचे दिसते.

अशा बांधिलकीत गड्यांचीही काही प्रमाणात सोय असल्याचे दिसते. कारण या गुलामीत कामाची हमी आहे. पिळवणूक होते हे खरे. परंतु रोजचे रोज पोटाची खळगी भरण्याची सोयदेखील होते. या भागात इतर कामे उपलब्ध नाहीत. भातशेती संपली की मजुरांना काम मिळणे अवघड होते. लग्नगड्यांच्या बाबतीत ही चिंता कमी. मालक बहुधा रोजचे रोज काम देतो. त्यामुळे रोजचे रोज किमान धान्यही मिळते. मालकाला अत्यंत स्वतात दोन इसमांचे श्रम मिळतात. लग्नगड्यांना मोबदल्यात अर्धेमुर्धे पोट भरण्याइतपत धान्य मिळते.

मालकाच्या संमतीने गड्यास इतर ठिकाणी मजुरीसाठी कामास जाते येते. पण तिथे मिळणाऱ्या वेतनावर गड्याचा हक्क रहात नाही. हे वेतन मालक स्वतःच घेतो. रोजगार हमी योजनेतील कामांवर लग्नगडी कामास गेल्यावर, तिथे मिळणारी मजुरी मालकाच्या खिशात गेल्याची उदाहरणे सापडतात. इतर कामावर मिळालेली मजुरीही गडी मालकाच्या हवाली करीत असल्याचे दिसते. गोविंद बाजा भोईर हा असा एक लग्नगडी भेटला. तो सुतारकीचे काम करून रोजी रु. ४ कमावीत होता. पण ही सर्व मजुरी बिनबोभाट तो मालकास देत होता. गोविंदाने दहा वर्षांपूर्वी

रु. ६३० कर्ज घेतले होते. त्या आधी तो दोन वर्षे गोवारी म्हणून मालकाकडे काम करीत होता. १७ जुलै १९७८ मधे त्याने सुटण्याचा प्रयत्न केला. पण मालकाने दम भरल्याने त्याने हा विचार सोडून दिला.

लेंडोपाडी हिंडून लग्नगड्यांची संख्या निश्चित करण्याचा प्रयत्न कोणी केलेला नाही. परंतु अंदाज बांधणे कठीण नाही. मनोर भागात भूमिसेना नावाची संघटना काम करते. या संघटनेचे नेते व बरेचसे कार्यकर्ते खुद्द आदिवासीच आहेत. काळूराम धोडदे हा या संघटनेचा नेता. या संघटनेचे आजचे एक महत्त्वाचे उद्दीष्ट लग्नगड्यांची मुक्तता करणे हे आहे. या कार्यकर्त्यांच्या मते प्रत्येक गावी ५–६ लग्नगड्यांची कुटुंबे आजही आहेत. सुमारे ६५ खेड्यांत हे कार्यकर्ते फिरतात. पैकी ३० खेड्यात त्यांचा प्रभाव अधिक आहे. प्रत्येक गावी जाऊन तेथील लग्नगड्यांची ते माहिती घेतात. त्यासाठी त्यांनी एक प्रश्नपत्रिका छापून घेतली आहे. आजपर्यंत २०० हून अधिक लग्नगड्यांची त्यांनी माहिती गोळा केली. आणि त्यांच्या सुटकेसाठी रीतसर प्रयत्न केले. या कामात त्यांना थोडेफार यश आलेले आहे.

हा कायदा झाल्यानंतर, केंद्र सरकारने जेव्हा विचारणा केली तेव्हा, महाराष्ट्र सरकारने तत्परतेने आपल्या राज्यात बांधील मजूर नसल्याचे कळवले. इतर अनेक राज्यांनीही महाराष्ट्राचे याबाबतीत अनुकरण करून आपल्या राज्यात वेठबिगारी नसल्याचे कळवले. जुन्या जमान्यातील वेठबिगारीसारख्या अनिष्ट प्रथा आम्ही केव्हाच नष्ट केल्या आहेत असे दाखवण्कात राजकारणात जणू चढाओढच लागली होती. प्रत्यक्ष पाहणी करून, विविध भागांतील अधिकाऱ्यांशी आणि कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करून याबाबत वास्तविक निवेदन करावयास हवे होते.

परंतु लवकरच महाराष्ट्र सरकारने आपल्या विधानातील सत्यता पडताळून पाहण्याचे ठरविले, आणि श्री. वि. स. पागे यांचे मार्गदर्शनाखाली एक समिती नेमून याबाबत पाहणी करण्याचा आदेश दिला. समितीने राज्यातील सर्व भागात हिंडून संबंधित अधिकारी आणि इतर व्यक्तींशी चर्चा केली, आणि आपला अहवाल सादर केला. वेठबिगारी अस्तित्वात असल्याचे समितीस आढळून आले आणि त्यांनी तसे आपल्या अहवालात नमूद केले.

लग्नगडी हा बांधील मजूरवर्गाचा एक प्रकार झाला. याशिवाय इतर प्रकारही आहेत. मोसमापुरता किंवा वर्षापुरता बांधील गडी हा दुसरा महत्त्वाचा प्रकार. या प्रकारात अल्पभूधारक अधिक प्रमाणात असतात. स्वतःच्या शेतीत वर्षभर पुरेल एवढे धान्य पिकत नाही; आणि विशेषतः पेरणीपासून ते मळणीपर्यंतच्या काळात अन्नटंचाई तीव्र असते. या काळात सरकारी अगर खाजगी कामावर रोजगार उपलब्ध नसतो. अशा अडचणीच्या काळात काही मण भात कर्ज म्हणून घ्यायचा आणि त्याबदल्यात राहिलेल्या वर्षामधे पडेल ते काम करावयाचे, इतरत्र मजुरीसाठी जायचे नाही अशी बांधीलकी देणारे आदिवासी मोठ्या प्रमाणावर आढळतात. या आदिवासींनादेखील सावकारांकडे काम असेल तेव्हा १ ते १॥ अधोली भात मिळतो. पण त्यांना इतरत्र अधिक मजुरी पडणारा रोजगार उपलब्ध असेल तर जाता येत नाही. बांधिलकी मोसमानंतर संपते. परंतु पुढील वर्षी लावणीनंतरच्या काळात घरात धान्याची चणचण असते आणि पुन्हा त्याच पद्धतीने तो बांधीलकी स्वीकारतो.

रामजी जाधव हा एक असाच जुना गडी.

अनेक वर्षे हा बांधील मजूर म्हणून काम करीत आहे. त्याचे वय त्याला सांगता येत नाही. लहान असतानाच मालकाकडे कामास लागला. लग्न होईपर्यंत मालक फक्त जेवण देत असे. ते पण जेमतेमच. काही वर्षांनंतर मालकानेच पुढाकार घेऊन लग्न करून द्यावयाचे ठरवले. त्यालाही बरीच वर्षे झाली असे रामजी म्हणतो. हे त्याचे पहिले लग्न. या लग्नासाठी मालकाने किती खर्च केला याची आठवण रामजीला नाही. करार काय होता याचीही कल्पना नाही. पण आयुष्यभर मालकाकडेच राबायचे, अशी त्याची कल्पना होती. बायकोला आपण लग्नगडी म्हणून जाणार आहोत याची कल्पना नसावी. तिला मालकाचे घरी राबणे आवडत नसे. ती फार नाराज असे. मालक–मालकीण खूप रागावत. शिव्या देत. बायको कंटाळून गेली. कामावर जाईनाशी झाली. रामजीलाही शिव्या देऊ लागली. रामजी एखादा दिवस घरी राहिला तर मालक घरी येऊन त्याला खेचून नेई. चार-पाच वेळा तरी काठीने मारल्याची रामजीला आठवण आहे. किरकोळ मारहाण नेहमीच होत असे. बायकोला कधी मारले नाही. पण खूप शिव्या देत. 'आज डोके दुखते आहे.' असे म्हणाली की, मालक ओरडे, 'रांडे, तुझी गांड दुखते का?' पुढे पुढे बायकोही मालकाला शिव्या देऊ लागली. तेव्हापासून मालकाने तिचा नाद सोडला. बायको या जिण्याला कंटाळली आणि शेवटी रामजीला सोडून गेली. मालक म्हणाला, 'काही हरकत नाही. मी तुझे दुसरे लग्न करून देतो.' त्याप्रमाणे त्याने लग्न ठरवून टाकले. रामजीने ही बायकोदेखील लग्नाआधी पाहिली नाही. सर्व मालकानेच ठरविले. तिच्या घरी वडील

नाहीत. फक्त आई होती. या लग्नाचे कर्ज म्हणून रु. २०० मालकाने लावले. त्याचा तपशील रामजीस ठाऊक नाही. कायमचेच गडी म्हणून राबायचे असे रामजी गृहीत धरून चालला आहे. या बायकोपासून रामजीला दोन मुले झाली. ती कधी शाळेत गेली नाहीत. जाणार नाहीत.

'तू सुटलास का ?' या प्रश्नाचे उत्तर रामजीला सरळपणे देता आले नाही. प्रथम 'नाही' म्हणाला. नंतर तो बोलला, 'काळूरामने तू सुटलास म्हणून सांगितले. मी तसे सावकाराजवळ बोललो. पण सावकार काहीच बोलला नाही. मी एक दिवस जायचे बंद केले. मालक दोन-तीनदा घरी आला. आणि कामाला चल म्हणाला. मी म्हटले येत नाही. मालकाला सरकारी कायद्याची माहिती पडली असणार म्हणून तो बोलला नाही. मला त्याने मारलेही नाही.' परंतु रामजीला पुढे काय करायचे हे समजेना. कामही कोठे मिळेना. शेवटी काही दिवसांनी रामजी मालकाकडेच परत गेला. त्याच्याकडे काम होते. मालकाने त्याला काम देऊ केले. रोख मजुरीही देण्यास सुरुवात केली. भूमिसेनेने या गावात किमान वेतनासाठी लढा सुरू केला आहे. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना रु. ३-५० किमानवेतन द्यावे लागते. रामजीलाही रु. ३-५० रोजी मिळतात. पण आता कामाची शाश्वती नाही. मुलाखतीच्या वेळी रामजी या एकाच चिंतेने ग्रासलेला दिसत होता.

चहाडे गावचा केशव बाळू जाधव हा रामजीपेक्षा अधिक काळ बांधीलगडी म्हणून काम करीत होता. अगदी लहानपणी एका शेतकऱ्याकडे त्याने गोवारी म्हणून कामास सुरुवात केली. जवळ जवळ १५ वर्षे गोवारी म्हणून त्याने काम केले. या काळात प्रथम प्रथम नुसती भाकरीच मिळत असे. नंतर महिन्याला १५ अधोली भात, रोज भाकरी आणि चहा मिळू लागला. तसेच दोन वर्षातून एक घोंगडी आणि रुमाल मालक देत असे. केशवचे वडीलही गडी म्हणूनच जन्मभर राबले. केशवला दिवसाकाठी तीनदा गुरे चारण्यासाठी सोडावी लागत. याशिवाय पडेल ते काम करावे लागे. केशव कामावर खूष होता. 'गोवाऱ्याचं काम सुखाचं' असे तो म्हणत होता. केशवने स्वतः पुढाकार घेऊन मालकास सांगितले, 'माझे लग्न करून दे.' मालकाने मान्य केले आणि केशवचे लग्न झाले. मालकाने आपल्यावर मेहरबानी केली असे केशव मानतो. दोघेही नवराबायको गडी म्हणून १४ वर्षे राबण्याचे ठरले. नवराबायकोला प्रत्येकाला रोज एक अधोली भात, भाकरी, चहा अशी मजुरी मिळू लागली. १४ वर्षानंतर केशव 'सुटला' मालकाने कराराप्रमाणे सोडण्यात कुचराई केली नाही.

केशव सुटला तो थेट मुंबईला मच्छिमारीचा धंदा करणाऱ्यांच्या बोटीवर दाखल झाला. हे काम 'एकदम फसक्लास' वाटले. वर्षातून फक्त ८ महिने काम. दिवसाकाठी फक्त १½ तास. बोटीतच मुक्काम आणि खाण्यास मासे भरपूर प्रमाणात. तीन वेळा खाऊनपिऊन वर्षाकाठी रु. ८०० पगार, दरवर्षी रु. ३०० वाढ. आज त्याला रु.

---

१९७५ च्या आणीबाणीच्या काळांत भूमिसेनेने पालघर तालुक्यातील काही गावात पाहणी केली होती व त्यात दोन गोष्टी प्रामुख्याने आढळल्या. एक म्हणजे शेतमजुरांना मिळणारे अपुरे वेतन, जे तेव्हा सर्रास एक पायली भात हे होते व दुसरे लग्नासाठी घेतलेल्या कर्जापोटी लग्नगडी म्हणून राहिलेले बांधील गडी. जेव्हा वेठबिगार निर्मूलन कायद्याखाली त्यांना मुक्त करावयाचे ठरवले. तेव्हा पहिला प्रश्न ह्या लग्नगड्यांच्या मनावर असलेले कृतज्ञतेचे ओझे दूर करून सावकाराने तुमच्यावर उपकार केले नसून उपकाराच्या ओझ्याखाली तुम्हाला वेठबिगार बनवून तुमचे शोषण केले जात आहे, हे पटवण्याचा. लग्नगड्यांना हे पटवत असतानाच त्यांच्या सुटकेसाठी करावयाच्या अर्जाचे नमुने तयार करून ते भरून घेण्यात आले. हे अर्ज तहसीलदार, पोलिस स्टेशन यांना पाठविण्यात आले. गावोगाव या विरोधी जी चळवळ झाली त्या झपाट्यात बहुसंख्य गावातील लग्नगडी स्वतःच्या संघटित ताकदीवरच लग्नगडी ह्या स्वरूपाची वेठबिगारीतून मुक्त झाले.

महाराष्ट्र शासन ज्यावेळी अधिकृतपणे महाराष्ट्रात वेठबिगार नाही म्हणून घोषित करीत होते त्या वेळी भूमिसेनेकडे आदिवासी लग्नगड्यांना वेठबिगारीतून मुक्त केल्याचा ह्याच शासनाच्या तहसिलदाराची आदेश पत्रे होती. आणि ज्या वेळेस शासनाच्या तोंडावर ही आदेशपत्रे आदळण्यात आली त्यावेळेस

१५०० मिळतात. बायको गावीच राहते.

म्हाताऱ्या गड्यांना या गुलामगिरीत वावगे काहीच वाटत नसल्याचे दिसत होते. यात कोठे बिघडले ? असा त्यांचा रोख सवाल होता. लग्न करून दिले, रोज भात दिला, अधून मधून कपडा दिला, आणखी काय पाहिजे ? त्या बदल्यात दिवसभर कष्ट केले तर बिघडले कोठे ? असे ते आवर्जून सांगत होते. या विचारसरणीमुळेच केशवचे लग्न झाले तेव्हा मालकाने मेहरबानी केली, असे त्यास वाटले.

मालकाच्या वाईट वागणुकीबद्दल बऱ्याच गोष्टी ऐकावयास मिळाल्या. काठीने मारणे हा एक वारंवार घडणारा प्रकार होता. तरण्याताठ्या बायकांचा वासनापूर्तीसाठी वापर तीन वर्षापूर्वीपर्यंत होत होता. गेल्या दोनतीन वर्षांतच

**पूर्वी गडी विकण्याचेही प्रकार होते. त्याच्या काही आठवणी वृद्ध गड्यांनी सांगितल्या. एकदा एका मालकाने आपला गडी दुसऱ्यास विकला. त्या गड्यास त्याचा पत्ताच नव्हता. तो बिचारा नेहमीप्रमाणे कामास गेला. तिथे नवीन मालक पाय आपटीत आला व गड्याला फटके मारत मारत घेऊन गेला, अशा गोष्टी अजून इतरत्रही ऐकावयास मिळाल्या.**

आदिवासी भागात बिगर आदिवासी लोकांनी आक्रमण केले; तेथील जमीनी घेतल्या आणि स्वस्त मजूर मिळण्यासाठी ही प्रथा रुजू केली. कोकणात बाहेरचे लोक अशा तऱ्हेने गेलेले दिसत नाही.

---

महाराष्ट्रात वेठबिगार आहेत हे शासनाला मान्य करावे लागले. महाराष्ट्रात वेठबिगारी आहे हे भूमिसेनेनेच प्रथमत: उघड केले.

सुरुवातीच्या ह्या काळात स्थानिक कामगार निरीक्षकांचे फारसे साहाय्य झाले नाही. तरी नंतर मुंबईच्या लेबर कमिशनर कार्यालयाने संपूर्ण महाराष्ट्रांतील बांधील गड्याच्या प्रश्नासाठी नेमलेले सरकारी कामगार अधिकारी श्री. मांडे यांनी बरेच साहाय्य केले. भर धुवाधार पावसात नदी-नाले, चिखल ह्याची पर्वा न करता श्री. मांडे हे भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांबरोबर गांवोगाव फिरले व त्यांनी मजुरांच्या साक्षी घेणे, मालकांना कायद्याची तंबी देऊन लग्नगडी मुक्त करण्यास मदत केली. ह्याच काळात सुटलेल्या वेठबिगारांवर चोरीचे आरोप, प्रत्यक्ष हल्ले, गोळीबार असेही प्रयत्न झाले. पण ह्या सर्व विरोधास न जुमानता भूमिसेनेने ३०० च्या वर लग्नगड्यांचे अर्ज भरून कागदोपत्री पुराव्यावर मुक्तता व इतर शेकडो लग्नगड्यांना निव्वळ संघटनेच्या बळावर लग्नगडी म्हणून सोडवले.

त्याच्या ह्या प्रयत्नाचे व. द. देशपांडे, हुसेन दलवाई, रमेश चौथे, शरद कुलकर्णी यांनी महाराष्ट्र टाईम्स, केसरी, इकानॉमिक अँड पोलीटिकल विकली ह्या व इतर वृत्तपत्रे, नियतकालिकातून समर्थन करून हा प्रश्न देशाच्या पातळीवर मांडण्यास साहाय्य केले.

---

हे प्रकार बंद झाले आणि मारझोड थांबली. असे अनेक गडी प्रांजळपणे सागत होते. परंतु ‘आणीबाणी’ त्यांना माहीत नाही. वेठबिगारीविरोधी कायदा झाल्याचेही फार जणांना माहीत नाही. त्यांना माहीत होते फक्त काळूराम आणि भूमिसेना. ‘काळूरामने कायदा केला आणि आम्हाला सोडवले. काळूरामने कामे काढली आणि रोजगार दिला.’ असे सांगताना अनेक गडी आढळले. काही जणांना ‘जनता’चे राज्य झाले आणि आपली सुटका झाली असेही वाटते. हे काहीही असले तरी १९७६ नंतर मालकांची वागणूक बदलली असे दिसते. बायकांच्या अंगावर हात टाकणे थांबले; मारझोडही कमी झाली. शिवीगाळ मात्र तशीच चालू आहे. धरून खेचून नेण्याचे प्रकारही थांबले.

काल्या मंगल धापशी हा असाच एक नवीन लग्नगडी. त्याचे वडीलही गडीच होते. काल्याच आपण होऊन सावकाराच्या मागे लागला. ‘माझे लग्न करून दे. आम्ही दोघे गडी म्हणून राहू आणि उपकार फेडू.’ सावकाराने पाच मण भात व किरकोळ खर्चासाठी १०० रुपये दिले आणि लग्न लावून दिले. पाच वर्षे बांधीलकी ठरली. करारात १४ बकरी, २ गाई आणि १ बैल ‘लिहून’ घेतले. काल्याने आपल्या बायकोला या कराराचा पत्ता लागू दिला नाही. ‘हे सांगितले असते तर बायकोच मिळाली नसती’ ही त्याची भावना. पण लग्नानंतर हे कळल्यावर बायको रागावली. खूप नाराज झाली. पण नाईलाजाने

[ पान २४ पहा.

असाही वेठबिगार :

# दारक्या गोपाळ फसाळे वय वर्षे अंदाजे ६०

— विजय साठे



ठाणे जिल्हा—कल्याण तालुक्यातील 'बापसई' नावाच्या गावामध्ये फसाळेंच्या अनंत पिढ्या गेल्या. फसाळे हे कातकरी समाजातले. आदिवासी म्हणजे या भागाचे 'मूळ मालक' हे मूळ मालक एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर भयावह गुलामीचे जीवन जगत आहेत.

इतिहासाकडे नजर फिरवली तर अनेक गोष्टी डोळ्या-समोरून सरकतात. ब्रिटिश साम्राज्याच्या आधी 'प्रत्यक्ष जमीन कसणारे' यांचेव्यतिरिक्त कोणी इतर जमिनीचे मालक अशी गोष्ट अस्तित्वात नव्हती. ब्रिटिशांनी भारत पादाक्रांत केल्यावर आपली सत्ता स्थिर व वृद्धिंगत करण्या-साठी याबाबतीत काही मुलभूत बदल केले. काही ठिकाणी जमिनदारी तर काही ठिकाणी रयतवारी व्यवस्था कायम केली. जमीन ही क्रयवस्तू बनवली. तसेच जमिनीचा शेत-सारा पैशांच्या रूपात देणे बंधनकारक ठरले. याचा विपरित परिणाम येथील मूळ मालकांवर झाला. १८०३ ते १८९९ या काळात वारंवार दुष्काळ पडत गेले. दुष्काळाचा फटका आदिवासींना फार बसला. १८९४ मध्ये प्रथमच ब्रिटिशांनी पहिली वननीती जाहीर करून आदिवासींच्या जंगलावरील नैसर्गिक हक्कांवर आघात केला. १९१० ते १९३५ या जागतिक मंदीच्या काळात आदिवासींची विशेषकरून प्रचंड वाताहत झाली. जमिनीचा खरा भरण्यासाठी पैसे नाहीत याचा पुरेपुर फायदा व्यापारी, कंत्राटदार मंडळींनी घेतला व एक-दोन रुपयांसाठी जमिनी घालवाव्या लागल्या. कातकरी सुरुवातीपासूनच भटके होते, या म्हणण्यात अर्थ नाही. एवढेच काय तर १८६१ च्या डिस्ट्रिक्ट सर्व्हे अँड लँड-रेकॉर्डप्रमाणे ८०/९० वर्षांपूर्वी आदिवासी भागातील जमिनी या पूर्णपणे आदिवासी जमातींच्या मालकीच्या होत्या. १९११ सालच्या आकडेवारीनुसार जमीन स्वतः न कसणाऱ्या मालकांची संख्या २८ लाख तर १९३१ मध्ये ४१ लाख होती. १९२१ ते १९३१ च्या दरम्यान शेत-मजुरांची संख्या २ कोटी १७ लाखांवरून ३ कोटी ३५ लाखांवर गेली.

भूमिपुत्रांचे रूपांतर गुलामपुत्रांमध्ये कसे झाले, याचा हा थोडक्यात आढावा.

गुलामपुत्रांचा प्रतिनिधी दारक्या गोपाळ फसाळे. दारक्या बाबांचे वडील बापसईच्या धुंदापाटलाकडे गुलाम होते. हयातभर त्यांनी शेटकडे वेठबिगारी केली व ते मरण पावले.

वयाच्या १० व्या वर्षापासून दारक्या बाबाला आपल्या वडिलांचा वारसा चालवावा लागला. श्रीमान शेठ सावळाराम टेंभे (बापसई) यांचेकडे तो बारीक सारीक कामे करण्यासाठी राहिला. शेठने बाबाच्या पोटाची खळगी भरेल एवढे अन्न द्यायचे व बाबाने पार थकून जाईपर्यंत काम करायचे. वयाच्या पंधराव्या वर्षी दारक्याबाबाचे लग्न ठरले. पोरगी गावातलीच. सासऱ्याने लग्न करायचे मान्य केले. पण २५ रुपयांची खोट येऊ लागली. सावळाराम टेंभेनी मदतीचा फसवा पाशवी हात पुढे केला व दारक्याबाबाची कायमची गुलामी सुरू झाली. प्रथम २५ रुपये दोन महिने काबाडकष्ट करून फेडले या दरम्यान अडीअडचणीला दोन-चार रुपये घेतले गेले. दोन चार खाडे झाले, हे कसे फेडायचे...तर आणखी काम करून... त्यामुळे दोन महिन्यानंतरही वेठबिगारी कायम राहिली.

जगण्यासाठी जमिनीचा आधार नाही की नातेवाईकांचा आसरा. अधेमधे घेतलेली उचल संपली नाही ती तो फेडतच राहिला. अशी वर्षांवर वर्षे जाऊ लागली. शेतीची, घरची पडतील ती–शेट सांगेल ती त्याने कामे गपगुमान करायची काही बोलायचं नाही.

कुठे दुसरीकडे आशेने पाहायची सोय नाही. त्याचे सख्खे दोन भाऊ बुध्या व भिवा म्हसकलच्या शंकरपाटला-कडे वेठबिगार. त्यांच्या बायका शेतीच्या हंगामात शेटच्या बांधील ! इतर हंगामात कवडी मोलाची मोलमजुरी.

दारक्याबाबाला एक चुलतभाऊ सावळ्या तो ही पाटलाकडे गडी जन्मभर पाटलाकडे खपला, राबला, हाडाची काडे केली व पाटलाकडेच्च कामाला असताना वरची वाट धरली.

मुक्ती, सारजी, गिरजी आणि काळी या बाबाच्या चार बहिणी. सारजी आज हयात नाही. तिचा नवरा गंपा म्हस्कलच्या सदूवाण्याकडे लग्नकर्ज फेडण्यासाठी १२ वर्षे खपला. काळीबाईचा नवरा जानू यालाही त्याच्या लग्नाच्या कर्जफेडीसाठी रेवतीच्या इंदिबाई झापडे या शेटाणीकडे गुलामी पत्करावी लागली. बिचारा जानू आज तोही हयात नाही.

दारक्याबाबाला मुलगे तीन–गोपाळ, नकलू व वाळक्या हे तिघेही शेटकडे लहानपणापासून गडी ! जावई बाळू अंबो मुकणे हे सावळारामशेटच्या मुलांकडे वेठबिगार.

या दारक्या बाबाच्या कुटुंबियांनी व जातभाईंनी या भागातल्या अनेकांना लाखोपती केले आहे. जमिनदार, मालदार बनवले आहे. आपली हाडे जमिनीत गाडून त्यांच्या इमल्यांचा पाया भक्कम केला आहे. आपल्या घामाच्या पाण्याने त्यांची शेती केली. फसाळेंच्या आसवांनी टेंभेंची फुलबाग नटवली. डोळ्यात तेल घालून त्यांनी निर्माण केलेल्या शेटच्या संपत्तीचे रक्षण केले आहे. आपल्या थडग्यांवर त्यांना उन्मत्त नाचायला दिले आहे.

स्वतः, स्वतःची पोरेबाळे अंगठेबहादूर राहून शेटची पोरे मात्र शिक्षणाच्या पायरीवर पायरी चढत आहेत. स्वतःचे आजारपण उन्हातान्हात झेलून शेटच्या लोकांना चांगल्यात चांगल्या वैद्यकीय सोयी मिळवून दिल्या आहेत. शेटने त्यांना दरिद्री ठेवून त्यांच्याच आय्. आर. डी. पी. योजनेचे पैसे हस्तगत केले आहेत... थंडी एका गोणपाटा-वर, पावसाळा एखाद्या फाटक्या कांबळीवर तर उन्हाळा अर्धनग्न अवस्थेत काढून शेटच्या या इहलोकातल्या सर्व सुखाचा मार्ग मोकळा करून दिला आहे.

दारक्याबाबाने शेटच्या लाथा तर खाल्ल्याच, पण त्याचा मुलगा गोपाळ एकदा बायकोबरोबर झोपला असता, गोपाळच्या पाठीत जोरदार शेटने काठी मारली. का तर, तो कामावर एक दिवस जाऊ शकला नाही, म्हणून... तर त्या काठीचा वळ गोपाळच्या काळजात अजून तसाच आहे. स्वतः अनवाणी राहून जणू काही स्वतःच्या चामड्याची चप्पल शेटलोकांच्या पायात घालायला दिली आहे. दारक्याबाबाला शेटने सणासुदीला कधी गोडधोड खायला दिलेले आठवत नाही, हिशेब करायला बसले की, त्याच्या डोक्यावरचे कर्ज कधीच फिटलेले नसते. दारक्याचा मधला मुलगा गेल्यावर्षी कंटाळून पळून गेला.

आज दारक्याबाबाची साठी उलटून गेली आहे. भूत-काळ काळ्याकुट्ट अंधाराने माखलेला. प्रत्येक क्षण दुखः दायक. हल्ली वय झालं तरी कामं काही सुटलेली नाहीत. कामाबरोबर इतर गड्यांकडून म्हणजे आपल्याच्च माणसां-कडून काम करवून घेण्याचे संकट शेटने त्याच्यावर आणले आहे... मधला मुलगा पळून गेल्यावर थोडासा अस्वस्थ झालेला... मध्यंतरी थोरल्या मुलग्याला तो म्हणाला, ' अरे तुम्ही तररणेताटम झालात. माझी याच्च शेटकडे वया गेली.. कुठे तरी जा... पुढे कळवा. आपली सोडवणूक करा..." हा निरोप घेऊन गोपाळ निघाला. फिरत फिरत तो शेवटी श्रमिक मुक्ती संघटनाकडे धडकला. सर्व गोष्टी त्याने कार्य-कर्त्यांना सांगितल्या, कार्यकर्त्यांना राहवले नाही. ते त्याच्या गावी गेले. एकंदर परिस्थितीची पाहणी केली. त्यांची खात्री झाली.

आज संघटनेने पुढाकार घेऊन दारक्याबाबा बरोबर त्याच्या भागातील अनेक गड्यांची गुलामीतून, सावकारी मगरमिठीतून मुक्तता करण्यात यश मिळवले आहे.

मुक्तता झाल्यावर लगेचच्च दारक्याबाबा जंगलात गेला आहे... काडोमुळी जमवायला... त्याचा भारा करून विकून पोट भरायला...


आपल्या आयुष्याची ' एकसष्टी ' तो आता खुल्या वातावरणात, मुक्तीचा श्वास घेत... पोटाची खळगी भरण्यासाठी मोळीचा भारा बांधण्यात घालवत आहे... सावकार धार्जिण्या सरकारने काही दिले नाही तरी त्याला चालणार आहे.

... थोड्याच्च अवधीत दारक्याबाबा निसर्गात विलीन होईल... मात्र ' त्या ' दऱ्याखोऱ्यांतून ' मुक्तीची ' गर्जना सतत कानी येत राहील... गुलामीच्या शृंखला तुटल्याचा खणखणाट ऐकू येत राहील... !

□

# वेठबिगार थांबलेल्या वाटा .... कोंडलेले आभाळ .... !

जयप्रकाश दगड, लातूर



' मुक्या लोकांची संस्कृती ' हा शब्द भारतातील वेठबिगारांच्या संदर्भात वापरला, तर ते तितकेसे वावगे ठरणार नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या नव्या नवलाईची तरुणाई संपून ते आता चाळीशीत आले खरे, पण तरीदेखील समृद्ध तंत्रज्ञानाचा हव्यास घेतलेल्या आणि एकविसाव्या शतकाकडे झेपावण्याच्या वार्ता करणाऱ्या या देशात ५० लाख वेठबिगार गुलामगिरीत खितपत पडावेत आणि शोषितांची ही संस्कृती मुकी होऊन पिढ्यान्‌पिढ्या खाणींवर, जमीनदारांकडे राबत राहावी, हे आपल्या समाजमनाच्या बधीरतेचे लक्षण नाही काय ?

वेठबिगार कोणाला म्हणावे, या संदर्भात प्रचलित व्याख्या काहीही असली, तरी भारताचे माजी सर्वोच्च न्यायाधीश श्री. पी. एन. भगवती यांनी केलेले वर्णन अधिक भेदक वाटते. ते म्हणतात, ' जनावरांपेक्षाही हीन दर्जाचे जीवन जगणारे वेठबिगार म्हणजे माणूसपण नाकारले गेलेले, सभ्य-सुसंस्कृत समाजाच्या परिघाबाहेरचे हद्दपार निर्जीव प्राणी...'

भुकेल्या जनावरांना निदान मन मानेल तेथे इकडेतिकडे फिरण्याचे, कोठेही तोंड खुपसण्याचे व अन्न मिळविण्याचे स्वातंत्र्य तरी असते, परंतु स्वातंत्र्य हिरावून घेतलेल्या, गुलामीत जखडल्या गेलेल्या या बहिष्कृतांना पोटाची खळगी भरण्यासाठी कदान्नाच्या काही तुकड्यांवर समाधान मानून खुराड्यातच खुरडत खुरडत आयुष्य जगावे लागत असेल, तर--

स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ? कुठे स्वातंत्र्य ? हा कविवर्य वसंत बापटांनी विचारलेला सवाल आजच्या तरुण पिढीने या समाजव्यवस्थेलाच आता विचारला पाहिजे.

वेठबिगारी जिणे जगणारे हे असहाय्य दीन-दुबळे पर्यायच नसल्याने, भूक आणि दारिद्र्यामुळे गुलामीच्या अशा खोल गर्तेत लोटले गेले आहेत की या परिस्थितीतून सुटका होण्याची किंचितही अपेक्षा या शोषक समाजव्यवस्थेकडून ते करू शकत नाहीत. " कर्जफेड करण्यासाठी अमर्यादित काळापर्यंत बिगारी श्रम करण्याचा करार ", अशी राष्ट्रसंघाने वेठबिगारीची व्याख्या केली आहे. व्याजाचे अवाजवी दर आणि मजुरीचे अप्रत्यक्ष दर यासारख्या अनेक कारणांमुळे एकदा माणूस त्या कर्जाच्या जाळ्यात सापडला की, त्यातून मुक्त होणे महकर्मकठीण असते. कर्जाचा बोजा दिसामासांनी वाढतच राहतो आणि मग ह्या शापितांच्या पोराबाळांनाही हे कर्ज फेडण्यासाठी आपले आयुष्यच गहाण टाकावे लागते. यातूनच गुलामांच्या पिढ्यामागून पिढ्या निर्माण होतात.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले खरे, पण या स्वतंत्र भारतात आदर्शभूत राज्यघटना असतानाही ( जिच्यात लोकशाही, निधर्मी, समतावादी नि पुरोगामी तत्त्वे आहेत ) वेठबिगारीची पद्धत १९७६ पर्यंत अनिर्बंध फोफावत राहिली. त्यानंतर कोठे शासनकर्त्यांना जाग आली आणि वेठबिगार पद्धती ( निर्मूलन ) कायदा १९७६ अस्तित्वात आला. तेव्हापासून कायद्याने ही पद्धत बंद करण्यात आली. कायदा होऊन आज एका दशकाहूनही अधिक काळ लोटला अन् तरीही भारतीय संघराज्यातील १० राज्यात २६ लाखांपेक्षाही अधिक वेठबिगार आहेत, असे राष्ट्रीय श्रमसंस्था आणि गांधी शांती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त अभ्यासावरून सिद्धच झाले आहे. पण या क्षेत्रातील जाणकारांच्या मते, आज संपूर्ण देशात कमीतकमी ५० लाख स्त्री-पुरुष, बालमजूर या क्रूर, मानवताहीन वेठबिगारीच्या प्रथेत पिचत पडले आहेत.

१९७६ साली कायदा अस्तित्वात आल्यापासून शासनाच्या आकडेवारीनुसार केवळ १ लाख २० हजारांच्या आसपास वेठबिगार मुक्त करण्यात आले. कायदा केल्यामुळे वेठबिगारी निर्मूलनासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे शासनाला क्रमप्राप्तच आहे. प्रत्यक्षात मात्र वेठबिगारांच्या मुक्तीसाठी धडपडणाऱ्या वेठबिगार मुक्ती मोर्च्यासारख्या स्वयंसेवी संघटनेला शासन विरोध करते, हा विरोधाभास आकलनाच्या पलिकडचा आहे.

### वसालची कहाणी

प्रत्यक्षात वेठबिगारी असते कशी, हे जाणून घ्यावयाचे झाल्यास ' हिंदुस्थान टाईम्स ' या मोठ्या वृत्तपत्राने आणि लंडनच्या ' टाईम्स 'ने ज्या बातम्या प्रसिद्ध केलेल्या आहेत त्यांचे उदाहरण घेता येईल. '... ११ वर्षांपूर्वी वसाल, त्याची पत्नी व मुले वेठबिगार झाली. अज्ञान, दारिद्र्य आणि अगतिकता यामुळे ते स्वतः फसवले गेले. एका वीटभट्टी ठेकेदाराच्या दादागिरीला नि फसवणुकीला ते बळी पडले. ते सर्वजण आता 'त्या मालकाची मालमत्ता' आहेत. ६० वर्षीय अस्थिपंजर झालेल्या वसालच्या मनात त्याबद्दल काही तीव्र भावना नाहीत. आपल्या नेहमीच्या स्वरात शांतपणे तो म्हणाला, " जगण्यासाठी माझ्याकडे प्रथमपासूनच काही नव्हते. पाच एकराच्या तुकड्याचा मी गरीब धनी. पण या जिण्यापेक्षा वीटभट्टीच्या कामावर आपले कुटुंब घेऊन जाणे मला योग्य वाटले, जर मी अन्य माणसांनाही कामावर आणले, तर कमिशन देण्यात येईल, असे मला सांगण्यात आले होते. मी त्यावर विश्वास ठेवला. त्यातून थोडेफार पैसे मिळतील, अशी आशा होती. माझ्या पंचवीस नातलगांसह मी ८० माणसांना तयार केले, पण मला मालकाने मूर्ख बनवून फसविले. त्याने मला असे सांगितले की मला ६ हजार रुपये आगाऊ देण्यात आले आहेत आणि त्या रकमेची फेड मला काम करून करावी लागणार आहे. ही शुद्ध फसवेगिरी होती.

पहिल्या सात वर्षांत आम्हाला एकही दिडकी देण्यात आली नाही. जेवणदेखील अपुरे मिळत असल्यामुळे आम्हास अर्धपोटी रहावे लागे. अशा रीतीने आठवड्याचे ७ दिवस आणि दिवसभरात १६ तास आम्ही काम केले. कित्येक वर्षे मला सुट्टी ही गोष्टच ठाऊक नव्हती. चार वर्षांपूर्वी मला गावाकडे जाऊन येण्याची परवानगी मिळाली. मी परत यावे म्हणून मालकाने काही कुटुंबे ओलीस ठेवून घेतली होती. त्यानंतर प्रत्येक दोन वर्षांनंतर मालक मला घरी जाऊन येण्यास परवानगी देऊ लागला. ३–४ वेळा मला मारहाण करण्यात आली आहे. मालकाच्या गुंडांनी माझ्याशी दादागिरी तर अनेकवेळा केली आहे. पण भट्टीवर काम करणाऱ्याला ही दादागिरी म्हणजे नित्याची बाब आहे. आम्ही पळून जाऊ नये म्हणून आमच्यावर सक्त पहारा आहे..."

१९८१ च्या एप्रिलमध्ये वसाल निसटला आणि दिल्लीला येऊन त्याने बंधुआ ( वेठबिगार ) मुक्ती मोर्चाशी संपर्क साधला. दिल्लीपासून ९२० मैल दूर पंजाबात बंधुआ मुक्ती मोर्चाची माणसे ट्रकने गेली आणि त्यांनी वसालच्या कुटुंबांची सुटका केली. त्यास दिल्लीपासून १५ मैलांवरील एका वीटभट्टीवर काम देण्याची सोयही झाली. येथेही कष्ट तर करावेच लागतात, पण निदान वसाल, त्याची पाच मुले व तीन नातू यांना कामाचा नियमित मोबदला मिळतो, आणि मुख्य म्हणजे, कोठेही जाण्यासाठी त्यांना आता स्वातंत्र्य आहे.' वसालची ही कहाणी वृत्तपत्रातून बरीच गाजली होती. पण तरीही देशात वेठबिगारी करीत असलेल्या हजारो वसालांची कर्मकहाणी संपली नाही. थांबलेल्या वाटा आणि कोंडलेले आभाळ घेऊन ही कर्मकहाणी अद्यापि सुरूच आहे. तिचे अध्यायामागून काळे अध्याय अधूनमधून प्रकाशात येतात आणि तरीदेखील डोळे असूनही आंधळी असलेल्या व कान असूनही बहिरी असलेल्या समाजव्यवस्थेला ते अध्याय बेचैन करू शकत नाहीत, अशी ही शोकांतिका आहे.

### काशिराम धोत्रेही तशाच जाळ्यात

मराठवाड्यातील काशीराम रामा धोत्रे या वेठबिगाराने दि. १० फेब्रुवारी १९८६ रोजी लातूरच्या कामगार न्यायालयात सादर केलेले प्रतिज्ञापत्रही बोलके आहे. काशीराम हा मूळचा कंधार तालुक्यातील माळाकोळी ( जि. नांदेड ) या गावचा रहिवासी. सुमारे ४५ वर्षे वयाचा काशीराम व त्याची पत्नी पद्मिनीबाई हलाखीच्या दारिद्र्याला कंटाळून, पोट जाळण्यासाठी मजुरी करण्याच्या इराद्याने नांदेडला गेले. तेथे त्यांना एस. एस. कंपनीचा हणमंत नामक मुकादम भेटला. हणमंतने त्यांना नानकवाडी येथे खडी फोडण्याच्या कामावर चालण्याचा आग्रह केला. तेथे ब्रासला ५० रुपये मिळतील असेही सांगितले. त्यावेळी हणमंतने १६० रुपये उचल देऊन आपणास बांधून घेतले असे काशीराम सदर प्रतिज्ञापत्रात म्हणतो.

काशीरामने पुढे म्हटले आहे की, मी व माझी पत्नी असे दोघांनी आठवडाभर खडी फोडून ३ ब्रासची भरती केली आणि त्याबद्दल पगाराच्या दिवशी आम्हाला त्यांनी केवळ २५ रुपये दिले. याबाबत चौकशी केली असता मुकादमाने मला दमदाटी करून मारले आणि बजावले की

आम्हास आठवड्यास ३ ब्रास खडी फोडून पाहिजे. बाकी आम्हास काही माहीत नाही. जास्त कमी शहाणपणा केलास तर तुझा जीव घेईन. येथे आमचे कोणी काहीही वाकडे करू शकत नाही.

### हणमंताकडून वामनने काशिरामला विकत घेतले

या भीतीमुळे आपण येथे वर्षभर निमूटपणे त्रास भोगत काम केले. अचानक एके दिवशी परळीच्या परमार कंपनीचा मुकादम वामन याने एस. एस. कंपनीच्या मार्फत आपली भेट घेतली व सांगितले की तू आमच्याकडे खडी फोडण्याच्या कामास चल. तेथे तुला ब्रासला ६० रुपये देऊ. त्यावेळी कंपनीचा मुकादम हणमंता याने, आपल्यावर मागील १६० रुपये उचलीचे व्याजसहीत ७०० रु. बाकी दाखविली. तेव्हा ही बाकी परमार कंपनीच्या मुकादम याने हणमंतास देऊन टाकली व आपल्याला बांधून घेतले. त्यानंतर आपण पूर्णा पेडगाव, बोरगाव व गंगाखेड येथे काम करीत होतो. गंगाखेड येथे रेल्वेलाईनच्या बाजूस काम करू लागलो. तेथे आपल्याकडून आठवड्यास एक ट्रक गिट्टी फोडून घेतली जात असे. त्यांच्या मोबदल्यात आम्हास ५० ते ६० रुपये दिले जात. व बाकीची रक्कम फेडून घेत आहोत, असे सांगितले जाई. ही मजुरी परवडत नाही म्हणून आपण कंपनीच्या मुकादम व वॉचमन यांना विनंती केली, तेव्हा त्यांनी आपणास दारू पिऊन शिवीगाळ व मारहाण केली व आपणावर जबरदस्तीने दडपण आणून काम करवून घेऊ लागले.

शेवटी १७ सप्टेंबर १९८५ रोजी आपण वेठबिगार मुक्ती मोर्चाचे कार्यकर्ते श्री. सुभाष निंबाळकर यांच्या मदतीने गंगाखेडच्या तहसीलमध्ये प्रतिज्ञापत्र सादर केले. त्यानंतर आपली या त्रासातून सुटका करावी, अशी विनंतीही आपण वेठबिगार मुक्ती मोर्चाच्या कार्यकर्त्यांना केली. त्यानंतर काही दिवसांनी आम्हा सर्वांना गंगाखेड येथील काम संपले, असे सांगून पूर्णा येथे आणण्यात आले. व आपण पूर्णेजवळ रेल्वेलाईनच्या बाजूस काम करू लागलो, असेही काशीराम धोत्रे याने आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

एके दिवशी अचानक तेथे परभणी जिल्ह्याचे सरकारी कामगार अधिकारी आले असल्याचे मुकादमाने सांगितले. त्यावेळी मुकादमाच्या सांगण्यावरून आपण व आपल्या पत्नीने अंगठे केले. हे आंगठे मुकादमाच्या भीतीपोटी व दडपणामुळे आम्ही केले असून त्यात जो काही मजकूर आहे तो आपणास माहीत नाही, असे काशीरामने शपथपूर्वक या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

निलंगा तालुक्यातील मौजे काटेजवळगा येथील वेठबिगारांची दयनीय स्थितीही श्री. निंबाळकर यांच्या अविरत पाठपुराव्यामुळे दीडवर्षापूर्वी प्रकाशात आली होती. दै. 'लोकमत' मधून सर्वप्रथम या प्रकरणाकडे लक्ष वेधण्यात आल्यानंतर अन्य वृत्तपत्रातूनही त्या प्रकरणाचा बराच गाजावाजा झाला.

### शासनाचा पंजा कार्यकर्त्यांवर

काटेजवळग्याचे दंडगोळे काय, माळकोळीचा काशीराम धोत्रे काय किंवा वर उल्लेखिलेला वसाल काय, या सर्वांच्या नशिबाला बांधलेला गच्च अंधार आज टाहो फोडून प्रकाशाची वाट मागतो आहे. ही प्रकाशाची वाट दाखविण्याचे जे प्रयत्न करतात, त्यांना सहाय्य करण्याऐवजी कायद्याचा पंजा त्याच्याभोवती आवळण्यात येतो.

उत्तर भारतातील हरियाना राज्याच्या (तत्कालीन) मुख्यमंत्र्यांनी बंधुआ (वेठबिगार) मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष स्वामी अग्निवेश यांनाही चेतावनी दिली होती की वीटभट्टी कामगारांना भडकवून शांतताभंग केल्याबद्दल तुरुंगात टाकता येईल. भारतीय सुरक्षा कायदा वापरून त्याला बंद करता येईल... (इंडियन एक्स्प्रेस – ७ मे १९८१)

स्वामी अग्निवेश हे भूतपूर्व मंत्री होते. ते आंतरराष्ट्रीय किर्तीचे असल्याने त्यांच्यावर बंधन आणणे कठीण आहे. पण ज्यांना क्रूरपणे वागविले जाऊ शकते असे इतर हजारो कार्यकर्ते आहेत. उदा. १ जून १९८३ रोजी असे उघडकीस आले की, बिहार राज्यातील सिंगभूम जिल्ह्यातील पाच आदिवासींना पोलिस जीपमागे दोरीने बांधले गेले आणि शंभर मीटर अंतरापर्यंत फरफटत नेले गेले. त्यानंतर गुवा या गावातील भर बाजारात त्यांना आडव्या लाकडावर लटकावून जबरदस्तीने मारहाण करण्यात आली. त्यात एक कार्यकर्ता मरण पावला. (इंडियन एक्स्प्रेस १ जून १९८३)

### सत्ता कोणाचीही असो...

हे प्रकरण बिहार विधानसभेतही गाजले. वृत्तपत्रातून या प्रकरणाला भरपूर प्रसिद्धी मिळाली. अर्थात अशी अवस्था जेथे कॉंग्रेस सत्तेवर आहे अशा प्रांतातच आहे असे नाही. विरोधी पक्षाची सत्ता असलेल्या आंध्र प्रदेशातही, पोलिसांशी झालेल्या चकमकीत कार्यकर्त्यांचा मृत्यू झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. बहुतेक वेळा हे मृत्यू पाठीमागच्या बाजूने डोक्यात मारलेल्या गोळीच्या जखमांमुळे झाले आहेत. मृत्यूवेळी पाठीमागे हात बांधलेले सापडले

[ पान २७ पहा.

# व्यथा कोळसा मजुरांची....

— रमाकान्त पाटील



### कातकरी अजूनही मागेच...

महाराष्ट्रभर आदिवासी-दलित तसेच ग्रामीण गरिबां-मध्ये अनेक संघटना / संस्था काम करीत असून ठाणे / रायगड जिल्ह्यातही असे अनेक लहान-मोठे गट आपापल्या क्षेत्रात, आपापल्या मर्यादित शक्तीनिशी काम करीत आहेत. ठाणे जिल्ह्यात वारली, महार कोळी इ. ची संख्या मोठी तर त्यामानाने कातकरी समाज अल्प प्रमाणात. भयानक दारिद्र्य, अमानुष शोषण अशा स्थितीत जगणाऱ्या ह्या समाजाला जागं करण्याचं काम गोदाताईंच्या नेतृत्वा-खालील चळवळीनं केलं. पण गोदाताईंच्या नेतृत्वाखाली ह्या चळवळीत भाग घेतला तो प्रामुख्याने वारल्याने. मल्हार कोळीही ह्या चळवळीत ओढले गेले. पण अगदी मर्यादित प्रमाणात दारिद्र्यात खितपत पडलेला, सामाजिक दृष्टयाही मागासलेला असा 'कातकरी समाज' मात्र ह्या सर्व चळवळीपासून दूरच राहिला. ठाणे जिल्ह्यात हा समाज बहुतेक साऱ्याच तालुक्यात विखुरलेला आहे. तर महा-राष्ट्रात इतरही जिल्ह्याच्या मानाने तो रायगड जिल्ह्यात मोठ्या संख्येने आहे. महाराष्ट्रातील या समाजाच्या एकूण १४६८७५ लोकसंख्येपैकी १२३८९३ केवळ ठाणे/रायगड जिल्ह्यात आहे. कातकरी हा शब्द काथ करणारा ह्यावरून रूढ झाला. पूर्वी काथ करणाऱ्या व्यवसायात हे लोक होते नंतर ह्या व्यवसायाकडून ते इतर व्यवसायाकडे वळले. शेती नाहीच त्यामुळे मजुरीवर उदरनिर्वाह.

ठाणे / रायगड जिल्ह्यात कातकरी मोठ्या प्रमाणावर असले तरीही त्यांचे स्वतंत्र असे गाव नाही. कातकरीवाडी किंवा कातकरी पाडा म्हणून गावाबाहेर स्वतंत्र ठिकाणी त्यांची वस्ती आढळून येते. ह्या पाड्यावर ना कसली सोय. "... तुम्हाला ह्या पाड्यांवर साधी पिण्याच्या पाण्याची विहीरही दिसणार नाही. इतर सोयी तर बाजूलाच." हे सरकारी पाहणीतील उदाहरण त्या दृष्टीने बोलके आहे.

### गागोदे, सरकारी प्रतिष्ठेचे गाव, पण स्थिती...

गागोदे हे पेण तालुक्यातील कातकऱ्यांची वस्ती असलेलं एक गाव. पण भूदाननेते आचार्य विनोबाजींचं जन्म-गाव म्हणून ह्या गावाला स्वतःची एक प्रतिष्ठा आहे. विनोबाजी देशाचं श्रद्धास्थान त्यामुळं सरकारी योजनांचे यादीतही हे गाव पहिल्या नंबरवर. साहजिकच ह्या गावातील दारिद्र्य संपवावं म्हणून शासन आपल्या पद्धतीने (पुरेपूर?) झटतंय. अर्थात दारिद्र्यातून बाहेर काढायचं तर लोका-पर्यंत पोचायला तर हवं. त्यात ही सारी वस्ती दूर डोंगरावर. तेथपर्यंत पोचायला ना धड रस्ता. पण मग सरकारी अधिकाऱ्यांनी आपलं डोकं वापरलं. त्यांनी प्रथम ह्या सर्व वस्तीसाठी घरकूल योजना तयार केली अन् डोंगरातून सर्व वस्तीच खाली आणून खोपोली-पेण रस्त्यालगत त्यांना वसवलं. १०'×१०' ची सुमारे ८५ घरे बनवून देण्यात आली. त्यानंतर पाड्यावर जाणारा रस्ता रोजगार हमी योजनेखाली सुरू करण्यात आला. काही आर्थिक उन्नतीच्या योजनाही म्हणे राबविण्यात आल्या. पण गागोद्याच्या ह्या वस्तीचं चित्र काय आहे? एक तर सरकारनं बांधून दिलेल्या घरकुलावर लोक समाधानी नाहीत. दर दुसऱ्या बाजूला आर्थिक उन्नतीसाठी एका योजनेंतर्गत जे बकऱ्या वाटप करण्यात आले त्याचा इतरत्र जसा बोजवारा उडाला तसाच इथेही. आणि आज ठराविक काही कुटुंब सोडली

तर सारी वस्तीच रोजगार मिळवण्यासाठी रत्नागिरी / सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोळसाभट्ट्यांवर कामाला जातेय.

## गागोद्यापेक्षा वेगळं चित्र नाही

एकट्या गागोद्याचंच हे चित्र नाही तर ठाणे / रायगड जिल्ह्यांतील सर्व कातकरी पाड्यांवर हीच परिस्थिती आपणास दिसून येईल. त्यामुळे गेल्या ७-८ वर्षांपासून काम करणाऱ्या लहान मोठ्या गटांना प्रारंभीच्या काळात एक फार मोठी अडचण भासत असे. त्या भागात मोठ्या संख्येने असलेला हा कातकरी वर्षातील ८ महिने घरी सापडत नसे. दिवाळी संपली की तो जो बाहेर पडे तो ऐन पावसाळा सुरू होण्याच्या वेळीं घरी परत फिरे. म्हणजे कोळसा-वीटभट्ट्यांवर काम हा मुख्य व्यवसाय तर शेतमजूरी लाकूडफाटा विकणे हा दुय्यम. यापैकी वीटभट्ट्यावरील कामासाठी जिल्ह्यातील जवळपासच्या तालुक्यात स्थलांतर करावं लागतं तर कोळसाभट्टीसाठी रत्नागिरी / सिंधुदुर्ग सारख्या लांबवर जिल्ह्यात आठ महिने राबावे लागते आणि हे स्थलांतर वर्षानुवर्षे आता नित्याचच होऊन गेलंय.

## कोळसाभट्टी कामगार संघटनेची स्थापना

पण ते नेमके कोणत्या गावात जातात, त्यांच्या कामाचं निश्चित स्वरूप काय, मजुरी किती मिळते, तेथे ते राहतात कसे इ. अनेक प्रश्नांनी उत्तरे शोधण्याचा आम्ही प्रयत्न करीत असू. ह्यादृष्टीनं मग आमच्यापैकी काही गटांनी संबंधित पाहणी केली. माहिती गोळा केली आणि यातूनच काही गोष्टी स्पष्ट झाल्या. त्यातून जुलै ८५ मध्ये सर्व गटांनी मिळून यावर एकत्रित विचार करण्याचे ठरविले गेले. तशी एक बैठक शिरवली येथे ३ जुलै रोजी घेण्यात आली. बैठकीला ठाणे/रायगडमधून १४ संघटनांचे प्रतिनिधी हजर होते. याच बैठकीत ह्या प्रश्नावर एकत्रित कृतीचा निर्णय झाला व त्यासाठी 'कोळसाभट्टी कामगार संघटना' ह्या नावाने काम करायचं ठरलं. ठाण्यांतील भूमीसेना, कष्टकरी संघटना, श्रमजीवी संघटना, श्रमिक मुक्ती संघटना तर रायगडमधील श्रमिक क्रांती संघटना, निर्मिती, खारडोंगर मेहनत आघाडी, जागृत भाऊबंदी संघटना, सुधागड तालुका संघर्ष समिती, परिवर्तन ८४, रूरल कम्युन्स, आदिवासी जाणीव जागृती केंद्र व रत्नागिरी जिल्ह्यातील श्रमिक सहयोग इ. संस्था संघटनांनी ह्या प्रश्नात लक्ष घालायचं ठरवलं.

दोन्ही जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी प्रश्नाचे स्वरूप समजावून घेतले व एकमेकांनी करावयाच्या सहकार्याची ढोबळ आखणी केली. चर्चा जितकी महत्त्वाची होती तितकच महत्त्वाचं होतं कोळसाभट्टीच्या धंद्यासंबधी अधिक माहिती मिळवणं व कदाचित त्याहीपेक्षा महत्त्वाचं प्रत्यक्ष कोळसाभट्टी पाहणं, तिथल्या मजूरांना भेटणं. चिपळूण भेटीत आम्ही ह्यात मर्यादित यश मिळवलं. सुरुवातीला ह्या धंद्यात असणारे मालक माहिती देण्याचच नाकारू लागले. पण एक मालक हाती लागले. स्थानिक इंदिरा कॉंग्रेसचे हे कार्यकर्ते त्यांनी ह्या धंद्याची शक्य ती सारी माहिती दिली. आम्ही सारे कार्यकर्ते विद्यार्थी म्हणून त्यांचेकडून माहिती घेत होतो. अन् ते आमच्या प्रश्नांची मोकळेपणानं उत्तर देत होते. ह्या मालकांबरोबरच्या भेटीनंतर प्रत्यक्ष कोळसाभट्टीवर आम्ही कार्यकर्ते रवाना झालो. तिथं पोचलो तर काळूराम धोदडेनी बोलताबोलता तिथल्या मजुरांशी दोस्तीही करून घेतली. ठाणे जिल्ह्यातील जव्हार / मोखाडे भागातीलच हे लोक होते. काळूरामने त्यांना मजूरी, राहण्याची सोय इतर सोयीबद्दल विचारून घेतलं. दुसरीकडं भट्टी रचण्यापासून कोळसा तयार होईपर्यंतची पद्धती अशोक / राजीव / सुरेखा इ. समजून घेत होते. माहिती जशी मिळू लागली तशी अधिक माहिती घेण्याची उत्सुकता वाटू लागली. पण इथनं तर आता निघणं आवश्यक होतं. नंतर भेटू असं आश्वासन देऊन आम्ही मग निघालो. चिपळूणहून परत आलो अन् माहिती गोळा करण्याच्या मागे लागलो.

आतापर्यंत अनेक प्राथमिक गोष्टींची माहिती आम्हाला मिळाली. प्रत्यक्ष भट्टीवर जाऊन आल्यानं तेथलं स्वरूपही काही प्रमाणात समजू शकलं. प्रत्यक्ष कामावर जाणारे मजूर / मुकादम / मालक यांचे एकमेकांचे संबंध-हितसंबंध ओळखण्याचा आम्ही प्रयत्न करू लागलो.

## अडलेला मजूर बांधीलकीच्या कचाट्यात...

ह्या कामासाठी पावसाळ्याच्या काळात म्हणजे नागपंचमी, गौरी-गणपती, दिवाळी इ. सणासुदीच्या काळात कोळसाव्यापारी ह्या कामगारांना १००-५००-१००० रु. पर्यंत उचल देऊन बांधून घेतात. विशेषतः रोपणी संपल्यानंतर कापणीपर्यंतच्या काळात ह्या मजुरांना कोणतेही काम नसते घरी काही साठवून ठेवलेलं म्हणावं तर तेही अशक्य. मग उपासमार हाच पर्याय मग ह्या असहायतेचा गैर फायदा हा मालकवर्ग बरोबर घेतो. अडलेला हा मजूर, ना काही भाव ठरवून घेतो ना इतर काही चौकशी. मग दिवाळी आटोपली की निघतो वनवासाला.

## ...कोंबड्या कुत्र्यांसह जगायला...

ह्या कामगारांना खर्ची देण्याचेवेळी मजुरांपैकीच एका

पुढाऱ्याला मालक मध्यस्थीसाठी घेतो. यालाच मुकादम म्हणतात. मजुरांना खर्ची दिल्यानंतर त्यांना कामावर घेऊन येणे, तेथे काम करून घेणे इत्यादी सारी जबाबदारी मग मुकादमावर. कामावर निघण्याचा दिवस मालक ठरवून त्याप्रमाणे मुकादमाकडे जबाबदारी सोपवतो. दिवस ठरल्याप्रमाणे मग ट्रक गावी हजर होतो. बायका–मुलं— कोंबड्या-कुत्र्यांसह मग बिऱ्हाडं निघतात जगायला.

## कोळसाभट्टीची रचना व कामाचे स्वरूप

इथं कामावर आले की मालकानी जंगल पाहून ठेवलेलं असतं तिथं 'आवसा' ( घर ) टाकून मुक्काम ठोकतात. मालकाला जंगल मिळालं नाही तर हे आपले बिनमजूरीचे कसेबसे दिवस ढकलत राहतात. मालकानं जंगल दाखवलं की झाडे तोडणे, एकत्र गोळा करणे, नंतर एक जागा साफ करून तेथे लाकडे, त्यावर गवत व वर मातीचा थर देऊन भट्टी पेटवतात. भट्टी पेटवली की आता मात्र डोळ्यात तेल घालून ती ज्वाळ धरू नये म्हणून राखायची असते. दिवस–अन् रात्र असा हा जागता पहारा द्यावा लागतो. कुठं ज्वाळ धरला तर लगेच तिथं माती टाकून ते थांबविण्याचं काम करावं लागतं. ८–१० दिवसानंतर भट्टी पेटली की मग पाण्याने कोळसा विझवण्याचं काम करावं लागतं. ह्यासाठी साधारणपणे सर्व भट्टीतील मजुरांना दूरवरून डोंगर चढत पाणी आणावं लागतं. प्रामुख्यानं स्त्रिया हे काम करीत असतात. काही ठिकाणी तर हे अंतर १ ते १॥ मैलसुद्धा असते. अर्थात त्याबद्दल तक्रार करायचा प्रश्नच नसतो.

यात झाडे तोडणे, त्याचे लहान तुकडे करणे हे काम पुरुष तर भट्टीसाठी जागा तयार करणे, पाणी आणणे, भट्टी राखणे इ. कामे स्त्रिया व मुले करीत असतात. दिवसातील २४ ही तास मरेस्तोवर खपायचं. इथं कसला आलाय कामाच्या तासांचा हिशोब? कातकऱ्यांनी दिवसातील २४ तास कामासाठी उपलब्ध राहणं आवश्यक असत.

## निराशेत आधार...

आम्ही एप्रिल ते जून या काळात ह्या भट्ट्यांवर प्रत्यक्ष जाऊन आलो, मजुरांशी बोललो, त्यांच्या बैठका घेतल्या. पाहिलं ते सारंच चीड आणणारं– संतापजनक ! सुरुवातीला आम्ही कोण ? कशासाठी फिरतोय अशा एक ना अनेक शंकाकुशंका. "मालक बेस हाय, आमास्नी अथवर आनतं न सोडतं हो तोच, शिमग्याला कपडालता देतं— पोसत पन देतं" अशी मालकांची तरफदारी ऐकून तर आम्ही हतबलच होत असू. फसवणूक स्पष्ट दिसतेय पण त्याची जाणीव नाही अशी स्थिती. पण त्यातही आधार सापडतो राजापूर तालुक्यात येळवण / लिंगमवाडी भागात काम करणाऱ्या पेण तालुक्यातील खडकी हेटवणे या गावातीलमजुरांना भीमा शेठ नावाच्या एका व्यापाऱ्याने मागील वर्षाची बाकीच दिलेली नाही. अशी तक्रार अनेकांकडून आली. हेटवण्याच्या यशोदा कान् हिला घेऊन आम्ही त्या व्यापाऱ्याची भेट घेतली. प्रथम तो काहीच कबूल करेना पण आमच्याबरोबर काम करणाऱ्या राजापूर तालुक्यातील मोहन नारकरने आपली शैली वापरली अन् नंतर तो नरमला व मागील बाकी देण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे ही बाकी दिली गेली. ह्या मजूरांकडून त्या परिसरातील इतर मजुरांपर्यंत ही बातमी पोहचायला फारसा काळ गेलाच नाही. आणि परिणाम असा झाला की मजुरांच्या तक्रारी आता भट्टीवर गेल्या गेल्याच कानी पडायला लागल्या. आम्हीही तसे नवीनच. पण एकेक गोष्टी समजायला लागल्या. रोज एकेक करून व्यापाऱ्यांच्या लबाड्या दिसू लागल्या. हिशोब करताना जाण्या–येण्याचा प्रवास खर्च ( रस्त्यात ट्रॅफिक–पोलीसांना द्यावे लागणारे हप्तेही त्यात धरलेले असायचे) शिमग्याला दिलेल्या कापडाचे पैसे (दामदुपटीने किंमत लावून ), हत्यारांना धार लावण्याचे पैसे, पोत्यांचा हिशोब व्यवस्थित न ठेवणे, ठरविलेल्या भावापेक्षा कमी भावात हिशोब असे कितीतरी फसवणूकीचे रस्ते. पाऊस पडेपर्यंत कामे सुरू ठेवायची व पाऊस सुरू झाला की त्या मजुरांनाही घरी जायची घाई. मग कुठला हिशोब न् कसले काय ? कुणाच्या अंगावर ३०० तर कुणावर ६०० बाकी. कुणाला १०० तर कुणाला जास्तीत जास्त ५०० ते ८०० रुपये हातात देऊन मोकळे करायचं. अनेकांचे अंगावर बाकी ही वर्षानुवर्षाची परंपरा. काहींना घरी परतायला पैसे नसतात मग तेथून २०० मैलावरील आपल्या घरी पायी निघणे ह्याशिवाय पर्याय नाही.

पूर्वी मालकाच्या जाचाला वैतागून कोणी मजूर पळून गेले तर पोलिसांना त्याची खबर दिली जाई. मग पोलिस त्याला पकडून पुन्हा मालकाच्या ताब्यात देई व मालक त्याला आपल्या कामावर पोहचविण्याची व्यवस्था करी. आम्ही चिपळूणला एका व्यापाऱ्याकडे ह्या अनुषंगाने मजूर पळून गेला तर तुम्ही काय करता असा एक प्रश्न विचारला. त्याचे उत्तर : 'आम्ही मजुर पळाल्याचे समजले की आमच्या वाहनाने लागलीच तो जाणार असलेल्या मार्गावर आडवे येऊन त्याला पकडून व जरूर पडल्यास मारहाण करीत पुन्हा कामावर लावतो.' आज ह्या मालकाल

पोलिसांचीही गरज नाही असाच याचा अर्थ.

ह्यापेक्षा भयानक प्रकार भट्ट्यामध्ये जाळण्याचे, पण ह्या प्रकारात पुरेसा पुरावाच पुढे आणू दिला जात नाही. झाडाला बांधून मारणे ही यापेक्षा काहीशी सौम्य शिक्षा.

५ वर्षापूर्वी वाडा तालुक्यातील, ३ वर्षापूर्वी कर्जत तालुक्यातील अशा घटनांची नोंद सापडते. पण तपासा अंती काहीही निष्पन्न नाही. अशा पूर्वीच्या नोंदी आपणास पहावयास मिळतात. आता अशा घटनांचे प्रमाण कमी होत आहे.

अशा ह्या पार्श्वभूमीवर राजापूर तालुक्यातील पाचल परिसरातील कामाला मर्यादित का होईना यश मिळाले असं म्हणावं लागेल. १५० कुटुंबांना सुमारे अडीच लाख इतकी रक्कम आम्ही मिळवून देऊ शकलो.

हेटवण्याचा इका नवशा गेली अनेक वर्षे कोळसा भट्टी-वर काम करतोय पण मालकापुढे बोलायची हिम्मतच गमावून बसलेला. त्याची बायको आम्हाला गेल्या वर्षी भीमा शेठनं फसवल्याची हकिगत सांगायला सुरुवात करते तेव्हा कुठं इकादा आपलं तोंड उघडतो. इकादादाची कहाणी संपते न संपते तोच मालक सुरेशसिंग तिथं हजर होतो. मोहन आणि मालकाची पूर्वीची ओळख असते. इकडच्या तिकडच्या गप्पानंतर आम्ही मुळ विषयावर येतो. तुम्ही शिमग्याला कपडे आदी भेट देता ते हिशोबात धरता का? मोहनचा प्रश्न. 'नही हम तो यह सब बक्षिसीके रूपमें उन्हे देते है'–सुरेशसिंगचं उत्तर 'और फिर आने-जानेका भाडेका क्या करते है?' 'वह भी हम हमारी तरफसे देते है' – सुरेशसिंग सरळपणे कबूल करतो. आम्हाला आनंदाचा धक्काच बसतो. कारण एका मालकाची ही कबुली आम्हाला इतरत्र वापरता येणं शक्य होतं. आम्ही त्याचे आभार मानून तिथून निघालो. अर्थात हाच मालक पुढे त्रासदायक ठरणार आहे याची आम्हाला जाणीवच नसते.

## आजारी म्हणून खावटीच बंद

पाचलपासून ७–८ मैलावर असलेल्या काजिर्डा गावी गेलो. तेथल्या शिर्के डॉक्टरांना सोबतीला घेतलं. जवळच तोड चालू होती. तिथं जव्हार–मोखाडे भागातील मजूर काम करीत होते. गणपत लक्ष्मण वाघ हा मोखाड्यातील बोरांडे गावचा. आम्ही ९ जूनला तिथं पोचलो. तो पाठक हैदुल्ला या मालक जोडीकडे कामाला होता. तो आठवडाभर आजारी आहे. सध्याही आजारी असल्याने काम करू शकत नाही. पण म्हणून मालकानं त्याची खावटीच बंद केलीय. आठवडाभर खावटी नाही म्हणून इथं गावातल्या दुसऱ्या मजुर नातेवाईकाकडे राहत असल्याचं म्हणाला, इथंच दुसरीही तक्रार कानावर आली. जव्हार तालुक्या-तील न्याहाडी बुद्रुक येथील देवराम सवरा चिंचेचं झाड तोडताना जखमी झाला. त्याला मालकानं औषधाचे खर्चासाठी ५० रु. दिले (अर्थात तेही स्वतःच्या पदरचे नाहीतच. ते पुढे त्याच्या हिशोबात धरायचे असतात.) आणि घरी जाण्यास सांगितलं. आम्ही हे प्रकरण ऐकल्या-नंतर पाठक–हैदुल्लाना गाठायचं ठरवलं. तिथं पोचलो तर कोळशाच्या गोणी ट्रकमध्ये भरण्याचं काम चाललं होतं. पाठक शेठ आपल्याच मस्तीत खाटेवर बसल्याचं आम्ही पाहत होतो. त्याला देवराम आणि गणपतच्या तक्रारी सांगितल्या. तो आपल्यापरीने समर्थन करण्याचा हरतऱ्हेने प्रयत्न करीत होता. गणपतला खावटी न देता उपाशी ठेवल्याचे अप्रत्यक्षपणे कबूल करीत असताना तो जेव्हा त्याचंही समर्थन करू लागला तेव्हा आम्ही तर हबकूनच गेलो. मोहनचा तर पाराच चढला. शाब्दिक खडाजंगी झाली आणि पाठकनी गणपतला खावटी द्यायचं मान्य केलं. आम्ही ह्या वर्षीचे सर्व हिशोब आमच्यासमोर झाले पाहिजेत असं त्याला सूचित केलं. त्यांनी ते मान्यही केलं अन् मगच आम्ही परत फिरलो.

## सुरेशशेठचं खरं रूप

आता सुरेशशेठ आपलं खरं रूप दाखवू लागला होता. येळवण येथील शेतकऱ्यांचे पैसे याच सुरेशशेठनं न दिल्याने तेथील शेतकरी एकत्र आले. पैसे दिल्याशिवाय कोळसा उचलू देणार नाही अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. सरपंचासह सर्व गावकरी एकत्र आले पण या सर्वांना न जुमानता सुरेशसिंगने कोळसा उचललाच. सुरेशसिंगच्या या अरेरावीमुळे गावकरी संतापले. पण तक्रार करण्यापलिकडे काही घडू शकले नाही. आता पाळी आली मजुरांच्या हिशोबाची. येथेही तो उडवा-उडवीची उत्तरे देऊ लागला. मजुरांना आमच्याशी संबंध ठेवू नये म्हणून धमकावू लागला. आम्ही वेळीच मजुरांचा अर्ज तहसीलदारांना दिला. तहसीलदार स्वतः चौकशीसाठी गावात आले. मजूर व सुरेशसिंग अन् आम्ही व काही शेतकरी असे सारे जमले. मजुरांनी न भीता तहसीलदाराकडे आपल्या तक्रारी सांगि-तल्या. शेतकऱ्यांनीही आपल्या तक्रारी सांगितल्या. पण शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्याची आपली सुरु-वातीपासूनची भूमिका तहसीलदारांनी येथेही कायम ठेवली.

[ पान २५ पहा.

# आपण कधीच विजयी होणार नाही ?

— सतीश कामत

आपली पत्नी आपल्याबरोबर राहण्यास मिळावी, म्हणून एका मुक्त वेठबिगाराने केलेल्या कोर्टबाजीचा वृत्तांत.

मंगळ्या रावो दळवी. भिवंडी तालुक्यातील दोहल्याचा राहणारा. ठाणे जिल्ह्यातील वेठबिगार हुडकून ते सोडविण्याचा प्रयत्न श्रमजिवी संघटना करते. संघटनेने जवळच्याच साबरोली गावात वेठबिगार मुक्तीचं शिबीर भरवलं आहे, हे मंगळ्याला कळलं. तारीख होती ४ जून.

शिबिराला मंगळ्यासारखेच अनेक वेठबिगार आले होते. स्वतःहून गुलामगिरीच्या जगण्याच्या कहाण्या सांगत होते. मंगळ्याचाही धीर चेपला. तो बोलू लागला.

मंगळ्याचा जबाब धक्कादायक होता. जे घडणं न्याय्य वाटत होतं. ते घडवून आणण्याइतकी संघटनेची ताकद नव्हती. अखेर उच्च न्यायालयाकडे दाद मागायची असं ठरलं. आणि मंगळ्या उच्च न्यायालयात आला.

मंगळ्याला हा मार्ग अगदीच नवा होता. सुरुवातीला या सर्व धावपळीत मंगळ्याचा वाटा फक्त कुतूहलापुरता असावा, असं दिसायचं जूनच्या १४ चा शुक्रवार. मंगळ्याचे वकील नितीन प्रधान आणि अशोक मुंदरगी यांनी घाईघाईनं मंगळ्याचा 'हेबियस कॉपर्स' चा अर्ज कोर्टापुढे ठेवला. सरकारी वकीलांनी मंगळवारपर्यंत चौकशी करण्याचा प्रयत्न करू, असं आश्वासन दिलं. काय घडलं हे मंगळ्याला कळलं नाही. पण त्याला एक खात्री मात्र निश्चित होती. जे काही कोर्टापुढे ठेवलं गेलं आहे ते आपलं खरंखुरं आयुष्य आहे...

मंगळ्यानं अर्जात म्हटलं होतं : "कळव्याजवळच्या खारेगावी बुधाजी पाटील नावाचे शेठ आहेत. रेती काढणारा ड्रेजर, यंत्रावर चालणारे पडाव, ट्रक, जीपगाड्या सर्व काही त्यांच्याकडे आहे.

तीन वर्षांपूर्वी माझं खारेगावातील देवकीबाई हिच्याशी लग्न झालं. माझा सासरा शेठकडे बांधिल गडी होता. शेठनं मारहाण केल्यानंतर त्याचा मृत्यू झाला. सासऱ्याचं कर्ज फेडण्यासाठी मला वेठबिगारीला लावलं गेलं.

दिवसाला वीस तास काम आणि त्याबद्दल अडीच रुपये मोबदला तरीही दोन वर्षांपूर्वी घेतलेलं तीनशे रुपयांचं कर्ज फिटण्याऐवजी साडेचारशे रुपये झाले.

सहा महिन्यांपूर्वी माझं दोन महिन्याचं मूल आजारी पडलं. शेठनं पैसे दिले नाहीत... त्यात मुलाचा बळी गेला. मी आणि देवकीबाईनं खारेगाव सोडलं. पण आठवड्यातच देवकीबाईच्या आईनं देवकीबाईला परत नेलं.

"मी स्वतः खारेगावला जाऊन देवकीबाईला परत आणण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्येक वेळी मारहाण आणि आधी काम करून पैसे फेड हे उत्तर मिळालं. गेल्या सहा महिन्यांत मला माझ्या बायकोचं दर्शनही नाही..."

मंगळवार उजाडला. सरकारी वकीलांनी वेळ मागून घेतला. त्वरित पावले उचलावीत, अशा तोंडी सूचना न्यायमूर्तींनी दिल्या. पुढची सुनावणी १४ जूनला...

सोमवार, २४ जून. मुसळधार पावसामुळे मुंबई बंद.

मंगळवारी सरकारी वकील बदलले. चौकशीबाबत नवे सरकारी वकील काहीच सांगू शकले नाहीत. अखेर देवकीबाई व तिच्या आईला ८ जुलैला कोर्टात हजर करा, असा लेखी आदेश न्या. पी. एस. शहा आणि न्या. एस. एन. खत्री यांना द्यावा लागला.

## पोलिसांचं प्रतिज्ञापत्र

त्याच दिवशी संध्याकाळी चौकशीचं निष्कर्ष असलेलं प्रतिज्ञापत्र घेऊन रबाळे पोलिस ठाण्याचे अधिकारी हजर झाले...

"मी, ए. आर. पठाण. उपनिरीक्षक, रबाळे पोलिस स्टेशन शपथपूर्वक सांगतो की, हे प्रकरण चौकशीसाठी माझ्याकडे येताच प्रथम बुधाजी पाटील यांची भेट घेऊन त्यांचा जबाब घेतला. मंगळ्या काय किंवा देवकीबाई काय कोणीही कधीही आपल्याकडे काम करीत नव्हते, मंगळ्याला आणि त्याच्या सासऱ्याला मारहाण केल्याचे आरोप खोटे आहेत आणि आपण देवकीबाईला कधीही अडकवून ठेवलेले नाही, असे त्यांचे म्हणणे पडले.

"नंतर देवकीबाईकडे गेलो. मंगळ्याचा अर्ज तद्दत खोटा आहे; मंगळ्याशी भांडण झाल्यामुळे आपण स्वतःहून खारेगावात आपल्या आईकडे राहात आहोत, असं तिनं स्पष्ट केलं."

"बुधाजी शेठकडे गेली वीस वर्षे काम करणाऱ्या दोघा मजुरांकडे चौकशी केली. त्यांनीही बुधाजी शेठवरील

आरोप खोटे आहेत, असं ठामपणे सांगितले."

"या जबाबांवरून एक गोष्ट स्पष्ट होते. बुधाजी शेट-विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. साहजिकच या प्रकरणी आम्ही कुठेही कर्तव्याला चुकलेली नाही..."

## देवकीच्या घरी

देवकीबाई कोणाच्या दडपणाखाली नाही हे खरं असलं तर तिची प्रत्यक्षच भेट घ्यावी आणि इच्छा असेल तर तिला दोहल्याला न्यावं असं संघटनेच्या नेत्यांना वाटलं. विवेक आणि विद्युल्लता पंडित, मंगळ्या आणि त्याची बहीण यांच्याबरोबर नामवंत साहित्यिक विजय तेंडुलकर आणि वयोवृद्ध पत्रकार श्री. म. सहस्त्रबुद्धे २९ जूनला सकाळीच खारेगावी एका जीपमधून पोचले.

तिथे जे काही दिसले त्याने तेंडुलकर इतके अस्वस्थ झाले की त्यांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले.

"खारेगावला आम्ही पोचलो तेव्हा ११-३० होत आले होते. एका फॅक्टरीजवळ आम्ही जीप उभी केली. फॅक्टरीच्या मागेच एका झोपडीत देवकीबाई राहात होती. मंगळ्या आणि इतर आदिवासी महिलांना घेऊन विद्युल्लता पंडित देवकीबाईकडे निघाली. आम्ही जीपमध्येच वाट पाहात थांबलो.

"गणवेशातील एक पोलिस अधिकारी मुख्य रस्त्यावर मोटारसायकलवरून फेऱ्या मारत होता. मागे एक शिपाईही बसला होता. हेच उपनिरक्षिक पठाण असल्याचे मला नंतर कळलं. त्यांनी आम्हाला पाहिलं होतं.

"तासभरानं श्रीमती पंडित, मंगळ्या आणि इतर महिला कार्यकर्त्या आमच्या दिशेने येताना दिसल्या. देवकीबाई आणि तिची आई लक्ष्मीबाई याही त्यांच्या-बरोबर होत्या. उघडच आमच्याबरोबर यायचा निर्णय देवकीबाईनं घेतला होता."

"त्याचवेळी पठाण आणि पोलिस शिपाई पुन्हा मोटार-सायकलवरून परत फिरले होते. देवकीबाई आणि इतरांना पाहून त्यांनी मोटारसायकलचा वेग कमी केला. काही क्षण ते थबकले आणि नंतर मोटारसायकलची दिशा या गटाकडे वळीवली.

## अनामिक भीती

"उपनिरीक्षक पठाण दिसताच देवकीबाई आणि लक्ष्मीबाईची पावलं मंद झाली. अनामिक भीतीनं पछाडल्या-सारखी! हळूहळू सर्वच थांबले. पठाणनं देवकीबाई आणि तिच्या आईला अडवलं. 'कुठे चालला. समन्स आहे का?' आवाजात जरब आणि अधिकाराचा दर्प. "देवकीबाई तिच्या पतीकडे चालली आहे. समन्सची आवश्यकताच नाही." विद्युल्लता पंडितनं पठाणांना सुना-वलं. देवकीबाई आणि लक्ष्मीबाई हा संवाद जागीच थिजल्यासारख्या ऐकत होत्या. त्यांच्या चेहऱ्यावरचा तणाव स्पष्टच दिसत होता. देवकीबाई कुठे जात आहे याची माहिती देण्यासाठी पोलिस ठाण्यावरच आम्ही निघालो आहोत. असंही श्रीमती पंडितनं त्यांना सांगितलं.

"रबाळे पोलिस ठाण्याकडे आमची जीप निघाली तशी जीपमागून येण्याऐवजी पठाणनं आपली मोटारसायकल सतत जीपबरोबर राहील अशी काळजी घेतली! जणू काही अटक केलेले गुन्हेगारच घेऊन ते चालले होते. काही क्षणांत आणखी एका मोटारसायकलस्वाराची भर पडली... साध्या वेशातील एक इसम आणि त्यामागे पोलिस शिपाई."

"पोलिस अधिकाऱ्याची ही कृती पूर्वनियोजित असावी. दहशत निर्माण करणं हा त्यांचा हेतू. त्याचा हवा तो परि-णाम दोघा आदिवासी महिलांवर होऊ लागला होता."

"दोघीही भेदरून गेल्या होत्या. लक्ष्मीबाई सारखी देवकीबाईला सांगत होती... पोलिसांना आधी दिलेला जबाब आता बदलला तर जबर मारहाण होईल... मंग-ळ्याच्या गावी जाण्याचा तिचा विचार पालटला. काही वेळानं तर ती संघटनेच्या विरुद्ध बोलू लागली."

## शेट्ये यांचं सौजन्य

"रबाळे पोलिस ठाण्यावर आमचं स्वागतच झालं. इन्स्पेक्टर शेटये यांनी चहा देऊ केला. रीतीबाहेर जाऊन ते आमच्याशी मार्दवानं आणि सौजन्याने बोलले. देवकीबाईला पतीकडे जायचं असेल तर आपण कशाला आड येऊ. असंही ते म्हणाले. देवकीबाईला त्यांनी विचारलं. काय ग, तुला जायचं का आणि देवकीबाई नाही म्हणाली."

"आता देवकीबाईला मंगळ्याकडे जायचं नव्हतं! लक्ष्मीबाईनं तिला पाठिंबा दिला. मंगळ्या दुसऱ्या बाई-बरोबर राहतो आहे. असं आता लक्ष्मीबाई बोलू लागली. पठाण आणि शेट्ये यांना हा प्रकार पाहताना गंमत वाटत होती. असं दिसत होतं."

"इन्स्पेक्टर शेटये यांनी वडिलकीच्या सूरात आम्हाला ऑफर दिली... नवरा-बायकोतील भांडणं आहेत... तुमची तयारी असेल तर मार्ग काढण्याचा मी प्रयत्न

[ पान २७ पहा.

पान ७ वरून ]

लग्नगड्यांचा निर्णय घेतला. सभेला उपस्थित असलेल्या आदिवासींच्या चार तुकड्या केल्या. या चार तुकड्या साऱ्या मोठमोठ्या जमीनदारांच्या घरावर मिरवणुकी घेऊन गेल्या. तेथे जाऊन हे मोर्चेवाले घोषणा देत, "सुडका-मडका घे, सुटून पड." सुडका म्हणजे त्यांच्याजवळ असलेला कपडा, म्हणजेच एखादा रुमाल नाहीतर फडके. ते फडके व मडके एवढीच लग्नगड्याची मालमत्ता होती. ती घेऊन बाहेर पड, गुलामीतून सूट, अशी ती लग्नाच्या गड्याला हाक होती. ही घोषणा ऐकल्याबरोबर लग्नाचे गडी व त्यांच्याबरोबर त्यांच्या बायका बाहेर पडून त्या मिरवणुकीत सामील झाल्या. अशा तऱ्हेने या मिरवणुका तीन दिवस फिरत होत्या. या तीन दिवसात शेकडो लग्नाचे गडी मुक्त झाले. वैयक्तिक दृष्ट्या जे करणे त्यांना शक्य नव्हते ते एकजुटीच्या जोरावर सामुदायिकरीत्या करून त्यांनी पार पाडले. त्यांचा आधार फक्त लाल बावटा होता. हातात लाल बावटे घेतलेल्या या मिरवणुका जेव्हा फिरू लागल्या तेव्हा लग्नगडी व त्यांच्या बायका यांच्यावरची मालकी हा जणू आपला जन्मसिद्ध हक्क आहे अशा अविर्भावाने नि:संकोचपणे व्यवहार करणारे काही जमीनदार-सावकार दारे खिडक्या बंद करून चूपचाप बसून राहिले. आदिवासी कोणाच्या केसाला सुद्धा धक्का न लावता आपल्या गुलाम भाईबंधांना व बापांना मुक्त करून घेऊन गेले.

लग्नगडी मुक्त झाल्यानंतर मी डहाणू तालुक्यात सभा घेतल्या, तेव्हा वर्षानुवर्षांच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडून टाकल्यामुळे त्यांना जीवनात नवा आशेचा किरण दिसू लागला होता. त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद अवर्णनीय होता. आपण कसे सुटलो, काय काय झाले, मालकांची कशी फजिती झाली वगैरे ते सारखे अहमहमिकेने सांगत होते. नवरी नावाची स्त्री पुढे आली, व म्हणाली, "आम्ही त्या नरकातून सुटलो!"

[ श्रीमती गोदावरी परुळेकरांच्या "जेव्हा माणूस जागा होतो" मधून संक्षिप्त ]

---

पान १२ वरून ]

कामाला जाऊ लागली. दोघांनाही प्रत्येकी १ अधोली भात मजुरी मिळते. एक दिवस उशीर झाला तरी मालक घरी येतो 'मेल्या, कुत्र्या' या शब्दांनी मालकाच्या संभाषणास सुरुवात होते. सकाळी आदल्या दिवशीची, शिल्लक असल्यास भाकरी मिळते. कायदा झाल्याचे काल्यास माहीत आहे. 'कायदे खूप होऊन गेलेत' काल्या उपेक्षेने सर्वच कायदेकानूंविषयी आपली प्रतिक्रिया व्यक्त करतो. मोकळे होण्याची इच्छा खूप आहे; पण काही उपाय आहे, असे त्यास वाटत नाही.

**गावातील सर्वांनी मिळून वेठबिगार ठेवल्याचे एक उदाहरण सापडले. मासवण गावच्या शिवराम काल्या वडपी याने एक अर्ज करून आपली कहाणी सांगितली. शिवरामच्या लग्नासाठी गावातील सुमारे ४० जणांनी मिळून ४ मण भात व रोख १६० रु. शिवरामला कर्ज दिले. बदल्यात नवरा-बायको दोघांनी गावची सुमारे १२५ ढोरे सांभाळायची असे ठरले. ही जबाबदारी फार मोठी आहे. एखादे जनावर वेळेवर न आल्यास मालक शिवीगाळ करतो. गेल्या वर्षी तीन-चार वेळा मार खाल्ला, असे शिवरामने आपल्या अर्जात लिहिलेले आहे. गावाने सामुदायिकरित्या वेठबिगार ठेवल्याचे उदाहरण हे प्रथमच पाहावयास मिळाले. इतर गावांत अशी प्रथा असल्याचे ऐकिवात तरी नाही.**

वरील सर्व उदाहरणांवरून कायद्याच्या अंमलबजावणीचे काम किती अवघड आहे, याची कल्पना येते. केवळ शासन यंत्रणेवर हे काम सोपवले तर किती काळ वाट पाहावी लागेल कोण जाणे. काळूराम आणि त्याच्या सहकाऱ्यांनी या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शर्थ केली. सविस्तर अर्जाचे नमुने तयार करून घेतले. गावोगावी जाऊन प्रत्येक गड्याची स्वतंत्रपणे माहिती लिहून घेतली. कायद्याची माहिती देऊन अर्जावर त्याचे आंगठे घेतले. असे दोनशेहून अधिक अर्ज भरून घेतले. प्रत्येकाची एक प्रत तहसीलदाराकडे पाठवली. शासनाने नेहमीच्या दिरंगाईनंतर या अर्जांची दखल घेतली.

हा कायदा झाल्यापासून एकही केस या कायद्याखाली दाखल झाल्याचे दिसत नाही ! प्रथमच सांगितल्याप्रमाणे गावात लग्नगडी आहेत की नाहीत हे कळणे तसे फार कठीण नाही. गावचे पुढारी, गावपातळीवरील सरकारी-निमसरकारी कर्मचारी इत्यादींना ही माहिती मिळण्यास फारसे प्रयास पडत नाही. कोणतीही जबाबदार व्यक्ती दखल घेण्यास तयार नाही, हे यावरून स्पष्ट होते.

पान २१ वरून ]
सुरेशसिंगना योग्य ती तंबी देऊन ही बैठक संपली. मजुरांचे हिशोब प्रतिनिधींसमोर करण्याचंही त्यांनी मान्य केलं. पण सुरेशसिंग काही नरमल्याचं दिसलं नाही.

ह्या काळात आम्ही पाचल परिसरातील बहुतेक मजुरांची भेट घेतली. त्यांनी केलेल्या कामाची माहिती घेतली. त्यांनी मालकाबरोबर ठरवून घेतलेल्या दराबद्दल व इतर सवलतीबद्दल माहिती घेतली. त्याचवेळी संबंधित मालकाशीही बोलणी केली व ह्या सर्वांचा हिशोब मालकांनी परस्पर पूर्ण न करता आम्हा प्रतिनिधींसमोर करावा असे सुचविले. मजुरांनीही अर्थातच ही भूमिका स्वीकारली.

दरम्यान पावसाचा हंगाम सुरू झाला होता. मजुरांना आपल्या घरी जायची अर्थातच घाई होती आणि नियमित जोराचा पाऊस सुरू होण्यापूर्वी कामं संपवून घरी माघारी फिरणं त्यांच्या दृष्टीनं आवश्यकही होतं. पण मालकांना मात्र त्याबद्दल फिकीर दिसली नाही, आणि मजुरांची हतबलता काय सांगावी ? भर पावसातही मालक आपली कामं उरकून घेत होते.

## आजच्यापेक्षा उद्याचा दिवस अजूनही कठीण

तहसीलदारांनी बोलाविलेल्या मालकांबरोबरच्या बैठकीत आम्ही मजुरांची बाजू हिरीरीने मांडली. त्यांच्या हिशोबातील फसवणूक, बेकायदेशीर जंगलतोड– त्याद्वारे परवानगी न घेता शासनाची केली जाणारी फसवणूक, मजुरांच्या येण्याजाण्याचा, होळी-दिवाळीनिमित्त दिल्या जाणाऱ्या बक्षिसीचा प्रश्न, इतर अनेक प्रश्नांबाबत आम्ही चर्चा केली. ह्यावर्षी आम्ही दरवाढीची मागणी न करता ठरलेल्या दराप्रमाणे हिशोबाची मागणीच उचलून धरली. तहसीलदारांनीही मालकांना याबाबत समज दिली. बैठक आटोपून आम्ही निघालो.

आमची ही सारी लढाईच चालली होती. आजच्यापेक्षा उद्याचा दिवस अजूनही कठीण प्रसंग उभे करी. पण आम्हा साऱ्यांपाशी जिद्द होती अन् यशाबद्दलची खात्री.

## उद्याच्या आश्वासनावर निघालो...

ज्या भागातील मजुरांचे हिशोब करण्यास फारशा अडचणी येणार नाहीत असे आम्ही समजत होतो तिथंच आता अडचणींना सुरुवात झाली. ह्यापैकी ह्या भागातील एका मालकाने बिना काही त्रास देता मजुरांचा हिशोब केला हे मुद्दाम नमूद करावयास हवे. त्यालाही छोटीशी पण गमतीदार पार्श्वभूमी आहे. एकदा त्या मालकाकडे, मोहनशेठ राठोड त्याचं नाव. मजुरांना रोजचं धान्य दिलं जात नाही. मजुर १/२ दिवसापासून उपाशी आहेत असं आम्हाला समजलं. आम्ही तिथं पोचलो मजुरांची गाठ घेतली, मालक काही भेटला नाही. मुकादमाकडे चौकशी केली मजुरांना खरोखरच १/२ दिवस झाले धान्य मिळालं नव्हतं. मग मजुरांना घेऊन तहसीलदाराकडे निघालो. संध्याकाळची वेळ राजापूरला तहसीलदाराकडे पोहचेपर्यंत रात्र झाली. राजापूरला पोहचलो तर तेथली बीज गायब. तहसीलदाराचे घरीच सर्व मजुरांसह पोहचलो. तहसीलदारांना वस्तुस्थिती सांगितली. प्रत्यक्ष मजुर आपलं गाऱ्हाणं सांगत होते. आमची अपेक्षा होती तहसीलदारांनी ताबडतोबीने जागेवर येऊन मालकांकडे चौकशी करावी. पण सरकारी रीतीरिवाजाप्रमाणे गाऱ्हाणं तेवढं ऐकलं गेलं अन् उद्याच्या आश्वासनावर आम्हाला गावाकडं लावून दिलं.

## तहसीलदारांमुळेच शक्य झालं

वर म्हटल्याप्रमाणं जिथं अपेक्षित नव्हतं तिथंच अडचणींना सुरुवात झाली. त्याला कारणही तसंच घडलं. तिथल्या स्थानिक इंदिरा काँग्रेसच्या पुढाऱ्यानं ह्या मालकांना आमच्या विरुद्ध लढायला तयार केलं. हे पुढारी स्वतः दुकानदार. मजुरांना आठवड्याला धान्य (मालकामार्फत) यांच्याच दुकानातून दिले जाई. त्यामुळे मजुरांना वेठीस धरणं शक्य आहे असं त्याला वाटलं. आम्ही गावी हिशोबाला गेलो तर अनेक दिवस आमच्याशी चांगला वागणारा मालक फारसा पुढे येईना. ह्याउलट आम्हाला ह्या स्थानिक पुढाऱ्याशीच वादात गुंतावं लागलं. त्याचं म्हणणं आम्ही सर्व कार्यकर्ते बाहेरून आलेले आणि गावात अशांतता माजवू पाहताहेत. आम्ही त्यांना एकूण प्रश्न समजावून सांगितला. तहसीलदार/ मालक व आमच्यातील बैठकीचा दाखला दिला. तर त्यांनी आम्हाला तहसीलदाराचं पत्र दाखवा. तुम्हाला कोणी मजुरांचा प्रश्न घ्यायला परवानगी दिली ? इ. अनेक प्रश्नांची सरबत्ती केली. आता अधिक वेळ घालविण्यात अर्थ नव्हता. आम्ही मजुरांना घेतलं. त्यांचेशी चर्चा केली. अंतिमतः तहसीलदारांकडे ह्या सर्व मजुरांना घेऊन जावं असं ठरलं. ह्यापैकी काही निवडक मजुरांना घेऊन आम्ही तहसीलदारांकडे निघालो. तहसीलदाराकडे पोचलो तर ते काहीसे रागावलेले. मला काय दुसरं कामच नाही काय ? तुम्ही हे रोज मोर्चे काय चालविले आहेत ? इ. प्रश्नांनीच त्यांनी सुरुवात केली. आम्ही सारेजण त्यांचे चेंबरमध्ये गेलो. आम्ही त्यांना तुमच्याशिवाय कोणत्या

अधिकाऱ्याकडं जावं ते तुम्हीच सांगा म्हणून प्रश्न केला अर्थात ह्यावर त्यांचेजवळ उत्तर नव्हतंच. मग त्यांनी सारा प्रश्न समजावून घेतला. आमची मागणी होती सर्व मजुरांना पाचलला आणावे, तावडतोबीने त्यांचा हिशोब करण्यात यावा व मालकाचे खर्चाने मजुरांना घरी पोचविण्यात यावं. तहसीलदारानं आमचं म्हणणं मान्य केलं. तहसीलदारांनी लागलीच पोलिस सब इन्स्पेक्टरना बोलवून घेतलं. त्यांना परिस्थितीची कल्पना दिली व पोलिस कुमक घेऊन मजुरांना पाचलला आणून, तातडीने त्यांचे हिशोब करून त्यांना घरी पाठवावे, असा हुकूम दिला. मग आम्ही निघालो. लढ्यात अंतिमतः आम्हाला प्रेरणादायक निर्णय मिळाला होता. तूर्त तरी आम्ही जिंकलो होतो. साऱ्यांच्या चेहऱ्यावर यश खुलून दिसत होतं. पी. एस्. आय.नी त्या पुढाऱ्यांशी चर्चा केली व मजुरांना साऱ्या सामानानिशी व मालकांना पाचलला आणण्यात आलं. पाचलला सर्वजण पोहचेपर्यंत रात्र झालीच होती. मग एका हॉलमध्ये संबंधित मालक आणि मजुरांना घेऊन बसलो. आमच्यापैकी प्रत्येकानं काम वाटून घेतलं. एव्हाना आमच्यापैकी सारेच हिशोबात तरबेज झाले होते. भराभर हिशोब आटोपले. तरीही सारं उरकायला पहाट उजाडली. पी. एस. आय. समोर सर्वांचे हिशोब करून पैसे वाटप केले.

## सुस्त सरकार


दरम्यान सरकारी पातळीवरही आमच्या हालचाली चालूच होत्या. राजापूर भागात जाण्यापूर्वी संघटनेतर्फे आम्ही मजुरमंत्र्यांना निवेदन दिलं होतं. मजुरमंत्र्यांनी सुरुवातीलाच चर्चेत वेठबिगारीचं स्वरूप मान्य केलं. मात्र तत्पूर्वी मजुरमंत्र्यांनी ह्याप्रकरणी 'ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी' म्हणून एका लेबर ऑफिसरांची नेमणूक केली. ह्या नेमणुकीनंतर बरेच दिवस काहीही हालचाल झाली नाही. मुळात ह्या अधिकाऱ्यांना कोळसाभट्टी व त्याचे स्वरूपाबद्दल काहीही प्राथमिक माहिती नव्हती. आम्ही संबंधित अधिकाऱ्यांकडे अनेक खेपा मारल्या. पण प्रकरण काही पुढे सरकेना. लेबर ऑफिसने महसूल अधिकाऱ्याना लिहून माहिती मागविली पण त्यांचेकडून काही माहिती मिळेना. ह्याहीपुढं जाऊन चालू वर्षी कोठेही भट्ट्या नाहीत असंही आम्हाला सांगण्यात आलं. आम्ही त्यांना मग आमची माहिती पुरविली. अखेरीस लेबर ऑफिसर प्रत्यक्ष पाहणी करून आल्यानंतर संघटनेच्या प्रतिनिधी बरोबर चर्चा करतील असं सांगण्यात आलं. पुढं तेथील लेबर इन्स्पेक्टरांसोबत एक बैठक झाली. त्यांनी मजुर बाहेरगावी जात असल्यानं मला काही कारवाई शक्य नाही तसेच सरकारनं रोजगार हमीची कामाची तयारी दर्शविली आहे इ. अनेक गोष्टी सांगितल्या. त्यांचेशी अनेक बाबींवर चर्चा झाली. त्यांना आम्ही मजुरांच्या वेठबिगारीच स्वरूप / त्यांना मिळणारी कमी मजुरी इ. संघटनेच्या मागण्यांबाबत तातडीने निर्णय घ्यावा असं सुचवलं. पण सरकारी पातळीवर सारं काही सामसुम अन आलबेल होतं. आम्ही राजापूरला असताना एक लेबर इन्स्पेक्टर तिथं गेले होते. त्यांनी आमची तिथं भेट घेतली. पण थोडीफार चौकशी बस्स ! ह्याउपर त्यांची काही उत्सुकता दिसली नाही. आम्ही ज्या भागात गेलो तिथल्या तहसीलदारांचं सहकार्य चांगलं लाभलं. पण संघटनेच्या दबावामुळेच सूत्रं हालत होती असंच म्हणावं लागेल. त्यातही शेतकऱ्यांची मालकांकडून होणारी फसवणूक / त्यांना मिळणारा कमी दर इ. बाबत तर तहसीलदार काही ऐकायलाच तयार होईनात. प्रत्येकवेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला गौणच स्थान दिलं किंबहुना त्याकडे दुर्लक्षच केलं. आमच्या स्थानिक पातळीवरील लढाईतील ती उणीवच होती.

जिल्हाधिकाऱ्यांचे पातळीवरही प्रयत्न चालूच होते. आम्ही होतो त्या काळात जिल्हाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट झालीच नाही. एक-दोनदा डेप्युटी कलेक्टरांबरोर बैठका झाल्या. त्यातही एकूण प्रश्नाला काही गती मिळतेय असं वाटत नव्हतं. इथं तर त्यांना कायदा अन् सुव्यवस्थेचाच प्रश्न महत्त्वाचा वाटत होता जणू. मजूर त्यांचे होणारे हाल त्यांना मिळणारी कमी मजूरी इ. सारे प्रश्न त्यांचे दृष्टीने गौण होते.

ह्या प्रश्नाला वाचा फोडण तर साऱ्यांना महत्वाच वाटत होतं. दरम्यान पावसाळा संपला अन् पुन्हा खावटी वाटपाचा प्रश्न आला. काही ठिकाणी मजुरांना खावटी वाटण्यात आली तर पाबळ खोऱ्यात तेथील स्थानिक खार डोंगर मेहनत आघाडी ह्या संघटनेन सरकारने ह्या मजुरांना खावटी वाटप करावी/स्थानिक पातळीवर रोजगार हमीची कामे सुरू करावी ह्या मागण्यांवर आंदोलन सुरू केले. स्थानिक मजूर आमरण उपोषणास बसले. शासनाच्याही प्रतिष्ठेचा प्रश्न बनला. मग शासनाने ९०० मजुरांना खावटी वाटप करण्याचे मान्य केले व रो. ह. यो. कामाचे आश्वासन दिले. दरम्यान हा फक्त पाबळ खोऱ्यातील प्रश्न नाही ठाणे व रायगड या दोन्ही जिल्ह्यातील अनेक मजुरांशी संबंधित असा हा प्रश्न आहे. सबब शासनाने पाबळ खोऱ्यातील मजुरांना खावटी वाटप केली त्याप्रमाणे साऱ्या

मजुरांना खावटी वाटप करावी अशी संघटनेनं भूमिका घेतली. दरम्यान उच्च न्यायालयाने वर्तमान पत्रातील निवेदनाच्या आधारे रीट अर्ज दाखल करून घेतला यामध्ये खार डोंगर मेहनत आघाडी व सरकारनं आपलं म्हणणं मांडावं असा आदेश देण्यात आला. यात संघटनेनं आम्हा-लाही सहभागी करून घ्यावं म्हणून अर्ज केला त्याप्रमाणे संघटनेलाही आपलं म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. दोन्ही बाजूस म्हणणं ऐकून घेतल्यानंतर कोर्टानं शासनाला ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमण्याची सूचना केली. शासनाने ती मान्य करून त्याप्रमाणे एक समिती नेमण्यात आली. ह्या समितीने ( ज्यामध्ये सरकारी अधिकारी व १ अशासकीय अधिकारी इ. या समावेश आहे. ) आपला अहवाल दिलेला आहे. ह्यावर कोर्ट काय निर्णय देते ते अजूनही स्पष्ट व्हायचे आहे.

न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत—शासन ह्या मजुरांच्या श्रमाला काही न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने काही पाऊल टाकेपर्यंत सर्वांच भवितव्य काळकुट्ट्य आहे असंच म्हणावं लागेल.



पान २३ वरून ]

करतो. अर्थात हे माझं काम नव्हे. पण एक व्यक्ती म्हणून प्रयत्न करतो."

### अडचणींचा प्रश्न

"आम्ही इथवर आलो आहोत ते यासाठी नाही तर कायद्याच्या चौकटीत वेठबिगार सोडविण्यासाठी, हे त्यांना समजाऊन देण्याचा आम्ही प्रयत्न केला. एक पोलिस अधिकारी म्हणून नव्हे. तर व्यक्ती म्हणून हेच काम आपण वर्षानुवर्षे करीत आहोत या उद्‌गारानं शेटचे यांनी आमच्या प्रयत्नाची वासलात लावली!"

"सहस्त्रबुद्धे यांनी पोलिस चौकशी किती पक्षपातीपणे केली जात आहे. याकडे त्यांचं लक्ष वेधलं. पण अड-चणीच्या या प्रश्नावर त्यांनी मुग्धता पाळली. वेठबिगारीचा कायदा धाब्यावर बसविणाऱ्या आणि गरीबाला पिळणाऱ्या सावकारांच्या बाजूनं पोलिसांनी उभं राहावं, हे अत्यंत आक्षेपार्ह आहे, असं मत मी व्यक्त केलं. त्यावर त्यांनी जो चेहरा केला तो दिसायला हास्यास्पद होता. अड-चणीच्या परिस्थितीतून बाहेर पडण्याचाच तो प्रयत्न होता.

"शेट्ये यांना सद्‌सद्‌विवेकबुद्धी टोचत होती. हे मला दिसत होतं. अचानक ते उद्‌गारले : ठीक आहे. झालं ते झालं यापुढे असं होणार नाही. एक पोलिस अधिकारी म्हणून नव्हे, तर एक माणूस म्हणून मी शब्द देतो... या उद्‌गारांचा अर्थ स्पष्ट होता. यापूर्वी नको ते घडलं!

### कधीच विजय नाही ?

तरीही एकूण परिस्थिती कायदेशीरदृष्ट्या बिनतोड होती. आक्षेपाला जागाच नव्हती. आदिवासी वेठबिगाराल सुटका नको होती. कारण पोलिसांची नाराजी तिला टाळायची होती. आमची लाख इच्छा असली तरी कोण-ताच कायदा आमच्या मदतीला येऊ शकत नव्हता. पोलिस यंत्रणेचा विजय झाला होता. पराभूत होऊन आम्ही पोलिस ठाण्याबाहेर पडलो. मनात आलं. स्थानिक हित-संबंधीय, लोकप्रतिनिधी आणि पोलिस यांची हातमिळवणी अशीच राहू दिली तर आपला कधीच विजय होणार नाही..."

आठ जुलै. देवकीबाई आणि लक्ष्मीबाईंना न्यायालयात हजर करण्यात आलं. पठाण स्वतःही होतेच. तेंडूलकरांचं हे प्रतिज्ञापत्र न्या. शहा आणि न्या. खत्री यांनी वाचलं. दोघा आदिवासी महिलांशी आपण आपल्या दालनात बोलू... असं न्यायमूर्तींनी स्पष्ट केलं.

देवकीबाईशी काही काळ बोलल्यानंतर न्यायमूर्तींनी वडिलांना दालनात पाचारण केलं. देवकीबाईनं पतीकडे जाण्यास नकार दिला होता. मंगळ्याचा अर्ज मागे घेण्यात आला.

... मंगळ्या आता संघटनेचं काम करतो. भेटला की मूठ वळवून 'झिंदाबाद'ने स्वागत करतो. नुकतीच त्यानं दोहला गावाच्या परिसरातील मुक्त होऊ पहाणाऱ्या बांधिल गड्यांची यादीही तयार केली. मंगळ्या आता घाबरत नाही. पराभवाला तर नाहीच नाही.

( 'महाराष्ट्र टाइम्स' वरून साभार पुर्नमुद्रित )

पान १७ वरून ]

असल्याचीही उदाहरणे आढळून आली आहेत. गेल्या ५ वर्षांत केवळ आंध्रात अशा तऱ्हेने १२० लोक मृत्यूमुखी पडल्याचे जाणकार सांगतात. सिनेमात रामाची भूमिका करणाऱ्यांचे हातही हे मृत्यू रोखू शकले नाहीत.

स्वातंत्र्याच्या चाळीशीतही हे असे का घडू शकते, हे समजून घेण्यासाठी भारतीय समाजरचना व मानसिकता समजून घ्यावी लागेल. देशात असलेल्या भीषण दारिद्र्यातही या प्रश्नाचे मूळ सापडू शकेल.

समाजमनाची बोथट धार आणि बेचैन करणारी संवेदनाहीनता यांना विरोध दर्शविण्यासाठी वेठबिगार (बंधुआ) मुक्ती मोर्चा, वेठबिगारीची आणि शोषणाची प्रकरणे शासनाच्या नि जनसामान्यांच्या निदर्शनास आणण्याचा वारंवार प्रयत्न करीत आहे. सत्ताधारी वर्गातील काही लोकांवर तरी याचा परीणाम होईल, अशी मोर्चाची अपेक्षा आहे. भारतीय केंद्रशासनाच्या विरुद्ध केल्या गेलेल्या लोकहिताया दाव्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाला एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागला. हे वेठबिगार (बंधुआ) मुक्ती मोर्चाच्याच अविरत प्रयत्नांचे यश आहे. अधिकाधिक कार्यकर्ते आता या संघटनेच्या कामात रस घेऊ लागले आहेत. महाराष्ट्रात श्री. सुभाष निंबाळकर या तळमळीच्या कार्यकर्त्याच्या नेतृत्वाखाली वेठबिगार मुक्ती मोर्चाचे काम सुरू आहे. सुरुवातीस एकांडा शिलेदार म्हणून लढणाऱ्या निंबाळकरांना आता परिवर्तनाच्या व लढाईसाठी अनेक सैनिक मिळाले आहेत. कार्यकर्त्यां एक मोहोळच त्यांनी सतत भटकंती करून विलक्षण जाणिवेने तयार केले आहे. जाण, बांधिलकी, सातत्य आणि कार्यकर्त्यांचा प्रामाणिकपणा यांना लोकसहकार्याची साथ मिळाल्यास मानवमुक्तीचे असे लढे यशस्वी होऊ शकतील.

वेदनेशी आणि हुंदक्यांशीच नाते सांगणाऱ्या वेठबिगारांची उदास आभाळातली ही उद्ध्वस्त स्वप्नं इथल्या व्यवस्थेचे श्वास कधी बेचैन करून सोडणार आहेत? या भयाण अंधाराच्या प्रदेशात प्रकाशाचा सुरुंग पेरणारे हात आपण मजबूत करणार आहोत की नाही? जखमींच्या जखमांशी संवाद साधू मागणारे मोर्चाच्या कार्यकर्त्याचे हे हात प्रार्थना करणाऱ्या ओठांपेक्षाही अधिक पवित्र नाहीत काय? की येणाऱ्या पिढ्याही आपल्याला हेच विचारणार आहेत.

**पन्नास लाख गुलामपुत्र**

**भारतमाता कशी स्वतंत्र???**

(दैनिक 'लोकमत' वरून साभार) □

पान ४८ वरून ]

## वेठबिगारमुक्त आदिवासी चरितार्थास लागले

मुंबई, रविवार — वेठबिगारीतून मुक्त झालेले विरार परिसरातील आदिवासी अगदी पहिल्याच वर्षी स्वतःच्या चरितार्थासाठी पैसे मिळवू लागले आहेत. या वर्षी त्यानी सहकारी पायावर कलिंगडाचे पीक घेतले आणि ती कलिंगडे विकण्याची व्यवस्था अपना बाजार या सहकारी संस्थेने करून दिली. अंधेरी येथील (वेसावा मार्ग) अपना बाजारच्या शाखेत ही कलिंगडे सध्या विकली जात आहेत.

श्रमजीवी संघटना या संस्थेच्या प्रयत्नामुळे त्या भागातील बराच वेठबिगार आदिवासी सावकाराच्या गुलामगिरीतून मुक्त झाले. परंतु यापुढे खावयाचे काय असा प्रश्न निर्माण झाला होता. काहींच्याकडे थोडी शेतजमीन होती. परंतु पीक काढण्यासाठी त्याच्याजवळ पैसे नव्हते. श्रमजीवी संघटनेचेच काही कार्यकर्ते तेथे विधायक संसद ही संस्था चालवित असतात. या संस्थेने वीट भट्टी, सहकारी शेती असे उपक्रम तेथे सुरू केले आहेत. या वर्षी २१ एकर जमिनीत त्यांनी कलिंगडाचे पीक घेतले.

कलिंगडाची विक्री कशी करावयाची हा त्या आदिवासींपुढे प्रश्न होता. घाऊक व्यापारी ही सर्व कलिंगडे अगदी नाममात्र भावाने विकत घेण्यास तयार होते. त्यामुळे आदिवासींना कोणताही नफा मिळणार नव्हता. परंतु अपना बाजारने कलिंगडाच्या विक्रीसाठी सर्व सोयी उपलब्ध करून दिल्याने त्यामुळे जो पैसा मिळेल त्या आधारे पावसाळ्यात धान्याचे पीक आदिवासी घेऊ शकतील ... गुलामीत आयुष्य घालविलेल्या शेतकऱ्यांना आता स्वतःच्या पायावर उभे राहता येईल.

(महाराष्ट्र टाइम्स, २३ एप्रिल १९८४)



**श्रमजिवी संघटना ठाणे जिल्ह्यात प्रामुख्याने वेठबिगार मुक्ती – पुनर्वसन ह्या प्रश्नावर काम करते. त्यांनी त्यादृष्टीने केलेली प्रश्नावली व वेठबिगार मुक्तीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना करावयाचा अर्जाचा नमुना तसेच मुक्त वेठबिगारासंबंधी माहिती इ. नमुने खाली देत आहोत. महाराष्ट्रातील संघटना / कार्यकर्त्यांना त्याचा निश्चितच उपयोग होईल.**

---

वसई तालुक्यात मौजे दिपवली येथे दिनांक १२ ते १४ जुलै १९८३ रोजी वेठबिगार मुक्त करण्यासाठी शिबीर घेतले होते. श्रमजीवी संघटना, ठाणे यानी मागणी केल्यावरून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने श्री. **रा. वि. भुस्कुटे** त्या वेळचे तहसीलदार, वसई यांनी हे शिबीर चालविले होते. त्या शिबीरात वेठबिगार शोधून काढण्यासाठी एक प्रश्नावली तयार केली होती. सदरची प्रश्नावली "वेठबिगार शोधून काढून त्यांचे पुनर्वसन करणे" या विषयावर नवी दिल्ली येथे नॅशनल लेबर इन्स्टिटयूटचे वतीने दिनांक ७ ते ९ फेब्रुवारी १९८३ रोजी झालेल्या राष्ट्रीय चर्चा सत्राच्या अहवालातील आंध्र प्रदेशातील तेलंगण जिल्ह्यात वेठबिगार शोधून काढण्यासाठी योजलेली पद्धती या परिशिष्ठ तीनच्या आधारे तयार केली होती.

## वेठबिगार ओळखण्यासाठी विचारण्याचे नमुना प्रश्न

प्र. क्र. १ : तू कोणाकडे काम करतोस ? त्याच्याकडे किती वर्षे काम करतोस ?

प्र. क्र. २ : तू कर्ज किती घेतलेस ? केव्हा घेतलेस आणि कशासाठी घेतलेस ?

प्र. क्र. ३ : घेतलेल्या कर्जावरती व्याजाचा दर काय आहे ?

प्र. क्र. ४ : तुला महिन्याला पगार किती मिळतो ? इतर सोयी सवलती काय मिळतात ?

प्र. क्र. ५ : तू मालकाकडे काही वर्षे काम केले आहेस तेव्हा तुला दिलेले कर्ज कमी झाले आहे काय ? निदान व्याज तरी फिटले आहे काय ?

प्र. क्र. ६ : याच मालकाकडे तुला आणखी किती वर्षे काम करावे लागेल ? तू दुसरीकडे जाऊन दुसऱ्या कोणाकडे काम करू शकणार नाहीस का ?

प्र. क्र. ७ : मालकाच्या मताने तुला दिलेले कर्ज पूर्णपणे केंव्हा फिटेल असे तुला वाटते ?

**पुरवणी प्रश्न :**

(१) तुला वसई येथे शिपाई म्हणून नोकरी दिली. रु. ४००/– महिना पगार दिला. तर तू नोकरीला ताबडतोब येशील का ?

(२) तुझ्या गावाच्या शेजारी दुसरा जमीनदार आहे व तो तुला गडी म्हणून ठेवायला तयार आहे. तो तुला खाऊन पिवून रु. २००/– दरमहा द्यावयास तयार आहे. तू त्याच्याकडे कामाला येतोस का ? ह्यात तुझा फायदा आहे.

(३) वसई तालुक्यात पश्चिम पट्टीत मजुरांना मागणी आहे. तिथे दिवसाला १२/– रु. मिळतात. तू पळून जाऊन तिकडे मजुरी का करत नाहीस ?

द्वारा० ( संघटनेचे नाव पत्ता लिहणे )

मा. उपजिल्हाधिकारी ..............................

द्वारा कार्यकारी दंडाधिकारी ..............................

ता. ......... जिल्हा ......... ..............................

विषय : **वेठबिगारीतून मुक्तता**

वेठबिगाराचे नाव ........................................................ वय ..........

रा. ................................................ ता. ............... जिल्हा ..........

मालकाचे नाव ........................................................................

रा. ................................................ ता. ............... जिल्हा ..........

बांधील वर्षे ............... लग्नाआधी ........................ लग्नानंतर ........................

काम सोडल्याची तारीख / वर्ष ................... कारण ........................................

लग्नासाठी / ................................................ साठी घेतलेले कर्ज, बाकी वर्षे ..........

होणारा त्रास / नुकसान ........................................................................

रोख रु. ........................................

वस्तु ................................................ अंदाजे रु. ........................

एकूण ................................................

केलेले काम ........................................................................

मिळणारी मजुरी ........................................

कुटुंबातील इतर बांधील माणसे ........................................

त्यांना मिळणारी मजुरी ........................................

मालकाकडे असणारी संपत्ती ........................................

महोदय,

मी सदरच्या मालकांकडे गेली ...................... वर्षे वेठबिगार म्हणून काम करीत आहे. मालक मला कामाची पुरी मजूरी न देता माझ्याकडून कष्टाचे व अंगमेहनतीचे काम करून घेत आहेत. माझी या बंधनातून मुक्तता व्हावी व माझ्या घरादाराचे तसेच माझ्या व माझ्या कुटुंबियाचे संरक्षण करावे, आणि मला किमान वेतन कायद्याप्रमाणे मजुरीतील फरक मिळवून द्यावा, ही विनंती.

**समक्ष** [ ]

**सही** नि. डा. हा. आगठा

ता.

प्रत रवाना :

१. जिल्हाधिकारी

२. तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी

३. पी. एस. आय. पोलीस स्टेशन

४. ............ संघटना.

( संघटनेचे नाव व पत्ता )

# मुक्त वेठबिगारासंबंधी माहिती

फोटो

नाव ..............................................

गाव .................. तालुका ..............

जिल्हा ..................

वय ..................

मुक्त झाल्याची तारीख / वर्ष ......................

केस दाखल तारीख .......................... नंबर ..........................

आरोप पत्र दाखल तारीख .................... नंबर ..........................

कोर्ट ....................

केसेस लागल्याच्या तारखा — | झालेले काम

१. .................................... | ....................................

२. .................................... | ....................................

३. .................................... | ....................................

निर्णय लागला केव्हा ............ ..............

निर्णय काय लागला ..............................

केसेस दाखल होण्याआधी झालेली दडपशाही ..............................

केसस दाखल झाल्यानंतर झालेली दडपशाही ..............................

कुटुंबातील इतर माणसे व व्यवसाय ............ शिक्षण ............

नाव .................................. वय ........ नाते ........ व्यवसाय ........ उत्पन्न ........

( १ ) ..........................................................

( २ ) ..........................................................

( ३ ) ..........................................................

( ४ ) ..........................................................

शेती असल्यास किती ..............................

कोण करते .................................... का ? ..............................

शेती कसण्याची साधने ..................................................................

गाई ........................... बैल ................. म्हशी ........... बकऱ्या ...........

स्वतःचे घर आहे काय ? होय / नाही : कच्चे / पक्के

छप्पर — कौलारू / गवताचे ..........................

गावात वीज आहे काय ? होय / नाही.

घरात वीज आहे काय ? होय / नाही.

वेठबिगारी करताना काय त्रास होता ..........................................................

..........................................................................................

पुनर्वसनासाठी तुमच्या योजना :

१. ..........................................................................................

२. ..........................................................................................

३. ..........................................................................................

४. ..........................................................................................

पुनर्वसन प्रक्रिया

१. शेत जमीन ..............................

२. IRDP / T ......................

३. शासकीय अनुदान ....................................

४. इतर .................................................

एकूण .................................................

किमान वेतनातील फरक रुपये ........................................

कार्यवाही ..........................................................................................

..........................................................................................

इतर

..........................................................................................

..........................................................................................

# कायदा आणि समाज परिवर्तन :

## बांधील श्रमपद्धती रद्द करणाऱ्या कायद्यांची कथा

— शरद कुलकर्णी

### प्रास्ताविक

सरकारला कायदा हे समाज परिवर्तनाचे एकमेव साधन वाटते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाज परिवर्तन व्हावे ह्यादृष्टीने अनेक कायदे करण्यात आले. सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विवाहाच्या वयात वाढ, द्विभार्या प्रतिबंधन असे अनेक कायदे होऊनही ते व्यवहारात मात्र फारसे यशस्वी ठरले नाहीत. आर्थिक क्षेत्रात कायद्याने बदल करणे बरेच कठीण जाते. अनेकदा असे कायदे कागदावरच राहतात. कायदा प्रभावीपणे अंमलात आणण्याची सरकारची प्रबळ इच्छाशक्ती यांचा अभाव असल्यास कायदा फारसा अंमलात येत नाही. असाच अनुभव आहे. कायद्याची जर योग्य अंमलबजावणी झाल्यास जी फारशी कधी होत नाही, फारतर व्यवस्थेत वरवर बदल झाल्याचे दिसेल, परंतु मूळ व्यवस्था मात्र आहे तशीच मजबूत राहते. बांधील श्रमपद्धती रद्द करणारा कायदा सरकारजवळील इच्छाशक्तीचा अभाव आणि विषमतेवर आधारलेली सरंजामी समाजव्यवस्था ह्या दोन्हींमुळे फारसा प्रभावी ठरलेला नाही.

बंधुआ मुक्ती मोर्चा, भूमिसेना, श्रमजीवी संघटना वगैरे संघटनांमुळेच काही ठिकाणी बांधील गडी मुक्त झालेले आहेत. मात्र ह्या देशातील बांधील श्रमपद्धती ही पूर्णपणे नाहीशी झाली आहे असे म्हणता येणार नाही. ह्या कायद्याचा व बांधील श्रमपद्धतीचा इतिहास फार बोधप्रद आहे.

**गुलामगिरी पद्धती :** गुलामगिरी ही श्रमपद्धतीतील सर्वात वाईट व अमानुष पद्धत आहे. गुलाम ही मालकाची खाजगी संपत्ती मानली जाते. इतर जडवस्तूप्रमाणे मालक गुलामाला विकू शकतो, भेट देऊ शकतो किंवा अदलाबदल करू शकतो. भारतात सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत काही प्रमाणात गुलाम पद्धती होती. अर्थव्यवस्था मागासलेली असल्यामुळे उत्पादन कार्यात गुलामांचा वापर होत असे. मात्र काही कुटुंबे तरूण मुली व स्त्रियांना ' दासी ' म्हणून बाळगत असत. १८३३ साली ब्रिटीश संसदेने एक कायदा करून भारतातील गुलामपद्धती शक्य तितक्या लवकर बंद करावी असा आदेश दिला. त्यानंतर दहा वर्षांनी म्हणजे १८४३ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यातील प्रदेशात गुलामीला बंदी करणारा कायदा भारत सरकारने केला. ह्या कायद्यान्वये माणसांची विक्री करणे हा गुन्हा ठरला. हळूहळू ह्या प्रदेशांतील गुलामगिरी पद्धती नाहीशी झाली.

**बांधील श्रमपद्धती :** गुलामगिरी नाहीशी झाली तरी, बंधनकारक अशी बांधील श्रमपद्धती नाहीशी झाली नाही. एवढेच नव्हे तर काही ठिकाणी सरकारी कायद्यांचा आधार घेऊन मजुरांना बांधील करण्यात आले. १८५९ साली भारत सरकारने कामकाजाचे करार मोडणाऱ्यास शिक्षा देणारा कायदा केला. ह्या कायद्यान्वये उचल घेतल्यानंतर कबूल केलेले काम न करणे हा गुन्हा ठरला. ह्या कायद्याचा व्यापाऱ्यांनी, धनिक शेतकऱ्यांनी भरपूर फायदा घेतला आणि अनेक श्रमिकांना जवळजवळ बांधील गडी बनविले.

त्याशिवाय आणखी एक कायद्याचा आधार बांधील श्रमपद्धती वाढविण्याला कारणीभूत ठरला. दिवाणी खटले चालविण्यासाठी १८५९ साली ' सिव्हील प्रोसिजर कोड ' ह्या नावाचा एक विस्तृत कायदा भारत सरकारने केला. ह्या कायद्यातील २०० व्या कलमान्वये सावकाराला आपले कर्ज वसूल करण्यासाठी कोर्टाकडून डिक्री मिळाल्यानंतर कर्जदाराची मालमत्ता जप्त करता येते असे किंवा त्याला तुरुंगात पाठवता येत असे. ह्या कायद्याचा आधार घेऊन अनेक गरिबांना विशेषतः आदिवासींना बांधील गडी बनविण्यात आले.

१८७४ साली कारागिरांच्या कराराविषयक कायद्यात सुधारणा करण्यात आली आणि १९२५ साली तो रद्द करण्यात आला. १८७९ साली सिव्हिल प्रोसिजर कोडमधील २०० व्या कलमात सुधारणा करण्यात येऊन कर्जदाराला कैद करण्याची पद्धत काढून टाकण्यात आली.

**बांधील श्रमपद्धती रद्द करणारे कायदे :** विसाव्या शतकात विविध प्रांतिक सरकारांनी बांधील श्रमपद्धती रद्द

करणारे कायदे केले. बिहार व ओरिसा सरकारांनी १९२० साली कामीअवती पद्धत रद्द करणारा कायदा करून कर्ज व कर्जावरील व्याजाच्या बदली काम करण्याचे करार बेकायदेशीर ठरविले. अशाच प्रकारचे कायदे इतर प्रांतिक सरकारानेही केले त्यांची परिणामकारक अंमलबजावणी झाली नाही.

**भारतीय राज्यघटना :** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाची नवी घटना तयार झाली. या घटनेत गुलामपद्धती व बांधील श्रमपद्धती बेकायदेशीर ठरेल असे नमूद करण्यात आले. घटनेच्या २३(१) कलमात मानवी व्यक्तींचा व्यापार करण्यास आणि कोणत्याही प्रकारचे सक्तीचे श्रम घेण्यास बंदी करण्यात आली,

१९४२ साली ओरिसा सरकारने एक कायदा करून राज्यात अस्तित्वात असलेली 'गोठी' पद्धत नावाने ओळखली जाणारी बांधील श्रमपद्धती रद्द केली. या कायद्यान्वये कर्जाच्या व्याजाच्या मोबदल्यात श्रम करून घेणे गुन्हा ठरविण्यात आले आणि त्यासाठी २०० रुपयांपर्यंत दंड व तो न दिल्यास सहा महिन्यांपर्यंत कैद अशी शिक्षा सांगण्यात आली.

१९६१ साली राजस्थान सरकारने 'सागरी' पद्धती नांवाने राजस्थानात अस्तित्वात असलेली बांधील श्रमपद्धती रद्द करणारा कायदा केला. दुर्दैवाने हे कायदे फारसे परिणामकारक ठरले नाहीत. अनुसूचित जाती व जमाती आयुक्तांच्या प्रत्येक अहवालात वेगवेगळया राज्यातील बांधील श्रमपद्धतीचा उल्लेख आहे. तसेच बहुसंख्य बांधील गडी दलित जातीचे व आदिवासी जमातीचे आहेत हे ही नमूद करण्यात आले आहे. श्रमाच्या बांधीलकीचा उगम प्रामुख्याने कर्जबाजारीपणातून होतो. त्यासाठी राज्यातील सावकारी व्यवहारांवर कडक नियंत्रण घातले पाहिजे अशीही सूचना अनेक अहवालात करण्यात आली आहे.

**२० कलमी कार्यक्रम :** आणीबाणीत पंतप्रधानांनी १ जुलै १९७८ रोजी एक वीस कलमी कार्यक्रम जाहीर केला. त्यातल्या चौथ्या कलमात बांधील पद्धती जेथे–जेथे चालू असेल तेथे–तेथे ती बेकायदा जाहीर करण्यात येईल असे नमूद केले होते.

**बांधील श्रमपद्धती रद्द करणारा कायदा :** २४ ऑक्टोबर १९७५ रोजी भारत सरकारने बांधील श्रमपद्धती रद्द करणारा वटहुकूम काढला. १९७६ मध्ये ह्या वटहुकुमाचे कायद्यात परिवर्तन करण्यात आले. ह्या कायद्यान्वये सावकाराने दिलेल्या उचलीच्या किंवा कर्जाच्या किंवा त्यावरील व्याजाच्या मोबदल्यात श्रम बांधून घेण्यावर बंदी घालण्यात आली. काही ठिकाणी सामाजिक चाल म्हणून विशिष्ट जातींच्या लोकांनी विशेषतः दलितांनी गोठा झाडल्याची वगैरे अशी कामे केलीच पाहिजे अशी पद्धत होती. ह्या कायद्यात ह्या पद्धतीवर बंदी घालण्यात आली. अनेक ठिकाणी शेतीतील उभे धान्य सावकारालाच विकले जाईल अशा प्रकारचे करार होते. ठाणे जिल्ह्यात ह्याला 'पालेमोड' पद्धती म्हणत असत. कायद्यान्वये ह्याही पद्धतीला बंदी घालण्यात आली.

ह्या कायदा झाल्यावर अनेक राज्य सरकारांनी आपल्या राज्यात बांधील श्रमपद्धती अस्तित्वातच नाही अशी भूमिका घेतली. महाराष्ट्र सरकारही हीच भूमिका घेतली. त्यानंतर अनेक संघटनांनी आपल्या विभागातील बांधील गड्यांची नावे जाहीर केली व त्यांच्या मुक्ततेसाठी शासकीय अधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केले. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने आपली भूमिका बदलून बेकायदा सावकारांची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीला बांधील श्रमपद्धतीची चौकशी करण्यास सांगितले. ह्या समितीने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बांधील गडी असून ते लग्नगडी किंवा घरगडी ह्या नावाने ओळखले जातात असा अहवाल दिला.

बांधील गड्याची कायद्याने नुसती मुक्ती करून चालणार नाही, तर त्याच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले पाहिजेत ही जाणीव नंतर शासनाला झाली. त्यादृष्टीने योजना तयार करण्यात आल्या. मात्र एकंदरीत बांधील गडी शोधण्याच्या कामात प्रामुख्याने स्वयंसेवी संघटनांनीच पुढाकार घेतला आहे असे दिसून येते. त्यांना काही ठिकाणी शासकीय अधिकाऱ्यांची मदत झाली तर काही ठिकाणी विरोध झाला.

अनेकदा, विशिष्ट प्रकारचे गडी गांधील गडी नाहीत अशी भूमिका शासनाने घेतली. कायद्यात प्रचलीत वेतनापेक्षा कमी वेतनावर काम करणे ही बांधील गडी ठरविण्याची एक कसोटी सांगितली आहे. अशावेळी प्रचलीत वेतन काम ह्या विषयीचा वाद होऊ लागला. ज्या-ज्या ठिकाणी कायद्याने किमान वेतन ठरवून दिले असेल त्या–त्या ठिकाणी ते किमान वेतनच प्रचलीत वेतन मानले गेले पाहिजे असा स्पष्ट निर्णय दिल्लीतील एशियाड खेळांच्या पूर्वतयारीची बांधकामे करणाऱ्या कामगारांच्या संदर्भात दिला. सरकारी दाव्यानुसार आतापर्यंत ५ लाखापेक्षा अधिक बांधील गडी मुक्त करण्यात येऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले. मात्र अजूनही बांधील श्रमपद्धती संपूर्ण उच्चाटन

( पान ३९ वर पहा )

वेठबिगार प्रश्नासंबंधी

# साठे–धागमवार चौकशी समितीचा अहवाल

ठाणे जिल्ह्यातील श्रमजिवी संघटनेचे कार्यकर्ते विवेक पंडित यानी महाराष्ट्र सरकारविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेप्रकरणात चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने डॉ. एस. पी. साठे, आय. एस. लॉ. कॉलेज, पुणे व दिल्लीतील कार्यकर्त्या डॉ. वसुधा धागमवार यांची चौकशी समिती नेमली. न्यायालयाने चौकशी समितीला (१) ठाणे जिल्ह्यातील वेठबिगारांच्या मुक्ततेत येणाऱ्या अडचणी व (२) ठाणे जिल्ह्यातील वेठबिगारांच्या पुनर्वसनात येणाऱ्या अडचणी याबाबत चौकशी करून अहवाल देण्यास सांगितले.

डॉ. साठे व डॉ. धागमवार यांनी ठाणे जिल्ह्यातील याचिकेशी संबंधीत काही गावांना भेटी दिल्या. त्यांनी जिल्हा-दंडाधिकारी श्रीमती जॉयस शंकरन् व मजूर मंत्रालयाचे अधिकारी, तहसीलदार–वसई, उपविभागीय दंडाधिकारी, पोलिस स्टेशनचे अधिकारी, दहिसर ग्रामपंचायतीचे सरपंच व काही सदस्य, श्रमजिवी संघटनेचे विवेक पंडित व विद्युल्लता पंडित, त्यांचे सहकारी निवृत्त तहसीलदार श्री. भुसकुटे व इतर सहकारी तसेच मुक्त वेठबिगार व वेठ-बिगारीत असलेले मजूर व वेठबिगारांना ठेवणारे मालक इ. ची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

...दि. २७–६–८४ रोजी सकाळी आम्ही दहिसर गावचे सरपंच श्री. दत्तात्रय आर पाटील व इतर ग्रा. पं. सदस्यांची भेट घेतली. श्री. विवेक पंडित किंवा श्रीमती विद्युल्लता पंडित यांना शिवीगाळ केल्याचा श्री पाटील यांनी इन्कार केला. ते १९६२ पासून ग्रा. पं. चे सदस्य आहेत व पाच वर्षासाठी सरपंचपदी असण्याची त्यांची ही दुसरी वेळ असल्याचे आमच्या प्रश्नांना उत्तर देताना सरपंचांनी सांगितले. आपल्या पंचायतीत कोणी वेठबिगार आहे काय असे आम्ही त्यांना विचारले असता त्यांना किंवा इतर सदस्यांना वेठबिगार म्हणजे काय हे माहित नसल्याचे उत्तर त्यांनी दिले. त्यांचेकडील मजूर आगाऊ पैसे घेऊन कर्ज फिटेपर्यंत काम करणारे व कर्ज फिटण्यापूर्वी पुन्हा आगाऊ पैसे घेणारे असे असल्याचे त्यांनी सांगितले. १९८२ नंतर ह्या भागात वेठबिगार आढळल्यानंतर तरी किमान वेठबिगार म्हणजे काय ह्यासंबंधी सरकारी अधिकाऱ्याकडे चौकशी केली काय असे विचारले असता मी तशी चौकशी केली नसल्याचे श्री. पाटील म्हणाले. गेल्या २ वर्षात त्यांचे ग्रा. पं. तीत ९ वेठबिगार मुक्त झाल्याचे श्री. पाटील यांनी आमच्या चौकशीच्या उत्तरात सांगितले. ...

...श्री. प्रभाकर सामंत यांचेकडील मजुरांना प्रतिदिवशी १$\frac{3}{4}$ पायली भात मिळते. १०० रुपयांइतकी रक्कम दरवर्षी कर्जातून वजा केली जाते. दोन वर्षाच्या नोकरी-नंतर ह्यापैकी एकावर त्याने कर्जाऊ घेतलेली सर्व रक्कम बाकी आहे. लवकर सकाळी ते संध्याकाळी उशीरापर्यंत त्यांना काम करावे लागते. त्यांना दिवसातून तीनदा चहा मिळतो. वेठबिगाराच्या बायकांना ५। रुपये रोज व सकाळी एक चहा मिळतो.

काल रात्री ८ नंतर आम्ही जेव्हा सामंताच्या मजुरांना शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा तो बाहेर येऊ शकला नाही ही बाब आम्ही मुद्दाम निदर्शनास आणू इच्छितो.

...दिघाशीचा पांडू लडकू तरे यांनी दिघाशीच्या शंकर पाटलाकडून सहा वर्षापूर्वी कर्ज घेतल्याचे सांगितले. त्यानी लग्नापूर्वी १ वर्ष काम केले व लग्नानंतर ६ वर्षे काम केले आणि त्यापोटी त्याला दर महिन्याला १ मण भात दिले जाई. त्याला रोख पैसे मिळत नसत, किंबहुना जत्रा किंवा मेळ्यासाठीही काही मिळत नसे. सावकाराने दरवर्षी कर्जातून १०० रु. वळते करून घ्यायचे असे तोंडी ठरले होते. पांडूकडे अजून ४००/– रु. बाकी असल्याचे सांगतो व पांडूच्या नवीन मालकाला भीती दाखवितो. दिघाशीचाच काळू देव बाधे यानी तुकाराम पाटील ह्या त्याच्या सावकाराकडे १२ वर्षे काम केले. ह्यापैकी त्यांनी लग्नापूर्वी ३ वर्षे व लग्नानंतर ५ वर्षे असे ८ वर्षे पूर्ण वेळ काम केले. त्यानंतर शेती हंगामात त्यानी ४ वर्षे काम केले. लावणी व कापणीच्या हंगामात त्याच्या बायकोने काही महिने काम केले. पांडूने त्याचे लग्नासाठी ४०० रुपये कर्ज काढले. त्याला दिवसातून तीनदा जेवण दिले जाई. मात्र रोख काहीही दिले जात नसे. प्रतिवर्षी ५०/— रु. प्रमाणे कर्ज

वळते करून घेतले जात असे. त्याची बायको जेव्हा कामावर जात असे तेव्हा तिला लावणीच्या पूर्ण हंगामासाठी ५०/– रु. व १ मण भात दिले जाई. कापणीसाठी तिला रोज २ पायली भात मिळत असे. सावकाराच्या सांगण्याप्रमाणे आपल्यावर नियत असलेली सावकाराची १३२/– रुपयाची बाकी दिल्यानंतर १९८१ साली काळू मुक्त झाला. ...

... विरार पोलिस स्टेशनला वेठबिगारांच्या सुमारे १५० केसेसची नोंद झाल्याचे पोलिस स्टेशनच्या २ सब–इन्स्पेक्टर्सनी आम्हाला सांगितले. वेठबिगार निर्मूलन कायदा, १९७६ खालील प्रोसिजर माहित नसल्याने १९८२ साली ह्यापैकी ७ केसेस ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट ( प्रथम वर्ग ) कडे पाठविली. उरलेली प्रकरणे १९८३ मधील आहेत. १९८४ मध्ये एकही प्रकरण नव्हते. उरलेली प्रकरणे उपविभागीय दंडाधिकारी, भिवंडी उपविभाग, ज्याचा वसई भाग आहे, यांचेकडे पाठविली आहेत.

१९८३ साली ३ पोलिस पाटलांविरुद्ध वेठबिगार ठेवल्याचा आरोप असल्याचे सब-इन्स्पेक्टर्सनी आमच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. तीन पोलिस पाटलांविरुद्धची तसेच इतर अनेक वेठबिगारांच्या केसेस त्यावेळचे तहसीलदार श्री. भुसकुटे यांनी त्यांचेकडे पाठविली होती. कणेरची पोलिस पाटील श्री. हरेश्वर नाईक यांचेविरुद्ध त्यांनी २ वेठबिगार ठेवल्याबद्दल १८–२–८३रोजी पोलिसांकडे तक्रार झाली होती आणि पोलिसांनी ३–३–८३ रोजी चार्जशीट पाठविण्यात आले. आम्ही त्यांचेकडे भेट दिली तेव्हा हरेश्वर नाईक घरी नव्हते. दीपावलीचे पोलिस पाटील श्री. गौरू दाजी पाटील यानी २ वेठबिगार ठेवल्याबद्दल त्यांचेविरुद्ध १७–७–८३ रोजी पोलिसांकडे तक्रार दाखल झाली होती १–९–८३ व ३–९–८३ रोजी त्यांची चार्जशीटस् पाठविण्यात आली. पाटोळेचे पोलिस पाटील श्री. दत्ता पी. पाटील यांनी वेठबिगार ठेवले असल्याबद्दल त्यांचेविरुद्ध ४ केसेस आहेत. ह्या तक्रारी दि. १६ व १७ जुलै १९८३ रोजी दाखल करण्यात आल्या होत्या. एक चार्जशीट परंतु तीही उशीरा सप्टेंबर ८३ मध्ये पाठविण्यात आले. सर्व चार्जशीटस् उपविभागीय अधिकाऱ्यांकडे गेल्या. १०–६–८४ रोजी पोलिसांनी पोलिस पाटलांविरुद्ध असलेल्या केसेसची माहिती उपविभागीय अधिकारी, जे पोलिस पाटलांची नेमणूक करणारे अधिकारी आहेत, त्यांना दिली होती. ...

... ठाण्याला परतल्यावर आम्ही अनेक अधिकाऱ्यांची भेट घेतली. १६–३–८३ रोजी त्यांनी सुत्रे घेतल्याचे उपविभागीय दंडाधिकारी, भिवंडी उपविभाग श्री एस. यू. प्रधान यानी आम्हाला सांगितले. वेठबिगार ( पद्धत ) निर्मूलन कायद्यांतर्गत कायद्यातील कलम २१ अन्वये प्रकरणे चालविण्यासाठी त्यांची सरकारने नेमणूक केली होती. त्यांचेकडे असलेल्या १४८ केसेसपैकी २ केसेसमध्ये तक्रार करणाऱ्यांनी तक्रार मागे घेतल्याने त्या वगळण्यात आल्याचे ते म्हणाले. एका प्रकरणी सुनावणी चालू आहे तर एका प्रकरणात ते निकाल देणार होते. कामाच्या व्यापामुळे ते ह्या केसेससाठी वेळ देऊ शकले नसल्याचे ते म्हणाले. ह्या सर्व केसेस १९८३ मधील आहेत. तत्पूर्वीच्या किंवा नंतरच्या कोणत्याही केसेस त्यात नाहीत. तीन पोलिस पाटलांपैकी पाटोळे येथील पोलिस पाटलांना ते पाटोळे येथे राहत नसल्याने कमी करण्यात आले. वेठबिगार ठेवल्याच्या कारणावरून त्याला बडतर्फ करता आले असते, कमी करणे शक्य नव्हते असे आम्हाला सांगण्यात आले. दीपावली व कणेरच्या पोलिस पाटलांना वेठबिगार ठेवल्याच्या आरोपावरून बडतर्फ करण्यात आले. ह्या तिन्ही केसेसमध्ये २८–६–८४ लाच कारवाई केली गेली ...

... आम्ही दक्षता समितीच्या ४ सदस्यांना भेटलो. पहिली दक्षता समिती, जी आजपर्यंत चालू आहे. १९६७ साली नेमण्यात आली. जिल्हा दंडाधिकाऱ्यासह तिचे ९ सदस्य होते. ह्या नेमणूका करताना वेठबिगार कायदा (क्र. १३ ) मधील तरतुदींचे पालन केल्याचे दिसत नाही. आम्ही भेटलेल्या चारही सदस्यांची नव्याने गठीत होणाऱ्या दक्षता समितीसाठी फेरनिवड करण्याची शिफारस करण्यात आली आहे. ह्या चारपैकी एक श्री. एस. जी घांगव म्हणाले की ते दक्षता समितीच्या एकूण ३ सभांना हजर राहिले. त्यांना ह्या फक्त तीन सभांचीच निमंत्रणे मिळाली होते. श्री. आर. सी. भोये व श्री. एस. आर. शिंदे हे ( कॉंग्रेस ) चे माजी आमदार व श्री. एस. बी. भोईर हे कॉंग्रेस आय चे सक्रीय सभासद होते. त्यांचेपैकी कोणालाही आपल्या तालुक्यात किंवा जिल्ह्यात वेठबिगार असल्याची माहिती असेल असे दिसले नाही. वेठबिगारांसंबंधी त्यांचेकडे कोणतीही तक्रार आणली नसल्याचे त्यांनी सांगितले. दक्षता समितीच्या द्वैमासिक सभांना नियमित हजर राहिल्याचे तिघांनीही सांगितले. १९८२–८३ मध्ये पालघरमध्ये ३०–४० वेठबिगार शोधल्याचे श्री. भोईर म्हणाले. दक्षता समितीशी कोणताही सामाजिक कृती गट सहयोगी नव्हता. श्री. व सौ. पंडिताचे नावाची अनुक्रमे १०–३–८३ व

२९–७–८३ रोजी जिल्हाधिकाऱ्याने ( त्याचे दि. १० जानेवारी ८४ च्या कार्यालयीन पत्रान्वये ) शिफारस केलेली आहे मात्र राज्य सरकारने त्यावर कोणताही निर्णय घेतलेला घेतलेला नाही.

१९७७–७८ मध्ये पालघर तालुक्यातील एका सामाजिक कार्यकर्त्यांनी त्याचे नाव धोदडे आहे, काही वेठबिगार शोधून काढल्याचे जिल्हा दंडाधिकारी डॉ. ( श्रीमती ) जॉयस शंकरन् म्हणाल्या. त्यानंतर श्रमजिवी संघटनेने वेठबिगाराचा शोध घेतला. सरकारने स्वत: एकही शोधून काढला नाही. आदिवासी जमिनींचा ताबा देण्याचे पुढे ढकलल्याचा हुकूम दिल्याचा जिल्हादंडाधिकाऱ्यांनी नकार दिला. ( पान ३५ ). आपण मराठी बोलू शकत असल्याने माझ्यामध्ये व वेठबिगारामध्ये आपण हस्तक्षेप करू नका. काही बोलू नका असे पंडिताना बजावण्यात आपण काही चूक केल्याचे वाटत नसल्याचे त्या म्हणाल्या. शेतकरी संतापलेले होते व श्री. पंडित यांनीही आपणास भीती असल्याचे सांगितले होते. त्यामुळे पंडितांच्या सुरक्षिततेची मला काळजी होती. म्हणूनच पंडितांना त्यांनी शेतकऱ्यांना स्वत:च्या विरोधी बनविण्यापेक्षा त्यांनी वेठबिगारांची यादी महसूल अधिकाऱ्याकडे द्यावे असे मी त्यांना सागितल्याचे जिल्हा दंडाधिकारी म्हणाल्या. आम्ही नंतर शेतकऱ्याची भेट घेतली. त्यानी पंडिताचे म्हणण्यास पुष्टी देऊन तो म्हणाला की त्यांनी पंडितांशी न बोलता त्यांचेकडे येणाऱ्या महसूल अधिकाऱ्याशी बोलावे असे जिल्हादंडाधिकाऱ्यानी सांगितले होते. मात्र हे कधी घडलेच नाही असे शेतकरी म्हणाले. कोणीही अधिकारी कधीही फिरकला नाही.

विवेक पंडित यानी वेठबिगार असल्याचा दावा केल्यानंतर, तसे कायदेशीर सिद्ध होण्यापूर्वीही त्यांच्या प्रशासनाने वेठबिगारांना आर्थिक मदत व पुनर्वसनाचे कामात खूपच साहाय्य केल्याचे सौ. शंकरनना वाटते. जेथे आदिवासी व बिगर आदिवासी अशी मिश्र वस्ती आहे व जेथे अदिवाशी आपल्या परंपरागत भागातून बाहेर आले आहेत अशा पालघर, वसई, भिवंडी भागातच वेठबिगार दिसतात असे श्रीमती शंकरन आमच्या एका शंकेला उत्तर देताना म्हणाल्या. असे असताना दक्षता समितीवर जेथे वेठबिगार नाहीत अशा शहापूर व मोरवाडा तालुक्यातून अनुक्रमे ३ व २ सदस्य कसे नेमले गेले व वसईतून कोणीही सभासद नाही व पालघर, भिवंडीतून प्रत्येकी एकच सभासद असे का ? असे आम्ही त्यांना विचारले. नव्याने गठित होणाऱ्या दक्षता समित्यावर सामाजिक कार्यकर्त्यांचे नाव का सुचविले नाही असेही आम्ही त्यांना विचारले. नियोजित दक्षता समितीत जुन्या समितीतील सभासद आहेत. त्याला फारसे महत्त्व नसल्याचे जिल्हा दंडाधिकारी म्हणाल्या कारण दोघाही पंडितांना दक्षता समितीच्या सभांना नियमितपणे बोलविले जाते ( मला काही वेळा बोलविले जाते परंतु माझी पत्नी विद्युलता हिला बोलविले जात नाही असे श्री. पंडित म्हणाले ) पालघरमधील कार्यकर्त्यासंबंधी त्या म्हणाल्या की धोदडे आता फारसे सक्रीय नसल्याची त्यांची माहिती आहे. त्यांचा संदर्भ जर भूमिसेनेच्या श्री काळूराम धोदडेशी असेल तर हा वारली नेता सक्रीय कामात आहे व पालघरमधील वेठबिगारांच्या प्रश्नात खूपच लक्ष घालीत आहे...

... त्या दुपारी आम्ही भाई पाटील यांच्या दीपावली येथील शेतावर / जमिनीवर गेलो. त्यांची जमीन रस्त्यापासून लांब आहे आणि काही अंतर चालल्यानंतर मजूर विभागाच्या अधिकाऱ्यांनी गौरू पाटील ( माजी पोलिस पाटील, ज्यांना वेठबिगार ठेवल्याच्या आरोपावरून बडतर्फ केले होते ) यांना मजुरांना शोधण्यास पाठविले. तो सुमारे २० मिनिटानंतर ५ माणसांना घेऊन आला. त्यापैकी एक दिसायला चांगला व चांगले कपडे केलेला होता. तो शेजारचा शेतकरी असल्याचे गौरू म्हणाला. हा मनुष्य आमच्यापासून काही अंतरावर मजूर विभागातील कोणा अधिकाऱ्याशी बोलत होता. आम्ही जेव्हा एकेक मजुराला तू कोण म्हणून विचारले तेव्हा त्यांनी मी भाई पाटलाकडे काम करतो व मला दिवसाला ७ रु. मिळतात असे उत्तर दिले. तुम्हाला आम्ही मजुरीसंबंधी विचारण्यासाठी आलो आहोत हे कसे कळले ह्या आमच्या प्रश्नाला ते काहीही उत्तर देऊ शकले नाहीत. एकजण म्हणाला तो बांधील होता, त्याचे कर्ज ४०० /– रु. होते. ते त्यांनी १० वर्षांत फेडले होते. नंतर त्यांनी आमच्या खांद्याकडे पाहिले आणि ३ वर्षे असा बदल केला. आजूबाजूला नजर टाकली असता गौरू पाटील तेथे उभा असल्याचे आम्हाला दिसले आम्ही त्याला बाजूला जाण्यास सांगितले.

त्यापैकी दोन जण नंतर म्हणाले की ते प्रत्येकी ४०० रु. साठी बांधील होते. नंतर तिसरा आपण बांधील नसल्याचे म्हणाला. त्यांना सर्वांना प्रतिदीन ७ /– रु. एक चहा व नाश्ता मिळतो. ते दुपारी घरी जातात असे ते प्रथम म्हणाले परंतु त्यांना दुपारचे जेवण दिले जाते हे सांगण्यासाठी त्यानी त्यात बदल केला. स. ८ ते १२ व दुपारी ३ ते ५ असे त्यांचे कामाचे तास होते......

...वाडा तालुक्यातील वसुरी गावातील काही मजुरांना आम्ही भेटलो. एक म्हातारा, मिठू पांडू त्यांनी आपल्या लग्नासाठी ६ ते १० वर्षापूर्वी ५००/– रु. चे लग्न काढल्याचे म्हणाला, त्यांनी महिन्याला ३२ पायली भातावर काम केले. त्याची बायको शेतीच्या हंगामात काम करते. तिला २ पायली भात किंवा ३/– रु. मिळतात. त्याचे कर्जातून दरवर्षी ५०/–रु. वजा केले जात. त्याचेवर किती बाकी निघते त्याची त्याला माहित नाही. बांधील गडी सोडून गेला तरी सावकार त्याला हरकत घेत नाही. दुसऱ्या एका मालकाकडे काम करणाऱ्या रमेश सुकऱ्या यानेही ३ वर्षांपूर्वी त्याचे लग्नासाठी ५००/– रु. चे कर्ज काढल्याचे सांगितले. त्यांनी लग्नापूर्वी २ वर्षे व लग्नानंतर ३ वर्षे फक्त जेवून-खावून काम केले. महिनाभर चालणाऱ्या लावणीसाठी त्यांना ३२ पायली भात मिळते असे हे मजूर म्हणाले. त्यांच्या बायकांनाही तेवढेच मिळते. मुक्त मजुराला ३/– रु. रोज किंवा दिवसाला २ पायली भात व दोन वेळा चहा व नाश्ता म्हणून दोन भाकऱ्या मिळतात. त्यापैकी बहुतेक सर्वच जण जळ सावकाराच्याच जमिनीवर राहतात.....

...दहिसर व कणेर गावातील बऱ्याच लोकांना एकात्मिक ग्रामीण विकास योजनेखाली कर्ज मिळाले होते बेठबिगाराच्या पुनर्वसनासाठी नव्हे तर दारिद्र्यरेषेखालील कोणाही व्यक्तीसाठी असते. त्यांना मिळालेल्या सहाय्यात ही त्यांना अडचणी भासत आहेत. उदा. हंगामानंतर बैलजोडी दिली जाते, आणि गाडीविना त्यांचा कमाईसाठी उपयोग होऊ शकत नाही. त्यांना दिलेली घरे कमी दर्जाची व केव्हाही कोसळतील अशी होती. दुसऱ्या ठिकाणी आम्ही मुक्त वेठबिगारांना भेटलो त्याना अजून कोणतीही मदत मिळाली नव्हती. भाताणे व अंबोडे येथे ही स्थिती होती...

...महाराष्ट्र सरकारने, मजुर विभागाला कोणत्या नियमांतर्गत वेठबिगार शोधण्यासंबंधी सूचना दिलेल्या आहेत. हे स्पष्ट झाले नाही. कायद्यातील कलम १० प्रमाणे असे करता येणे शक्य नव्हते. ह्या कलम १० अंतर्गत फक्त जिल्हा दंडाधिकारी आपल्याकडे असलेले अधिकार इतर अधिकाऱ्याकडे सोपवू शकतो. कलम १० अंतर्गत असा अधिकारी जिल्हा दंडाधिकाऱ्याखालचा अधिकारी असावा लागतो आणि मजुर विभागाचे अधिकारी जिल्हादंडाधिकाऱ्याच्या खालच्या दर्जाचे नाहीत.

...थोडेसे पुनर्वसनाचे जे काम केले होते ते २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत, संजय गांधी निराधार योजना व एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत झाले होते. हे लक्षात घेतले पाहिजे की ही मदत त्यांना वेठबिगार म्हणून देण्यात आली नव्हती तर त्यांचे दारिद्र्य हे त्याचे कारण होते. कायद्यान्वये जिल्हा प्रशासन हे मदतकार्य अधिक परिणामकारकपणे राबवू शकले असते. वेठबिगारांचे पुनर्वसनाबाबत मग ते कोणत्याही योजनेखाली म्हणजे बांधील गडी किंवा दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती म्हणून असो महसूल अधिकारी आम्हाला कोणतीही माहिती देऊ शकले नाही.

कायद्यातील कलम २१ अंतर्गत जे गुन्हे चालविण्याचे अधिकार विशिष्ट अधिकाऱ्यांना दिले होते. श्री. प्रधान एम्. डी. एम्. कार्यकारी दंडाधिकारी होते व ठाणे जिल्ह्यापुरते हे अधिकार त्यांना सोपविले होते. कामाचा फार व्याप होता त्यामुळे मला त्या केसेसचा पाठपुरावा करण्यास फारसा वेळ मिळाला नाही असे श्री. प्रधान म्हणाले. त्यासाठी स्वतंत्र कार्यकारी दंडाधिकारी नेमण्याची शिफारस करण्याचा आपला विचार असल्याचे जिल्हादंडाधिकाऱ्यांनी आम्हाला सांगितले होते. पण एकाही प्रकरणी निर्णय झाला नाही ही वस्तुस्थिती कायम राहते. श्री. प्रधानांसमोर दोन केसेस सुनावणीसाठी होत्या आणि एका केसमध्ये ते निर्णय देणार होते. ह्यासाठी कोणाही सावकाराला अजून शिक्षा झालेली नाही. Summary Procedure ने केसेस चालविण्याची तरतूद कायद्यात असण्याची गरज आहे. गुन्हेगारांची नोंद करण्यात कायदा इतका वेळ का घेतो हे आम्हाला समजले नाही. हा वेळकाढूपणा कायद्याची परिणामकता नष्ट करतो...

... म्हणून याचिका क्र. १५०३–१५०४/४ मधील प्रतिज्ञापत्रातील पाहणीकाळातील आमचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

(१) ठाणे जिल्ह्यात वेठबिगार पद्धत मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहे.

(२) वेठबिगार शोधून काढण्याचे काम पूर्णपणे व फक्त सामाजिक कार्यकर्त्यांनीच केलेले आहे. व ही वस्तुस्थिती सरकारच्या महसूल व मजूर ह्या दोन्ही विभागातील शासकीय नोकरांनी मान्य केली आहे.

( ३ ) कायद्यातील कलम १० प्रमाणे आवश्यक ते अधिकार जिल्हा दंडाधिकाऱ्यांना देण्याचे महाराष्ट्र सरकारने नाकारले आहे.

( ४ ) वेठबिगार म्हणून व वेठबिगाराचे पुनर्वसनासाठी राज्यांनी काहीही केलेले नांही.

( ५ ) कायद्यातील कलम २१ खाली वेठबिगार ठेवणाऱ्याविरुद्ध करावयाची कारवाई खूपच वेळकाढूपणाची आहे व गुन्हेगाराला शासन केले जात नाही.

( ६ ) कायद्यांअंतर्गत कलम १३ (१) प्रमाणे स्थापन करावयाच्या दक्षता समिती तयार करताना १३(२) तरतुदीचे तंतोतंतपणे पालन केले जात नाही. वेठबिगाराच्या मुक्तीशी संबंधित असलेला कोणताही सामाजिक कार्यकर्ता दक्षता समितीवर नेमला गेलेला नाही.

म्हणून दोन याचिकेमध्ये प्रतिज्ञेवर सांगितलेले बऱ्याच अंशी खरे आहे.

---

पान ३४ वरून ]

झाले नाही असा अनेक स्वयंसेवी संघटनांचा दावा आहे. अजूनही अनेक ठिकाणी बांधील गड्यांची प्रकरणे उघडकीस येत आहेत. मार्च, १९८७ मध्ये ठाणे जिल्ह्यात काम करणाऱ्या श्रमजीवी संघटनेने अनेक बांधील गडी मुक्त केले. ह्या संबंधीच्या एका खटल्यात बांधील गडी ठेवणाऱ्या जमीनदाराला कोर्टाने ३ महिने सक्त मजुरी आणि दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. बांधील श्रमपद्धती निर्मूलन कायद्याखाली मालकाला शिक्षा झाल्याचे हे पहिले उदाहण आहे. इतरही राज्यात अशा प्रकारची शिक्षा झाल्याची प्रकरणे एक–दोनच आहेत.

**सारांश आणि निष्कर्ष :** एकंदरीत कायद्याने बांधील श्रमपद्धती नष्ट करण्यावर बऱ्याच मर्यादा पडलेल्या दिसतात. ह्या पद्धतीचा उगम देशातील, विशेषतः ग्रामीण भागातील आत्यंतिक बेकारी व अज्ञान तसेच समाजातील दुष्ट चालिरीतींचा आत्यंतिक प्रभाव ह्यातून झालेला आहे. ही मूळ कारणे काही प्रमाणात तरी नाहिशी केल्याशिवाय बांधील श्रमपद्धती मोठ्या प्रमाणावर कमी होणे अशक्य आहे. केवळ कायदा करून ती जाणार नाही. याचा अर्थ अशा कायद्यांचा काहीच उपयोग होत नाही असे नाही. त्यामुळे, अशा प्रकारच्या पद्धतीतील दोष लोकांच्या लक्षात येतात आणि सामाजिक कार्यकर्त्यांना अशा दुष्ट पद्धतीविरुद्ध लढण्यास निश्चितच मदत मिळते. बांधील श्रमपद्धती निर्मूलन कायद्याचा आधार घेऊन अशा प्रकारचा संघर्ष अनेक संघटनानी चालविलेला आहे.


# आवाहन

**भटक्या विमुक्तांच्या अडचणी, सुख-दुःख आणि विचारांची बांधिलकी मानून उद्बोधनाचे कार्य करणाऱ्या पाक्षिक ' विमुक्त विचार ' ला हवंय—**

- क्रतिशील विचारांचं लेखन
- विद्रोही कथा, कविता
- परखड विचार
- भटक्या विमुक्त जमातीची जीवन गाथा
- अभ्यासपूर्ण लेख.

संपर्क :

**संपादक ' विमुक्त विचार '**

बंजारा कॉलनी औरंगाबाद ४३१००१

# अंमलबजावणीतील निष्काळजीपणा ही लोकशाही पद्धतीची मोठी शोकांतिका

— स्वामी अग्निवेश

**बंधुआ मुक्ती मोर्चा वेठबिगार मुक्तीसाठी लढणारी संघटना. त्यांचे नेते स्वामी अग्निवेश यांनी सरकार-न्यायालय इ. चे त्यांना आलेले अनुभव व त्यांचे कामाचे मूल्यमापनासंबंधी 'द लॉयर्स कलेक्टीव्ह' ह्या कायदेविषयक मासिकाच्या प्रतिनिधीशी केलेली ही बातचीत.**

**प्रश्न :** स्वामीजी तुम्ही वेठबिगारांना संघटित करण्याचे, त्यांना वेठबिगारीतून मुक्त करण्याचे काम करता, या सर्व कामाचे मूल्यमापन तुम्ही स्वतः कसे करता ?

**स्वामी अग्निवेश :** खरं तर, वेठबिगारांना मुक्त करणं, त्यांना स्वातंत्र्य मिळवूण देणं इ. बाबतीत आम्ही फार ठोस असं काही करू शकलो आहोत असे मला वाटत नाही. एकूण सर्व प्रश्नाकडे पाहता हा प्रश्न किती व्यापक आहे याची जाणीव होते. आमच्या मते ५० लाखाहून अधिक वेठबिगार अतिशय वाईट अवस्थेत बांधील जीवन कंठित आहेत. संख्येचाच विचार करता असं लक्षात येतं की बंधुआ मुक्ती मोर्चाच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपाद्वारा आम्ही २०,००० पेक्षा जास्त मजुरांची सुटका करू शकलो नाही. यापैकी अनेकांचे पुनर्वसन झालेले आहे परंतु आमच्या-दृष्टीने ते फारसे समाधानकारक नाही. तेव्हा तुम्ही या कामासाठी लावलेले परिश्रम व वेठबिगार मुक्तीच्या संदर्भात त्याचे यश पाहिले तर ते फारसे नाही हे तुमच्या लक्षात येईल. पण या प्रश्नावर कोर्ट कचेऱ्या, प्रसार माध्यमे, लोकसभा, व इतर सामाजिक कृती गटांमार्फत झालेली जागृती विचारात घेतली तर ती बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अमल्याचे दिसून येईल. या प्रश्नाबाबत काही करण्याची राजकीय इच्छाशक्ती नसली तरी देखील आज आपल्या राज्यकर्त्यांना वेठबिगार म्हणून काही चीज अस्तित्वात आहे हे मान्य करावे लागते. आज कोठेतरी सत्तेच्या उच्च स्थरांमध्ये हे कठोर वास्तव स्वीकारलं जातयं

**प्रश्न :** तुम्ही न्यायालयात जाण्याचा निर्णय कसा घेतलात ? तुमच्या त्याबाबत काय अपेक्षा होत्या.

**स्वामी अग्निवेश :** एशियाड केसबाबतचा निकाल आम्हाला ज्ञात झाला होता. सर्वोच्च न्यायालयाने आणलेल्या नवीन मुद्यांमुळे आम्ही उल्हासित झालो होतो. आम्ही जर पत्र लिहून आमचीदशा त्यांच्या निदर्शनास आणून दिली तर आम्हाला न्याय मिळेल अशी आम्हाला आशा वाटली. न्यायालय परिस्थितीची ताबडतोबीने दखल घेईल याबद्दल आम्ही बरेच आशावादी होतो. बांधील मजुरांना न्यायालय निरपराधपणे कोठडीत असलेल्या व्यक्ती समजून हेबियस कॉर्पस प्रमाणे आमच्या याचिकेवर कार्यवाही करील असे आम्हाला वाटत होते. आणि सर्वोच्च न्यायालयाने तत्परता दाखवून कार्यवाहीस सुरुवातही तशीच केली. त्यांनी अधिक तपशील मिळविण्यासाठी त्वरित चौकशी आयोग नेमला. न्यायालयासमोर उभ्या केलेल्या काही मजुरांना त्यांनी स्वातंत्र्य दिले. त्यांना यादी दिली गेली परंतु त्यानंतर या कामाचा वेग थंडावत चालला.

**प्रश्न :** कोर्टापुढे तुमचे म्हणणे काय होते ? मालकाची व सरकारची त्यावर कोणती प्रतिक्रिया झाली ? आणि न्यायधिशांचा रोख कशा प्रकारचा होता ?

**स्वामि अग्निवेश :** आमचे म्हणणे साधे-सरळ व रोख ठोक होते. आम्ही म्हटले की हे बांधील मजूर असल्याने आमचे पत्र हेबियस कॉर्पस म्हणून दाखल करून घ्यावे. परंतु न्यायालयाने कमिशनरची नेमणूक केली. आम्ही त्याचे स्वागत केले कारण आम्हाला याचिकेत जे काही म्हणायचे होते त्याला ह्या कमीशनरांनी दुजोरा दिला. प्रत्येक चौकशी समितीने आरोपास भरीव पुरावा मिळवला व त्याहीपुढे जाऊन बांधील मजुरांची प्रत्यक्ष जागेवरीन भयानक परिस्थिती निदर्शनास आणून देऊन त्यांचे मुक्ती व पुनर्वसनासाठी मार्ग सुचविले. परंतु दरम्यानच्या काळात श्रीमंत ठेकेदारांनी देशातील सर्वात बड्या वकीलांना या कामी हाताशी धरले. सध्याचे कायदामंत्री श्री. अशोक सेन एकेकाळी ह्या ठेकेदारांचे वकील होते, नंतर डॉ. वाय्. बी.

चितळे सुद्धा त्यांचे वकील होते, ॲडिशनल सॉलिसिटर जनरल श्री. के. जी. भगत हे हरियाणा राज्याचे वकील म्हणून होते. म्हणजे सर्व बडे वकील आमच्या विरूद्ध उभे ठाकले होते. आणि कमीशनरचे अहवाल हे प्रथम दर्शनी केस म्हणून स्वीकारता येणार नाही असा त्यांचा युक्तीवाद होता. प्रतिवादींच्या वकिलांनी म्हटले, " जरी आपण या सर्व गोष्टी स्विकारल्या तरी हे मजूर बांधील मजुर आहेत असे सिद्ध होत नाही. त्यांना सक्तीचे मजूर म्हणता येईल परंतु ते बांधील मजुर निश्चितच नाहीत. " दुसऱ्या कोणी नव्हे तर ॲडिशनल सॉलीसिटर जनरलेने ही बाजू घेतली याचा आम्हाला धक्काच बसला. सरतेशेवटी न्यायालयाने निर्णय दिला, त्यात म्हटले की, जेव्हा कधीही एखाद्या मजुराला सक्तीने आपले श्रम द्यावे लागतील तेव्हा न्यायालय असे गृहीत धरेल की त्याला हे त्याला मिळालेल्या काही कर्जाच्या फेडीसाठी म्हणून करावे लागले व म्हणून तो बांधील मजुर आहे. मालक व सरकारलासुद्धा वाटले तर ह्या गृहीताचे पुरावा देऊन खंडण करता येईल, ह्या गृहीताचे खंडण करण्यासाठी जोपर्यंत भरभक्कम पुरावा पुढे आणला जात नाही, तोपर्यंत हे मजुर बांधील मजुर आहेत असे गृहीत धरून न्यायालयाने पुढे गेले पाहिजे व त्याला कायद्यातील तरतुदींचा फायदा मिळाला पाहिजे.

**प्रश्न :** बांधील मजुर मुक्त झाले आहेत काय ? त्यांचे पुनर्वसन झाले आहे काय ? पुनर्वसनाच्या कामात कोणत्या अडचणी आहेत ?

**स्वामी अग्निवेश :** कोर्टासमोर सादर केलेल्या यादीत जे मजुर होते त्यांची सुटका झालेली आहे. पुनर्वसन खूपच बेळखाऊ, बेशिस्त व अन्याय्य होते. समाधानकारक पुनर्वसन होण्यास महिने-महिने तर काही ठिकाणी वर्षे लागली. पुनर्वसन पूर्णतया आर्थिक स्वरुपाचे होते. आता राज्य सरकारही पुनर्वसनाच्या कामात पुढे येत आहे. परंतु येथेही कल्पनाशक्तीचा पूर्ण अभाव जाणवतो. सामुहिक पुनर्वनाऐवजी ते वैयक्तिक पुनर्वसनाकडे लक्ष केंद्रित करीत आहेत. एखाद्या कुटुंबात ४–६ मजूर असतील तर बहुधा ते कुटुंब प्रमुखाला पैसे देतात. बायको ही अनिवार्यपणे बांधील मजुर असते. परंतु स्त्रियाना ते स्वतंत्र बांधील मजूर म्हणून मान्य करीत नाहीत. ही फार मोठी उणीव आहे. कारण पुरुषप्रधान पद्धतीत पुरुष हा कुटुंब प्रमुख असतो आणि ह्यामुळे कुटुंबातील स्त्रीला केव्हाही पैसे मिळत नाहीत ते केवळ ४००० / — रु. देतात ( आता ६२५० / — पर्यंत वाढ केलेली आहे. ) जे फारच अपुरे आहेत.

**प्रश्न :** कोर्टातील तुमच्या या अनुभवाबाबत तुम्हाला काय वाटते ?

**स्वामी अग्निवेश :** प्रतिवाद्यांचे म्हणणे खोडून काढण्यासंबंधात न्यायाधीश समर्थ होते. मानवी जीवनाविषयीची त्यांची सखोल समज त्यांच्या निकालपत्रात पुरेपुर व्यक्त झाली आहे, आणि युक्तीवादाचे वेळीसुद्धा त्यांची सहानुभूती वेठबिगारांनाच असल्याचे दिसत होते. सर्वात तापदायक गोष्ट म्हणजे खटला महिनोन्‌महिने पुढे ढकलला जाण्याची, परंतु आपल्या न्यायव्यवस्थेचे स्वरूपच असे आहे की त्यासाठी न्यायधिशांना दोषी धरता येणार नाही.

निर्णय एक वर्षभर राखून ठेवण्यात आला हे आमच्या दृष्टीने खूपच आश्चर्याचे व निराशा आणणारे होते. १६ डिसेंबर १९८३ रोजी निर्णय देण्यात आला. त्यामुळे न्यायाधिशाची नेमकी भूमिका आम्हाला समजली नाही. त्यांना खरोखरीने प्रश्न समजला होता तर त्यांनी पटवर्धन समितीचा अहवाल दाखल झाल्यानंतर म्हणजे जुलै अखेरीस किंवा सप्टेंबर ८२ अखेरीस निर्णय द्यायला हवा होता. मी जर न्यायाधीश किंवा मुख्य न्यायाधीश असतो तर मी केसचा निर्णय लवकरात लवकर लावण्याचा प्रयत्न केला असता कारण न्यायदानाबद्दल सतत असे सांगितले जाते की, " न्यायास विलंब म्हणजे न्यायास नकार " जे खरंच सत्य आहे.

**प्रश्न :** जनहितकारी दाव्याबाबत तुमचे मत काय आहे ?

**स्वामी अग्निवेश :** जनहितकारी दाव्यांची संपूर्ण कार्यपद्धती सुरुवातीपासून संघर्ष, वाद-प्रतिवाद आणि परस्पर वैर यापासून मुक्त राहिली आहे. न्यायालयाचे अंतरिम आदेश धुडकावून लावण्याचे अत्यंत अन्याय्य प्रयत्न वारंवार होऊनही न्यायाधीशांचे रक्त कधीच सळसळले नाही आणि ते रोखण्यासाठी त्यानी प्रभावी हस्तक्षेप केला नाही.

सद्य:स्थितीत संघर्ष अपरिहार्य आहे हे न्यायाधिशांनी समजून घेतले पाहिजे. मला वाटते मी जर तेथे बसलेला न्यायाधीश असतो तर माझा शब्द कायदा झाला असता आणि मी ह्या लोकांना माझा हुकूम जुमानत नाही म्हणून तंबी दिली असती व कोर्टाचा अपमान केल्याचे आरोपाखाली त्यांचेपैकी काहीजणांवर कठोर टीका केली असती जेणेकरून त्यांना आपली नोकरी गमवावी लागली असती किंवा याची मानहानी झाली असती. दगडाच्या खाणीत काम करणारे मजुर हे वेठबिगार आहेत किंवा नाही याचाही ते निर्णय देऊ शकले नाहीत. त्यांनी पुन्हा चौकशी समिती

नेमली. निकालपत्रात दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे चौकशी समितीला आम्ही आरोप केला की हे सुमारे १०,००० बांधील मजुर अमानवी परिस्थितीत जगत आहेत आणि त्यासाठी त्यांचे बाबतीत 'होय, आम्ही याचिका स्विकारतो अशा किंवा इतर मार्गाने निर्णय देऊ शकले असते. त्यांनी याचिका मान्य केली. शेवटच्या परिच्छेदात त्यांनी 'आम्ही याचिका मान्य केली' असे म्हटले पण कशी ? त्यांनी त्यांना स्वातंत्र्य दिले किंवा मुक्त केले पण काय म्हणून ? बांधील मजुर म्हणून नव्हे,त्यांनी बांधील असा शब्द नाही वापरला, हे महत्त्वाचे आहे. कारण त्यांनी एकदा 'बांधील' म्हणून सुटका केली असे म्हटले की त्यांना कायद्याप्रमाणे सर्व हक्क लागू होतात.

**प्रश्न :** आयुक्तांच्या अहवालावर काय सूचना दिलेल्या होत्या ?

**स्वामी अग्निवेश :** न्यायालयाने २१ अगदी निवडक सूचना केल्या. दक्षता समित्या नेमून त्यात स्वयंसेवी संघटनांना प्रतिनिधीत्व द्यावे, समित्यांनी नियमित भेटावे, मजुरांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवावे, सावलीच्या जागेत पाण्याने भरलेले मातीचे भांडे ठेवावे, मजुरांना किमान वेतन, ट्रकचे भारवाहित्व ठरवून घ्यावे, मजुरांना प्रत्यक्ष वेतन दिले जावे, धुळीचे प्रदुषणावर नियंत्रण घातले जावे आणि मजुर मंत्रालयाच्या शिक्षण शाखेने वर्ग घेऊन मजुरांना त्यांचे हक्काबद्दल माहिती द्यावी इ. व इतर काही सूचना.

**प्रश्न :** शासनाने सूचनांची अंमलबजावणी केली काय ? नसल्यास त्याची अंमलबजावणी होण्यासाठी कोणते प्रयत्न केले गेले ? अंमलबजावणीत काय अडचणी आल्या ?

**स्वामी अग्निवेश :** माझ्या मते अंमलबजावणीतील निष्काळजीपणा ही आपल्या लोकशाही पद्धतीची, ज्यामध्ये न्यायदान पद्धतीचाही समावेश होतो, मोठी शोकांतिका आहे. जर आम्हाला कागदावर लिहीलेल्या शब्दांप्रमाणे जायचे असेल, लोकसभेत बोलल्या जाणाऱ्या शब्दांप्रमाणे जायचे असेल तर जगातील सर्वश्रेष्ठ म्हणून आमच्या संसद सदस्यांचे अभिनंदन करायला हवे. जनहितकारी दावे सुरू केल्यापासून किमान गेल्या ३–४ वर्षांत आपल्या न्यायालयांनी दिलेल्या निकालांबद्दल न्यायदान पद्धतीचे अभिनंदन करायला हवे. हे अहवाल सादर केल्याबद्दल कमीशनरांनेसुद्धा अभिनंदन करायला हवे. परंतु केलं— बोललेले सर्व कागदावरच राहिले आहे. आम्ही थांब-थांब थांबून सुमारे डझनभर इतर याचिका सादर केल्या आणि ह्या सूचनांचा अंमल होत नसल्याचे सांगितले. आम्ही कोर्टात अनेक दिवस खर्ची घातले. साधारणपणे माझ्यासारख्या व्यक्तीला कोर्टात आणि बाहेर वेळ दवडू लागू नये. मी लोकांबरोबर काम करणं महत्त्वाचं मानतो. परंतु मी आणि बंधुआ मुक्ती मोर्चाचे इतर कार्यकर्ते एकदा ह्यात गुंतलो. त्यामुळे वकीलांना माहिती पुरविण्यासाठी न्यायालय व खाणीत ये–जा ठेवावी लागली. शेवटी एक वर्षभर थांबल्यानंतर पुन्हा एकदा रस्त्यावर आलं पाहिजे असं आम्हाला वाटलं. कामगारांनी दुसरं काही नव्हे तर सर्वोच्च न्यायालयाच्या २१ सूचनांच्या अंमलबजावणींच्या मागणीसाठी जिल्हा न्यायालयापुढे निदर्शने केली. आता इथंच लगेच त्यांची अंमलबजावणी करा असं आमचं म्हणणं नव्हतं पण निदान काम सुरू करा. कोठेतरी काम सुरू आहे असं दिसू द्या. हा आमचा लढ्याचा हेतू होता. अंमलबजावणीच्या मागणीसाठी आम्ही १५ मार्च ८५ ला निदर्शने सुरू केली. १६ मार्च रोजी आम्हाला खाणींवर परत जायला सांगून १८ मार्चला बोलविण्यात येईल असे सांगितले. १७ तारखेला आमच्यावर मालक व त्यांचे मध्यस्थ व गुंडाकडून हल्ला झाला. आमच्यापैकी एका सहकाऱ्याला मरेपर्यंत मारहाण करण्यात आली आणि ३४ जण गंभीर जखमी झाले. पोलिस बघ्याची भूमिका घेऊन होते, किंबहुना उघडपणे मालकांना सहकार्य करीत होते. त्यांनी जखमींना दवाखान्यातून पोलिस कोठडीत आणले आणि प्रथम खोट्या सूचना अहवालावर त्यांचे अंगठे घेऊन त्यांना अटक केले.

रोहटकजेलमधून सुपरिंटेंडेंटमार्फत मी न्यायालयाच्या बेअदबीबद्दल याचिका सादर केली. याचिका दाखल करण्यात आली परंतु जेलमधून जामिनावर सुटून आल्यानंतर मला नियमीत याचिका सादर करण्यास सांगण्यात आले.

ही याचिका दाखल करण्यात आली आणि त्याप्रमाणे नोटीसाही बजावण्यात आल्या परंतु तद्नंतर अजूनपावेतो एकदाही सुनावणी झालेली नाही.

( 'दि लॉयर्स कलेक्टिव्ह' मधील मुलाखतीचा संक्षिप्त अनुवाद )

## 'वन निकेतन व श्रमिक मुक्ती संघटना'

कामाला सुरबात मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या 'कॉलेज ऑफ सोशल वर्क' या समाजसेवेचे अध्ययन देणाऱ्या महाविद्यालयाने ग्रामीण भागात सामाजिक कार्य करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे १९८० साली महाविद्यालयाने किशोर देशपांडे, भिमराव गायकवाड व बबन घरत या तीन विद्यार्थ्यांची ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात नियुक्ती केली. प्रत्यक्ष कार्यानुभवाचा एक भाग, कमालीचा उत्साह व विशेषकरून आदिवासी भागात काम करण्याची तळमळ या गोष्टींनी झपाटलेले हे तीन विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करत असतानाच जवळ जवळ सहा महिने संबंध मुरबाड तालुका फिरले. त्यांनी अनौपचारिकरित्या ह्या भागाची सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक दृष्टीकोनातून पहाणी केली. यातून हा तालुका काम करण्यास योग्य आहे, असे त्यांच्या लक्षात आले.

यानंतर जून १९८० पासून कॉलेज ऑफ सोशल वर्कने या भागात चार पूर्ण वेळ व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ते नियुक्त केले व 'वन निकेतन' या संस्थेच्या नावाखाली कार्याला सुरवात केली. पुढे जाऊन ही संस्था रजिस्टर्ड झाली. ती कॉलेज ऑफ सोशल वर्कच्याच धोरणानुसार आर्थिक दृष्ट्या आता स्वतंत्र संस्था म्हणून कार्यरत आहे.

'वन निकेतन' या संस्थेचा प्रमुख उद्देश ग्रामीण भागात सर्वांगीण विकास साधणे हा आहे.

'कॉलेज ऑफ सोशल वर्क' दरवर्षी आपल्या ज्या विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात काम करण्याची इच्छा आहे, त्यांना प्रत्यक्ष कार्यानुभवासाठी पाठवीत असते.

मध्यंतरीच्या काळात 'रूरल कम्युन्स्' — मुंबई या संस्थेद्वारा आमच्या भागातील काही आदिवासी तरुणांना नऊ महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येऊन, त्यांना वन निकेतन मधे सामावून घेण्यात आले. यानंतर दर वर्षी ग्रामीण तरुणांनी वरील संस्थेत जाऊन प्रशिक्षण घेण्याची प्रथा पडली आहे.

श्रमिक मुक्ती संघटनेचा उदय हा अलीकडचा असला तरी दोघांचे कार्य एकमेकांना पुरक व सहाय्यकारक आहे. एका बाजूला संस्था व दुसऱ्या बाजूला जनसंघटना अशा जोडगोळीच्या रुपात कार्य चालते. त्यामुळे संस्था परिचय देताना दोघांची फारकत करणे संयुक्तिक ठरणार नाही. या भागातील कार्याचा आढावा घेण्यापूर्वी श्रमिक मुक्ती संघटनेचा उदय कसा झाला, प्रमुख उद्देश, भूमिका काय ते आपण थोडक्यात पाहू.

**श्रमिक मुक्ती संघटना** – १९८० सालापासून कार्य सुरू झाल्यावर लोकांचे अनेक प्रश्न पुढे येत होते. त्यांचे होणारे शोषण, अन्याय, अत्याचार ह्यांची पदोपदी प्रचिती येत होती. स्थानिक तरुण मंडळी अस्वस्थ होत होती. सावकारी शोषण, लगिन गड्यांचा प्रश्न, सरकारच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून होत असलेली आदिवासींची लूट, जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण व प्रत्येक स्तरांवरचे कमालीचे शोषण. या सर्व गोष्टींमध्ये संस्था पुढाकार घेऊ शकत नव्हती. म्हणूनच या भागातील गरीब कष्टकरी आदिवासी स्त्रीपुरुषांनी आपली संघटना बांधली. आता ही संघटना भुमिहिन, अल्पभूधारक, आदिवासी, दलित, शेतमजूर, शेतकरी, कामगार या वर्गाची त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारी संघटना म्हणून पुढे येत आहे,

श्रमिक मुक्ती संघटनेच्या कार्याचा प्रधान उद्देश 'शोषण विरहित होऊन सामाजिक न्यायावर आधारलेल्या नवसमाजाच्या निर्मितिला हातभार लावणे' हा आहे.

शोषित लोक आपल्या न्याय्य हक्कासाठी जागे होऊन संघटित होऊन जोपर्यंत लढा पुकारणार नाहीत, तोपर्यंत त्यांच्या जीवनात काहीच फरक पडणार नाही. शोषितानीच त्यांचा मार्ग शोधला पाहिजे. त्याला माणुसकीची भिक नको तर तो त्याचा हक्क आहे. तो त्यांनी बजावला पाहिजे. ही संघटनेच्या कार्याची प्रमुख भुमिका आहे.

प्रत्येक माणूस बदलू शकतो. समाजातील प्रत्येक व्यक्ती/घटक महत्त्वाचा आहे. लोकांसाठी काम न करता लोकांबरोबर काम केले पाहिजे (भाकऱ्या न वाटता भाकरी कशी मिळवावी या ज्ञानाची गरज आहे), या तत्वावर काम चालते.

सामाजिक बदलाच्या प्रक्रियेवर विशेष भर दिला पाहिजे केवळ फलश्रुतीकडेच लक्ष ठेवणे तेवढे योग्य नाही, असे आम्ही मानतो.

कोणत्याही राजकीय पक्षाची बांधिलकी न मानता हे कार्य सुरु आहे.

तेव्हा आता आपण वन निकेतन व श्रमिक मुक्ती संघटना यांच्या प्रत्यक्ष कार्याचा संयुक्तिक आढावा घेऊ.

**( १ ) सांस्कृतिक मेळावे :** आज गरज आहे आदिवासींची संस्कृती टिकवण्याची त्यांच्या महान परंपरेतील चांगल्या मूल्यांचे जतन करण्याची गौरी नाच हा आदिवासींचा फार आवडता. दिवसभर कष्टाने पोळलेला व शोषणाने भरडलेला जीव रात्री या नाचात सुखावतो. पण पुरुष या जगात पहिला आला ( तुरा ) की स्त्री पहिली आली ( कलगी ) या गोष्टीवर आदिवासी समाज विभागला, दुभंगला गेला आहे. त्यांना जवळ आणण्याचे, त्यांची परंपरा टिकवण्याचे आम्ही कार्य करीत आहोत. आम्ही दरवर्षी असे मेळावे आयोजीत करतो. याचवेळी निरनिराळ्या विषयावर प्रदर्शने, नाटके इत्यादिंचे आयोजन केले जाते.

**( २ ) खोडकिडा निर्मूलन :** बेडूक हा शेतकऱ्याचा मित्र. पण त्याच्या तंगड्या परदेशी रवाना होतात. भाताच्या पिकावरील खोडकिड्याचे निर्मूलन करण्यासाठी बेडकांना वाचवणे हा एक प्रमुख उपाय या दृष्टीकोनातून आम्ही दर वर्षी बेडूकपकड बंद होण्यासाठी कार्यक्रम घेत असतो.

**( ३ ) विविध पाहण्या :** कॉलेज ऑफ सोशलवर्कच्या विद्यार्थ्यांनी आतापर्यंत कितीतरी समस्यांवर या भागात पाहणी केली आहे. उदा. आदिवासीमधील प्राथमिक शिक्षणाची अवस्था, वैदूंच्या सहभागाच्या दृष्टीकोनातून ग्रामीण आरोग्याचा प्रश्न, भूमीहीन मजुराची अवस्था, आदिवासी कल्याण योजनांची परिणामकारकता, आर्थिक उन्नतीसाठी बांबूकाम, विद्युतीकरण इत्यादि.

**( ४ ) प्रौढ शिक्षण :** मुंबई विद्यापीठाच्या प्रौढ व निरंतर शिक्षण योजनेखालील प्रौढ शिक्षणाचे वर्ग आमच्या भागात चालत असतात. यावर्षी अशी वीस केंद्रे सुरू झाली आहेत. याचा फायदा असंख्य आदिवासी निरक्षरांना मिळतो.

**( ५ ) सामाजिक वनीकरण :** आतापर्यंत लोकांनी बांबूची ५,००० रोपे लावली आहेत.

**( ६ ) बालक मेळावा :** मे १९८६ मध्ये सुमारे १७५ आदिवासी मुलांसाठी एक मेळावा झाला. त्यामध्ये त्यांचे निरनिराळे खेळ घेण्यात आले. गांधी ट्रस्टीशिप फाउण्डेशन मुंबई मार्फत सर्वांना ग्लास व टॉवेल भेटवस्तू पोटी वाटण्यात आले.

**( ७ ) राष्ट्रीय सण :** १५ ऑगस्ट, २६ जानेवारी हे दिवस प्रासंगिक कार्यक्रम आखून साजरे केले जातात.

**( ८ ) युवकांसाठी शिबिरे :** साधारण दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये एक असे युवकासाठी निरनिराळ्या प्रश्नांवर, त्यांच्या जागृतीच्या दृष्टीकोनातून युवा शिबिरे आयोजित केली जातात.

**( ९ ) स्त्रियांसाठी शिबिरे :** समाजाची अर्धी ताकद असे ज्यांना म्हणता येईल, त्यांना अजूनही या समाजाने मागे ठेवले आहे. तेव्हा समाजबदलासाठी खरोखर प्रयत्न करावयाचे असतील व खऱ्या अर्थाने नवसमाज निर्मिती करावयाची असेल तर स्त्रियांनीही पुढे आले पाहिजे या दृष्टीकोनातून स्त्रियांसाठी शिबिरे आयोजित केली जातात.

**(१०) वैद्यकीय शिबिरे व सहाय्य :** स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मदतीने अशी शिबिरे होतात, तसेच विशिष्ट रोग्यांना अपघात झालेल्या व्यक्तींना शहरी हॉस्पिटलशी संपर्क साधून वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येते.

**(११) राष्ट्रीय सेवा योजना :** मुंबईतील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी अधूनमधून या भागात त्यांच्या कार्याचा एक भाग म्हणून येत असतात.

**(१२) जंगलजमीन अतिक्रमण :** केवळ पोटासाठी जे आदिवासी पुर्वापार जंगल जमीनीवर लागवड करत करत आहेत, अशांचे हितसंबंध रक्षण करण्यासाठी मोर्चे काढणे, निवेदने देणे, सत्याग्रह करणे, इ. गोष्टी क्रमप्राप्त आहेत.

**(१३) पर्यावरण :** पर्यावरण दिन न पाळता निसर्गसंतुलन राखण्यासाठी चोरट्या जंगल तोडीवर डोळ्यात तेल घालून संघटनेचे सभासद लक्ष घालत असतात, अशा बाबतीत तक्रारी करणे, चोरटा माल पकडून देण्यात पुढाकार घेणे व प्रत्येक जाहीर कार्यक्रमात जंगलतोड थांबविण्याची सतत मागणी, वृक्षारोपण इ. गोष्टींचा सतत पाठपुरावा केला जात आहे.

**(१४) खंडकरी शेतकऱ्यांचा प्रश्न :** आदिवासींनी जमीन कसायची, त्याचा खंड सावकारांना द्यायचा, सावकारांनी खंडाची पावती द्यायची नाही, तलाठ्याने पीकपहाणी करायची नाही व अशाप्रकारे प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांचे हक्क धुडकवायचे अशी जवळजवळ ६० प्रकरणे सध्या संघटनेमार्फत कोर्टात आहेत.

**(१५) वेठबिगार मुक्ती :** नवसमाजामध्ये कोणी कोणाचा गुलाम असणार नाही या दृष्टीकोनातून या प्रश्नाला विशेष महत्व आहे. आदिवासीने लग्नासाठी किंवा

एखाद्या अडचणीत ४०० रुपयापासून २००० रु. पर्यंत कर्ज काढायचे या बदल्यात सावकार शेटकडे २० वर्षांपासून ४० वर्षांपर्यंत विनामजुरी दिवसाचे १२।१४ तास त्याच्याकडेच खपायचे दोन वेळच्या भाकऱ्या, सुकटाचे बरबाट, दोन चार बंड्या, एक घोंगधी, तंबाखू हा त्याचा मोबदला.

अशा भयाण अवस्थेत आजही भारताचे गुलामपुत्र वावरत आहेत. मुरबाड तालुका त्यास अपवाद नाही. संघटनेने आतापर्यंत भगीरथ प्रयत्नाने अशा १३ आदिवासींची सावकारी गळफासातून मुक्तता केलेली आहे. पण एक वर्षाचा कालावधी लोटूनही भ्रष्ट महसूल यंत्रणेने दोन अ दिवासी सोडले तर अकरा जणांचे पुनर्वसनाचे बाबतीत अक्षम्य दुर्लक्ष केले आहे, एवढेच काय तर हे सर्वजण वेठबिगार नाहीतच हे सिद्ध करण्याच्या मागे सावकार शेठच्या हातात हात घालून सर्व ताकद पणाला लावत आहेत. याचा परिणाम अर्थातच इतर भाऊ बहिणी सुटल्यावर होत आहे.

**(१६) आदिवासी कायदा :** आदिवासींना जमिनी पुर्नस्थापित करण्यासाठी क्रांतीकारक कायदा (१४ / १५) केला. पण मुरबाड मधील ८० % प्रकरणे रद्द केली. जेमतेम १० /१२ आदिवासींना कब्जाचा हुकूम दिला. एवढेच नव्हे तर कब्जा हुकूम झालेल्याना प्रत्यक्ष जमीन मिळाली आहे की नाही याची खबरदारीही कित्येक प्रकरणात घेतलेली नाही. अर्थात संघटना आता आपल्या ताकदीवर हा प्रश्न हातात घेऊन पुढे सरसावली आहे.

**(१७) किमान वेतन :** दिवसाला २ ते ४ रु. मजुरी यावर विश्वास बसणार नाही. पण निदान किमान वेतन कायद्याप्रमाणे मजुरांना मजुरी द्यावी त्या मागणीसाठी अनेक मोर्चे काढून मजुरांना संघटित केले जात आहे. त्याचा हळूहळू इष्ट परिणाम दिसत आहे. ही झाली सावकारी मजुरी. पण जंगलखात्याच्या कामाच्या बाबतीतही हीच तऱ्हा आहे.

**(१८) महसूल खात्यावर टीकास्त्र :** गरिबांचे जीवन विषयक प्रश्न, वारस नोंद, खाते फोड, हक्क नोंद, गावठाण पाडून मिळणे, पिक पहाणी, बांधदगड पहाणी, रेशनची समस्या, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न. नखियापॅटर्नची अंमलबजावणी, भ्रष्टाचार, अनागोंदी कारभार, वेळकाढू धोरण, आदिवासीविरोधी दृष्टीकोन इ. विषयाला धरून मोर्चे काढले जातात. धरणे कार्यक्रम होतो.

**(१९) प्रकल्पग्रस्त परिषद :** डोंगरातल्या मूळ रहिवाश्याला फेकून तिथे बंधारे बांधून पाणी शहराला या नीतीविरुद्ध 'आधी पुनर्वसन मगच धरण' या भूमिकेतून आला या भागात 'खापरी धरणग्रस्त समिति' स्थापन झाली आहे यामध्ये संपूर्ण स्थानिक नेतृत्व आहे.

**(२०) असंघटित कामगारांसाठी शिक्षण शिबिरे** लाकूडकाम, घरकाम, शेती काम, विटभट्टी, कोळसाभट्टी काम इ. मध्ये असंख्य मजूर काम करतात. त्यांना त्यांच्या हक्कांची / कर्तव्यांची जाणीव करून देण्यासाठी शिबिरे आयोजित केली जातात.

**(२१) जागरादिंडी :** संघटनेची भूमिका व कार्याचा प्रचार या उद्देशाने दरवर्षी जागरादिंडी काढली जाते. त्यामध्ये जागृतीपर गाणी, घोषणा घेतल्या जातात. दिंडी साधारण तीन दिवसांची असते.

**(२२) शैक्षणिक सहल :** इतर भागात सामाजिक कामे, चळवळ कशी चालली आहे, कामाची पद्धत काय, धोरण भूमिका काय इ. हेतूने इतर भागातल्या संस्था संघटनांना भेटी दिल्या जातात.

**(२३) जमिनविषयक शिबिरे :** सेवानिवृत्त तहसिलदार श्री. रा. वि. मुस्कुटे यांच्या सहकार्याने या प्रश्नाला धरून असंख्य शिबिरे आजपर्यंत आयोजीत केलेली आहेत व यापुढेही केली जातील.

**(२४) दैनंदिन प्रश्न :** लोकांचे दैनंदिन प्रश्न, अडचणी, अन्याय, इ. गोष्टींना धरून ते येत असताना त्यांना याबाबतीत योग्य ते मार्गदर्शन केले जाते. कोठेही परावलंबित्वाला थारा दिला जात नाही.

या आमच्या कार्यामध्ये अनेक व्यक्ती, संस्था, संघटना यांची प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मदत होत असते. मुंबईतल्या पत्रकारांची याबाबतीत फारच मोठी मदत होत आहे. त्यांच्या तेजस्वी पत्रकारितेमुळे आता ही फोफावत असलेली चळवळ दडपून टाकणे तसे सहजा सहजी शक्य होणार नाही.

शोषिताला संघटित करीत असताना त्यांना संघटित करणाऱ्या ताकदींचे एकत्रिकरण होण्याची गरज आहे, असे आम्ही मानतो.

नवसमाज निर्मितीसाठी नवीन सामाजिक मूल्यांची जडणघडण झाली पाहिजे, असे ठामपणे वाटते.

लोकशाही मूल्यांवर पूर्ण विश्वास ठेवून म. गांधींच्या अहिंसेच्या, सनदशीर मार्गाने आमची हळूहळू वाटचाल सुरू आहे.

**— ॲड. विजय साठे**

# वेठबिगार वृत्तसंकलन

अन्नवस्त्रांसारख्या प्राथमिक गरजांसाठी देखील आदिवासी मजुरांना वर्षानुवर्षे वेठबिगारीत खितपत पडावे लागते, वेठबिगार पद्धतीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी केन्द्र व राज्य सरकारांनी पुरोगामी कायदे केले, वेठबिगारीच्या विळख्यातून आदिवासी मजुरांची सुटका करून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या योजना आखण्यात आल्या पण त्यांच्या अंमलबजावणीकडे राज्य सरकारांनी दुर्लक्ष केले, वेठबिगारीच्या विळख्यातून सुटलेले मजूर उपासमारीच्या कचाट्यात सापडले. या वृत्तसंकलनातील घटना प्रातिनिधीक असून वेठबिगार प्रश्नांच्या अनेकविध अंगांकडे आपापल्या परीने त्या लक्ष वेधतात.

## वेठबिगारांच्या पुनर्वसनासाठी मंजूर रकमेपैकी निम्म्याहून अधिक पडून

दिल्ली, दि. १५–४–८० ( भारती ) — केंद्र सरकारने १९७८–७९ या वर्षात वेठबिगाराच्या पुनर्वसनासाठी नऊ राज्यांना सुमारे एक कोटी रुपयांची रक्कम दिली होती. त्यापैकी निम्मी रक्कमही ही राज्ये खर्च करू शकली नाहीत.

केंद्र सरकारने आंध्र प्रदेश, बिहार, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, ओरिसा, राजस्तान, तामिळनाडू, आणि उत्तर प्रदेश या राज्यांना १९७८–७९ मध्ये वेठबिगाराच्या पुनर्वसनासाठी एकूण ९७ लाख ६४ हजार रुपये दिले होते. त्यापैकी तामिळनाडू वगळता इतर आठ राज्यांनी या कामासाठी फक्त ५५ लाख ६२ हजार रुपये खर्च केले. तामिळनाडूला दिलेल्या पाच लाख ३२ हजार रुपयापैकी एक पैसाही खर्च करण्यात आला नाही. या आठ राज्यांनी हे पैसे खर्च करून एकूण ५४२० वेठबिगाराचे पुनर्वसन केले.

गांधी शांती प्रतिष्ठानाने गुजरात, महाराष्ट्र आणि नऊ राज्यामध्ये एकूण २३ लाखाहूनही अधिक वेठबिगार असल्याचे पाहाणीअंती शोधून काढले होते. त्यापैकी एक लाख २० हजार २९२ वेठबिगाराची या राज्य सरकारानी मुक्तता केली असून त्यापैकी ८९ हजार वेठबिगाराचे विविध योजनाखाली पुनर्वसन केले आहे.

आंध्र प्रदेश, बिहार, कर्नाटक, केरळ ओरिसा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांना १९७९–८० मध्ये वेठबिगाराच्या पुनर्वसनासाठी ६८ लाख २६ हजार रुपये मंजूर करण्यात आले.

या राज्यापैकी फक्त केरळ, राजस्थान आणि उत्तर प्रदेश याच राज्यांनी त्यांना १९७८–८९ मध्ये दिलेल्या २५ लाख ६५ हजार रुपयांचा पूर्ण उपयोग केला. त्या खालोखाल आंध्र प्रदेशाने दिलेल्या २० लाख रुपयापैकी १८ लाख रुपये खर्च केला. बिहारला देण्यात आलेल्या १४ लाख २८ हजार रुपयापैकी फक्त दोन लाख ६९ हजार रुपये वेठबिगाराच्या पुनर्वसनासाठी खर्च झाले.

( नवशक्ति १५ एप्रिल ८० )

## साडीचोळी, ५ मण भातासाठी २२ वर्षे वेठबिगारी

मुबंई, मंगळवार — ३ लुगडी. ३ चोळ्या. सदरा. साधं मणीमंगळसूत्र, धोतर आणि ५ मण भात यांची किंमत किती ? पैशात या वस्तूंची किंमत कितीही असो. पण श्रमात मात्र या वस्तू बाळू चंगड्या किरकिरा याला २२ वर्षांना पडल्या. तब्बल २२ वर्षांना !

बाळूनं लग्नासाठी या वस्तू सावकाराकडून घेतल्या आणि या वस्तूंची किंमत फेडण्यासाठी सावकाराकडं त्याला २२ वर्षे अन्नावारी राबावं लागलं. वेठबिगारी नष्ट करणारा कायदा संमत होऊनही असे अनेक बाळू वेठबिगारांवर घाम गाळीत आहेत.

वेठबिगारीस प्रतिबंध करणारा कायदा केंद्र सरकारने सहा वर्षांपूर्वी संमत केला. परंतु त्याची अंमलबजावणी करता यावी याकरिता राज्य सरकारनं संबंधित प्रशासकांना अधिकार देण्याची व्यवस्था अजून केलेली नसल्याचा ‘ विधायक संसद ’ या संस्थेचा अनुभव आहे.

स्थानिक अधिकाऱ्यांना या कायद्यानुसार अजून अधिकार मिळाले नसल्याने आता फार तर अशा वेठबिगार कामगारांची सावकाराच्या कचाट्यातून फक्त मुक्तता होते. परंतु अनेक वर्षे त्याच्याकडून करून घेतलेल्या कामाबद्दलचा मोबदला मात्र त्यास मिळत नाही.

( महाराष्ट्र टाईम्स १८ ऑगस्ट ८२ )

## 'वेठबिगारांचे पुनर्वसन होत नाही'
## विधानसभेत विरोधी सदस्यांचा सभात्याग

मुंबई, गुरुवार — वेठबिगार निर्मूलन कायद्याची अंमलबजावणी सरकारकडून योग्य रीतीने होत नसल्याच्या निषेधार्थ आज महाराष्ट्र विधानसभेत सर्व विरोधी सदस्यांनी सभात्याग केला.

या कायद्यानुसार वेठबिगारांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी सरकारवर असता ती पार पाडण्यात आली नाही, असा आरोप गणपतराव देशमुख ( शेकाप ) यानी केला.

१९८१ अखेर वेठबिगारांची २९२ प्रकरणे कामगार निरीक्षकानी शोधून काढली. त्यांना रोजगार हमी योजनेखाली प्राधान्याने काम देण्यात आले, असे कामगार राज्यमंत्री मधुकर किंमतकर यांनी त्याआधी प्रश्नोत्तराच्या तासाला सांगितले.

स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने १९८१ पासून आतापर्यंत वेठबिगारीची आणखी ३० प्रकरणे शोधून काढण्यात आली. यापैकी २६ प्रकरणे एकट्या ठाणे जिल्ह्यातील आहेत, असे राज्यमंत्री म्हणाले.

वेठबिगार शोधून काढण्यासाठी नऊ दक्षता समित्या नेमण्यात आल्या आहेत. त्यांनी वेठबिगारांचे एकही प्रकरण शोधून काढले नाही असे श्री. किंमतकर यांनी श्री गौरीशंकर त्रिवेदी ( कॉं. इं. ) यांच्या मूळ प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

श्री. किसनराव देशमुख ( शेकाप ), सुदाम देशमुख, बाबासाहेब दुबे ( कम्यु. ), रायभान जाधव ( कॉं. इं. ), राम कापसे ( भाजप ), लहानू कोम ( मा. कम्यु. ), प्रभृतींनी १५ मिनिटे उपप्रश्नांची सरबत्ती करून मंत्र्यांना धारेवर धरले व उत्तराने समाधान न झाल्याने शेवटी सभात्याग केला.

( महाराष्ट्र टाइम्स १५ जुलै १९८३ )

## वसईतील आणखी १०० वेठबिगारी मुक्त
## उसन्या कपड्याने मुक्तदिन साजरा

वसई, दि २६ ( यु. इं. ) — श्रमजीवी संघटनेच्या प्रयत्नाने ठाणे जिल्ह्यातील तहसीलदार कार्यालयात आज शंभर आदिवासी वेठबिगारांची समारंभपूर्वक सुटका करण्यात आली.

या प्रसंगी तहसीलदार श्री. आर. व्ही. मुस्कुटे यांना या वेठबिगारांनी आपल्या आतापर्यंतच्या जीवनात झालेल्या विविध अत्याचारांची दर्दभरी कहाणी सांगितली.

या वेठबिगारांच्या अनेक महिलांवर त्यांच्या मालकांकडून किंवा मालकांच्या माणसांकडून बलात्कार झाले आहेत. तर अनेकांचा अत्यंत छळ करण्यात आला आहे. तसेच, काहींना आपले घरगडी म्हणूनही वागविण्यात आले आहे, असे श्री. मुस्कुटे यांनी सांगितले. इतकी वर्षे वेठबिगार करूनही या 'मुक्त दिन' समारंभास उपस्थित राहण्यासाठी त्यांना भाड्याचेच कपडे परिधान करावे लागले असेही ते म्हणाले.

आपल्या दीड वर्षाच्या मुलीचे भावी काळात सुखाने लग्न व्हावे म्हणून एका महिलेने वीस वर्षे वेठबिगारी केली. परंतु तिच्या मालकाने दिवसाआड एक किलो तांदळापेक्षा अधिक काही दिले नाही. आपल्या क्षयरोगग्रस्त पतीच्या औषधोपचारासाठी वेठबिगारी करणाऱ्या एका महिलेवर मालकाच्या माणसांनी अनेकवेळा बलात्कार केल्याचे तिने सांगितले. एका पंचवीस वर्षाच्या तरुणास व त्याच्या आईवडिलांना निव्वळ दोन वेळच्या जेवणासाठी दहा वर्षे राबवून घेण्यात आले. तर ५२ वर्षांचा लक्ष्मण जबार आणि त्याचा १५ वर्षांचा मुलगा हाल्या यांना अडने गावच्या सरपंच मालकाने दोन रुपये रोजावर राबवून घेतले. दोन दिवसांपूर्वी त्यांनी हे काम सोडल्यानंतर त्याची वीज खंडीत करण्यात आली व सार्वजनिक विहिरीतून त्यांना पाणी भरण्यास मज्जाव करण्यात आला.

( नवशक्ती २७ ऑगस्ट १९८३ )

## वेठबिगारीतून मुक्त; पण
## उपासमारीच्या कचाट्यात

मुंबई, शुक्रवार — वेठबिगारीच्या बंधनातून मुक्तता झाली ... परंतु त्यामुळे रोजगार-बंदीचे नवे संकट ओढावले ... विरार परिसरातील अनेक आदिवासीपुढे त्यामुळे नवीन पेच निर्माण झालेला दिसतो.

या आदिवासींनी वेठबिगारांतून हिंमतीने सुटका करून घेतली खरी. परंतु त्यामुळे चिडलेल्या बड्या शेतकऱ्यांनी मुक्त झालेल्या आदिवासींनाच नव्हे, तर त्या परिसरातील इतरांनाही रोजगार देण्याचे गेल्या आठ-दहा दिवसांपासून बंद केले.

इतकेच नव्हे, तर या शेतकऱ्यांनी तेथील दुकानदारांवरही दडपण आणल्याने ते आदिवासींना माल विकताना

दुप्पट भाव सांगत असल्याची तक्रार आहे. एक तर रोजचे वेतन बंद झाले आणि जे काही पैसे हातात आहेत त्या आधारे खरेदी करावयाची तर दुप्पट भाव मोजावा लागतो

मुक्त झालेल्या वेठबिगारांच्या पुनर्वसनाची जबाबदारी राज्यसरकारची आहे. परंतु त्यासंबंधीची केंद्र सरकारची जी योजना आहे तिची अंमलजबावणी राज्य सरकारने केलेली नाही. या योजनेनुसार केंद्र व राज्य यांनी समप्रमाणात मिळून चार हजार रुपये या मुक्त झालेल्या गड्यांना द्यावयाचे असतात. एका बाजूला शासन काही करीत नाही, तर दुसऱ्या बाजूस बड्या शेतकऱ्यांनी त्यांना काम देण्याचेच बंद केले आहे.

( महाराष्ट्र टाइम्स २८ ऑगस्ट १९८३ )

## विष्णुपुरी प्रकल्पावरील वेठबिगारी

## झरी येथील दगडाच्या खाणीतील मजुरांचा अमानुष छळ

नांदेड, दि. १८—येथून जवळच असलेल्या विष्णुपुरी प्रकल्पांतर्गत झरी गावाजवळील दगडाच्या खाणीत वेठबिगारीचा नवीन प्रकार उघडकीस आला आहे. मजुरांचा अमानवी छळ करून त्यांचे शोषण करण्यात येत असल्याचे दृश्य तेथे पाहावयास मिळाले.

झरी येथील खाणीत सुमारे ४०० मजूर काम करतात. या मजुरांपैकी ११० मजूर ओरिसा, मध्यप्रदेश, महाराष्ट्रातील खानदेश आदी भागातून आणण्यात आले आहेत. काही मजुरांना राजकोट येथून जादा मजुरांची लालूच दाखवून विष्णुपुरी प्रकल्पाच्या कामावर आणण्यात आले.

या मजुरांना धनु जमादार आणि नारायण या दोन दलालांनी नांदेड येथे आणले. पुरुषाला १५ रुपये व महिलेस १० रुपये मजुरी मिळेल असे सांगण्यात आले. नांदेडला येण्यासाठी प्रत्येकी १२० रुपये ॲडव्हान्स देण्यात आला. रेल्वेचे भाडे कंपनी भरेल असे सांगण्यात आले. जादा मजुरी मिळेल या आशेने हे ११० मजूर नांदेडकडे निघाले मात्र नंतर त्यांना भाडेही मिळाले नसल्याचे समजते.

### पैसे कापले

मजुरांनी कामास सुरुवात केली असता पुरुषास ८–९ रुपये दररोजची मजुरी गृहित धरली जाऊ लागली. आठवड्याचे काम ६० रुपये झाले तर त्यातही ३० रुपये कपात करण्यात येऊ लागली. महिला व लहान मुलांना टोपल्यानुसार मजुरी ठरविण्यात आली. एक टोपले दगड ट्रकमध्ये भरण्यास फक्त दोन पैसे असा दर ठरविण्यात आला. म्हणजे एका महिलेस किंवा मुलास दररोज जास्तीत-जास्त ४ रुपये मजुरी पडू लागली. त्यांच्या आठवड्याच्या मजुरीतून अर्धे पैसे कापण्यात येऊ लागले. सकाळी ७ ते सायंकाळी ७ असं बारा तास काम करून घेण्यात येत आहे.

पोटाची खळगी भरण्याकरिता आवश्यक असलेली मजुरी पदरात पडत नसल्याने मजुरांनी सोबत आणलेली भांडी विकून टाकली. हातात पैसा नसल्याने त्यांची उपास मार होऊ लागली.

या मजुरांची बायकामुले खाणीजवळच्या जागेत उघड्यावरच राहू लागली. त्यांना राहण्यासाठी झोपडे बांधून देण्यात आले नाही. परिणामी मुले आजारी पडली.

### महिलांना मारहाण

आपल्याला मारहाण झाल्याची तक्रार जवळजवळ सर्वच मजुरांनी केली. आजारी मुलास मांडीवर घेऊन बसलेल्या मातेच्या पाठीत लाथ मारण्यापर्यंत मजल गेली. आजारी पडलेल्या मजुरास औषधे देणे तर बाजूलाच राहिले, पण दंडुक्याचा प्रसाद देण्यात येऊ लागला.

या छळामुळे मजूर पळून जातील ही भीती कंत्राटदाराला होती. त्यामुळे खाणीच्या बाहेर जाण्यास मजुरांवर बंदी घालण्यात आली. मजुरांना गावात अन्नधान्य खरेदीसाठी यावयाचे असेल तर त्यांच्यावर पाळत ठेवण्यात येऊ लागली. 'येथून पळून जाल तर पाय तोडू.' अशा धमक्या मजुरांना देण्यात आल्या.

एक मजूर जुजारिया याची ४ वर्षे वयाची मुलगी रक्ता ओकत ८ एप्रिल ८४ रोजी मरण पावली. मात्र तिच्या देहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी कंत्राटदाराने कवडीही दिली नाही, अशी तक्रार जुजारियाने केली. औषधोपचार न मिळाल्याने तो मरण पावला असेही त्याने सांगितले.

या मजुरांची स्थिती इतकी दयनीय झालेली आहे की त्यांच्या अंगावर पुरेशी वस्त्रेही नाहीत. तीन महिला तर अर्धनग्न अवस्थेतच होत्या.

या सर्व गैरप्रकारांची पाहणी केल्यानंतर समाजकार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. अत्याचारांच्या कथा ऐकल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी औषधोपचाराची सोय तसेच पोलिस चौकशीचे आदेश दिले आहेत.

( महाराष्ट्र टाइम्स १९ एप्रिल १९८४ )

( पान २८ वर पहा. )

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# 'हा का रा'

## सूची

| | | |
|---|---|---|
| अंक पहिला : जानेवारी–मार्च | १९८० | — जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल–जून | १९८० | — आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै–सप्टेंबर | १९८० | — आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८० | — आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी–मार्च | १९८१ | — दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल–जून | १९८१ | — आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै--सप्टेंबर | १९८१ | — वनशेती व संवर्धन |
| अंक आठवा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८१ | — रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी–मार्च | १९८२ | — उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल–जून | १९८२ | — धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै–डिसेंबर | १९८२ | — जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी–मार्च | १९८३ | — आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल–जून | १९८३ | — आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा जुलै- सप्टेंबर | १९८३ | — प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर डिसेंबर | १९८३ | — आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-अठरा : :जानेवारी–जून | १९८४ | — आदिवासीमधील स्वयंसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४ | — आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८४ | — आदिवासींचे आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी–मार्च | १९८५ | — आदिवासी संघटना |
| अंक बाविसावा : एप्रिल–जून | १९८५ | — जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै–सप्टेंबर | १९८५ | — अदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर–डिसेंबर | १९८५ | — आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी–मार्च | १९८६ | — जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल–जून | १९८६ | — आदिवासी कला |

*Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80*

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन.

कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे, याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हा का रा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रुपये |
| आदिवासी कार्यकर्ते सभासद | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोशिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी. मनीऑर्डर पाठविल्यास फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**रा. क. मुटाटकर, सचिव**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
६४/३, आनंद पार्क, औंध, पुणे ४११००७

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**